# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY
OU_192475
UNIVERSAL
LIBRARY

दीप प्रकाशन पंधरावें

# छागल

(कथा संग्रह)

— लेखक —

बी. रघुनाथ

मूल्य सव्वा दोन रुपये

1957

मराठवाडा साहित्य भांडार

परभणी

प्रकाशक:—

**वि. भा. पाठक**

संचालक:—दीप प्रकाशन

**मराठवाडा साहित्य भांडार**

**परभणी**

**आवृत्ति पहिली** मे १९५१

( पहिल्या दोन आवृत्त्यांचे सर्व हक्क प्रकाशकाने राखून ठेवले आहेत. )

**मलपृष्ठ सजावट :**

**श्री. भगवान भालेराव**

मुद्रक:—

**आ. कृ. वाघमारे**

**जयहिंद प्रेस, नारायणगुडा,**

**हैद्राबाद–द.**

# अनुक्रम.


| | | |
|---|---|---|
| १. | स्वतः विषयीं | |
| २. | पैसा कुठें जातो | १ |
| ३. | किशी | १५ |
| ४. | हत्याकांडांतील तीन सर्ग | २५ |
| ५. | असंच होणार होतं | ३३ |
| ६. | जिथं तांबडं फुटायचं आहे | ५४ |
| ७. | सरल्या पावसाळ्यांतील एक रात्र | ५८ |
| ८. | हें हाडामांसाचं शरीर | ६५ |
| ९. | १९४८ | ७८ |



संग्रहांतील कथा 'हंस', 'विसावा', 'अभिरुचि', 'मराठवाडा' 'नवभारत', 'युगवाणी' या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांच्या पुनर्मुद्रणाच्या परवानगीबद्दल लेखक संपादकांचा आभारी आहे.

# श्री. रघुनाथ यांचें वाङ्मय

## प्रकाशित

१. ओ ऽ (कादंबरी)
२. आलाप आणि विलाप (कविता)
३. माकी (कथा)
४. हिरवे गुलाब (कादंबरी)
५. बाबू दडके (कादंबरी)
६. उत्पात (कादंबरी)
७. अलकेच्या प्रवासी (निबंध)
८. म्हणे लढाई संपली (कादंबरी)
९. फकीराची कांबळी (कथा)
१०. जगाला कळलं पाहिजे (कादंबरी)
११. कागल (कथा)

## संकलित

१. पुन्हां नभाच्या लाल कडा (कविता)
२. मस्तानी (कथा)
३. गांवठाण (लघुनिबंध)

कवि मित्र

**यशवंत कानिटकर**

यांना—

# स्वतः विषयीं • •

मी एक कथा लेखक आहे. माझ्या कथाखेरीज मला वेगळा परिचय नाही.

माझ्या भाडघराच्या भितींना चुना लावलेला नाही. माझं यश किती अथवा कसं धवल आहे, किंवा यशाचं कांही चिन्ह तरी आहे काय, हे कोणी सांगावं? माझ्या जवळ चांगला आरसा नाही. मी कसा आहें, हें कुठं कसं पहावं न् काय सांगावं? इतरांच्या मनांत आपला कसा 'ठसा' उमटतो, हें तरी कसं ओळखावं? तो चांगला उमटविण्यासाठी काय करावं?

पोटाचा व्यवसाय सुरू करतांना न् तात्पुरता संपवितांना आकाशात उंच गेलेलं गिरणीचं एक धुरांड मला हटकून पहावं लागतं. सकाळपासून सध्याकाळपर्यंत धूर ओकायचा त्याचा क्रम सारखा चालू असतो! दृश्य विषयावर स्वतःचं नवं वितान निर्माण करण्याच्या महत्वाकांक्षेनं तर तें भारलं नसेल? त्या क्रमातून आजवर कांही चांगलं निर्माण झाल्याचं दिसलं आहे?

त्याचा धूमक्षेप मात्र चालू असतो!

× × × × ×

माझ्याजवळ स्वतः विषयी कांही सांगण्यासारखं नसल, तरी न सांगण्यासारखं आहे. मी व्यतिपातावर जन्मलों! नाही तर एकादं तरी भाग्य लक्षण सहज उजळ होऊं शकलं असतं! माझं नांव मात्र तसं आहे! पण तें तसं दिसाव, असं मीं राहूं दिलेलं नाही! माझ्या 'बदनामी' चा मासा मीच जबाबदार आहे! विद्यामंदिरांतलीं रजिस्टरं काळी करण्यापलीकडं माझं नांव चमकलं नाही. मी एकदाची शाळा सोडली, तेंव्हा कुठं माझ्या कांही आवडत्या शिक्षकांच्या आयुष्यांत ऊर्जितावस्थेनं पाऊल टाकलं! आज त्यापैकी कांही (सहाध्यायी सुद्धा) उच्चाधिकारावर आहेत. माझ्याशी ते बोलतात. शालेय ऋणानुबंध

उजळ करतात. 'बी. आर.' याच जुन्या नावानं त्यांनी मला संबोधिलं की, त्या उनाड जीवनांतील सगळ्या झिणझिण्या जाग्या होतात.

मी देखील कॉलेजमध्ये पाय ठेवला असता. न् एकेका वर्गात तीन तीन वर्षे काढून वाचनमालांचे गोदाम रिकामे करण्यांत हातभार लावला असता! परंतु त्या माझ्या रम्य कालांत चांगली कॉलेजं कोणती होती, या विषयीं चौकशी करण्या इतकं त्राण माझ्यांत नव्हतं. मी त्या भानगडींत पडतों तर, कथांची भाषांतरं करण्यांतच मला जन्म घालवावा लागला असता की काय न कळे! शिवाय आजच्या 'कॉलेजकन्या'ला पाठवावं लागतं, तेवढं चलन माझ्या साठीं उपलब्ध होणं शक्य नव्हतं!

विद्यार्थी दशेंतच मला काव्याचा नाद लागला. (वडर!) कविता करण्याखेरीज त्या वेळीं काय करतां येणार होतं? त्या काळच्या स्थानिक मासिकांत (राजहंस. विहंग माला) माझ्या कविता फडकल्या! अन् कांही दिवसांनंतर तीं मासिकं बुडाली! चांगलीं मासिकं सुरळीत चालूं न देणाऱ्या दुष्ट शक्तींनी माझं दुर्दैवहि साहाय्याला घेतलं होतं की काय, कुणास ठाऊक! अशाच कुठल्या तरी एक अवस्थेत मी कथालेखनाकडं वळलों!

मी एक धटिंगण कथालेखक आहे, (माणूस केव्हां केव्हां स्वतः-विषयी खरं बोलून जातो!) हे सांगायला एवढा इतिहास पुरे!

× × × × ×

अगदींच प्राथमिक अवस्थेत लिहिलेली 'कंदील' नांवाची माझी कथा मला आवडते. खोडाखोडीची न् फाडाफाडीची कित्येक आवर्तनं झाली. (तशी नेहमी होतात. या लेखाची हि झाली आहेत. 'फोडाफोडी' पासून मात्र मी फार दूर आहे! कारण लिहिण्यांतला रंग आणि लिहून लिहून येणारा फेस, ही काय कमी आहेत.) मग एकदाची ती कथा तयार झाली! पुण्याच्या एका सुप्रसिद्ध मासिकानं तिचा स्वीकार केला होता न् 'प्रकाश' नावाच्या साप्ताहिकांत तिला प्रसिद्धि लाभली होती. त्या कथे मुळेच की काय कुणाला माहीत, प्रकाश प्रतिमांवर आणि प्रकाश प्रतिकांवर मी अतिशय लुब्ध होत गेलों. मी कंदिलावर लिहिलं. रस्त्यावरल्या कंदिलावर लिहिलं. 'नंदादीप आणि पणती' वर लिहिलं.

हैद्राबादच्या रस्त्यावरील दिव्यांच्या शोभेवर लिहिल. माझ्या दीप्ति-मोहाची काहीं वाक्यं हि काढून दाखवितां येतील. (अशा वाक्यांची मोजमाप काहीं दिवाभितांना रुचणार नाहीं.) माझ्या घरा पुढला दिव्याचा खांब मीं रात्री पाहिला होता. आज काल तो दिवसा दिसतो. अर्थात 'कल्पनांनी प्रकाशून! 'रात्रीचा रखेला', 'रात्रीचा रक्षक', 'रात्री रंगविणारा', 'रात्री जाळणारा', 'नगराला दिवस दाखविणारा', 'दिवसाच्या हालचालीवर डोळे मिटून बसलेला'—अशी कल्पनावलयं त्याच्या भोंवती आहेत. मध्य-रात्रीच्या दिल्लीत (के. ए. अब्बास यांचा लेख.) प. नं. पंडितजींच्याच अभ्यासिकेंत दिसणाऱ्या दिव्यानं कित्येक परमोज्ज्वल कल्पना मनांत आणून सोडल्या आहेत. 'लागले दिवे', 'लाव दिवा ग ऽ', 'नवलाख दिवे' अशा प्रारंभाच्या कविताहि मला फार आवडतात. 'दिव्याचें मनोगत'-ही कांतांची कविता मला कल्पनातीत आवडली आहे. 'अल्लादिन आणि त्याचा दिवा' या नावाची आधुनिक जीवनाच्या विफलतेवर एक कथा लिहिण्याचें हि फार दिवसांपासून मनांत आहे!

× × × × ×

कथा मनासारखी उतरल्याचा, ती प्रसिद्ध झाल्याचा अगदीच पहिला आनंदाचा अनुभव स्पष्ट आठवत नाही. तो शब्दात आणता येइलसें वाटत नाही. आजहि आनंदाचा तोल सावरतां येणार नाही.

कथा वाहून आणणारा 'प्रतिभे'चा अथवा 'कले'चा अंक आला की, दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी हैद्राबादचं न चुकतां एक पत्र येत होतं. तें आनंदाची पूर्णता करण्यासाठी! या क्रमांत, तीं मासिकं होतीं तोंवर, खंड पडला नाही. अद्यापहि कांहीं पत्रांवाचून अशा प्रकारच्या आनंदाची अनुभूतीच नीट घेतां येत नाही! 'ओढ' चं प्रकाशन, 'साकी', 'अलकेचा प्रवासी', 'म्हणे लढाई संपली!', 'फकीरांची कांबळी' यांच्या प्रस्तावनांनी, 'समीक्षक', 'मंदार', 'ध्रुव', 'हंस', इत्यादींच्या कांहीं अंकांनी अशाच अपूर्व आनंदाचा लाभ करून दिला आहे!

× × × × ×

विचारांची तंद्री विलक्षण असते! आणि विचारांची तंद्री लावण्या-साठीं विलक्षण कष्ट पडतात! विचार आणि कल्पना कुठं कशी येतील, हें नक्की सांगतां येणार नाही. एकदा तरंग सुरू झाले,

म्हणजे कसलंच भान रहात नाही ! एखादं वाग्याचं रोलर डोक्यात आणि डोक्यावर घेऊन निघाल्यासारखी ती अवस्था असावी ! कसलाच आवाज कानावर येत नाही आणि तो नकोसा वाटतो. जेवणाच्या हांका ऐकूं येत नाहीत. जेवतांना अमकं तमक – हवं नको, हें 'माणसा'च्या 'माणसां'नं तीन तीनदां विचारलं, तरी सावधानता नसते. सगळाच पागलपणाचा कारभार !

कथा लिहून होत असलेल्या किंवा लिहून झालेल्या बैठकीचं दृश्य कसं असेल ? कल्पना करा अथवा नका करूं ! सकाळच्या साडे आठ ते साडे नऊमधल्या, संध्याकाळच्या साडे पांच तें साडे सहामधल्या आणि रात्री नऊ तें दहा साडे दहामधल्या वेळाचाच काय तो लिहिण्यासाठी उपयोग करतां येतो. या तिन्ही वेळांतल्या अंतरांतले दैनिक क्रम अगदी वेगवेगळे असल्यामुळं एका बैठकीतले संस्कार दुसऱ्यावेळीं चिमून जातात. कधी अर्धमेल्या मांजराच्या पायासारखीं वाक्यं पडूं लागतात ! सिगारेट काम करीत नाही पण एकदा लय लागली म्हणजे सावली न दुखतां हवें ते तसे कोणत्याहि बैठकीत गाठतां येतात. बैठक साफसूफ करणारे हात थोडक्याचा ढिगारा आणि अर्धवट लिहून पडलेल्या कागदांचा पसारा कोणत्या भावनेनं पाहीत असतील ? विचार न केलेलाच बरा !

× × × × ×

ज्या घरांत माझा जन्म झाला, तें घर सध्याच्या राहात्या घरापासून सुमारे दीडशे फुटाच्या अंतरावर आहे. आता त्या घराच्या भिंती कोसळल्या आहेत ! तिथल्याच उघाडीत एक टिनशेड करून घराचे आणि माझे ऋणानुबंधी राहतात. तहसील कचेरीसारख्या कचेरीत उमेद-वारी करीत करीतच घर मालक खलास झाला ! घराच्या मालकीवर पुढं झगडे माजले. तें घर आणि त्या घराच्या दैन्याचं प्रतीकच ठरेल अशी त्या घराची वयस्क, कष्टाळू, करपलेली, विधवा मालकीण यांच्या आमच्या कुटुंबियांत नात्यामुळें आठवणी निघतात. मी सर्वच जव-ळून पाहिलं आहे. 'एक हंगामी जागा' ही त्या घरमालकावरची गोष्ट आहे. 'ते तिघे आणि ती' – या कथेतली दुःखमना विधवा आणि त्या घराचे

झगडे माजविणारे उलट्या काळजाचे नमुने आले आहेत! कोणती गोष्ट कुठल्या किंवा कसल्या अनुभवावर आधारलेली आहे, हें कधी कुणाची जिज्ञासा जागी झाली, तर सांगतां येईल.

'रेशमजान' नावाची माझी गोष्ट प्रसिद्ध झाल्याच्या दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी एका तरुण मुसलमानानं अदबीनं वंदन करून प्रेमादराचं हस्तांदोलन केलं. त्याला या 'बंद्या' ची ओळख करून घ्यावयाची होती. 'रेशमजान' नांवाच्या माझ्या कथेचा एका डॉक्टर मित्रानं त्याला 'मत-लब' सांगितला होता. गावांत मुक्काम टाकलेल्या एका 'जान' च्या बैटकीत खांसाहेबाच जाणं येणं होतं अन् ते आपल्या 'जान' बरोबर 'रेशमजान' वरहि खूष झाले होते! मुंबईच्या एका वाचकानं तिचं उर्दू भाषांतर करण्याची परवानगी मागितली होती (पुढं काय झालं: माहीत नाही.) वाचनाची आवड असलेले एक पारशी गृहस्थ केव्हाहि भेटले तरी 'नमस्ते' असा प्रारंभ करून विचारतात, "काय, 'रेशम सकीना' सारखं आणखी एकादं चित्र?" माणसांना 'कुत्रे' म्हणणारी करटम खात्यांतली लैला ही तर सर्वत्र स्थानिक वाचकांच्या नित्य परिचयाची. "जग कुठं चाललं आहे!", "फाउन्टन् पेन", 'हिरवे गुलाब', 'बाबू दडके,' 'उत्पात', "नागझरीचे पाटील", 'असंच होणार होतं!'— अशा पुष्कळ, कथांवर समव्यावसायिकांची न् समवयस्कांची विविध भाष्यं ऐकली, म्हणजे मनाचे काही भाग फुगल्या सारखे होतात. आपले श्रम व्यर्थ नसावेत, असं वाटतं!

× × × × ×

गोष्टीची सुरवात, मध्य, शेवट या विषयांवर माझा अभ्यास मुळीच झालेला नाही. मला चांगली वाटली, तीच सुरवात! जिथं कथा संपवावीशी वाटली, तोच शेवट! प्रकरणशः लिहिलेली कादंबरी मला आवडत नाही. गुंतागुंतीत आणि उकलीत गुंतणं न् गुरफटणं चांगलं काय? भरून आलेलं मन रिकामं झाल्या सारखं वाटणार नाही, तोवर पात्राच्या प्रसंगाच्या किंवा दृश्याच्या वर्णनाचा ओघ का म्हणून थांबवावा? सामा-हिक परीक्षकांचा यामुळे रसभंग होतो म्हणे! आंबट शौकिनांना रस प्रतीती होऊं शकते?

लांबलचक मथळेच मला चांगले वाटतात. अन् अशा मथळ्याच्या कथा मी अगोदरच वाचतो! लिहून न झालेल्या गोष्टींच्या आठवणींत रमण्याचा माझ्या मनाचा एक चाळा आहे. 'सव्वीस जणांची साजणी' ही गोष्ट वाचण्यांत येतांच, 'सोळा जणांचा साजण!' या नांवाचं एक कथानक मला सुचलं होतं. कथा साकार करणारी दृश्यं रोजच्यारोज दिसतात. माझं कथानक आणि हीं दृश्यं वेगळीं नाहींत. आठएक वर्षांपासून तें कथानक आठवणींच्या कप्यांत निःशब्द मुरत आणि झुरत पडलं आहे. पिठाच्या गिरणींत काम केल्याच्या अनुभवावर मेकॅनिकल ओव्हर सियरची जागा मिळविलेले टिगळांच्या मुटांतले साहेब दरवर्षी Roller च्या तपासणीस आलेले मला दिसतात. अशाच एकाच्या, दोन दिवसांच्या दौऱ्यावर 'दो दिवसांचे दो प्रहरांचे'– अशा मथळ्याची एक कथा पांच सहा वर्षांपासून मी मनांत घोळवीत आहे. या कथेंतहि कुंभ आहेत आणि रंभा देखील. 'कमालखांचा चबुतरा', 'फोटोग्राफरची बायको', 'युद्धाला तयार रहा!' या संकल्पांचा असाच प्रकार आहे. कांही चेहरे दिसले कीं, त्यांच्याशी निगडित असलेली कथानकं खळखळूं लागतात. शब्दांच्या पलीकडे फुलून थांबलेलं हे मानसिक वैभव एकाद्या लघुनिबंधाचा विषय करावं, हा विचारहि टाळतां येत नाहीं!

पुस्तकाला सुगंध असावा, अशी एक सुंदर कल्पना वाचनांतून गेलेली आहे! कोणत्या कथेला कोणता कागद आणि रंग वापरावे, यावरहि थोडंस लिहून कल्पनांची हुळहुळी जिरवून घ्यावी, असं वाटतं. पण फार उंचीवरून बोलल्या सारख्या या गोष्टी होतील! कारण समुद्र सपाटी पासून या परभणीची उंची एकूण सांडेतेराशे फूट! येथे 'भव्य', 'दिव्य' असण्याची शक्यता आहे? मानवी समाजाला उच्चतर ध्येयं सांगायची अथवा नवी तंत्र सोषवयची संवय येथे कशी लागूं शकेल?

परभणींत कांहीं असो किंवा नसो! जीवन मात्र आहे! येथल्या वातावरणांत एकादा लेख न लिहला, तर उपाशी रहावं लागणार नाहीं. उपवास घडला, तर आपल्याला एक नवा अनुभव मिळाला या आनंदांत एकाद्या कथेची उभारणी होऊं शकेल. या भागांतलं जीवन मध्ययुगीन, संस्थानी आहे, म्हणून त्याच्या अनुभूतींत आणि आविष्कारांत कांहीं पाप

आहे काय ? येथल्या वातावरणांत अनाचार क्रौर्य आणि पशुता यांचं गडद आणि गढूळ मिश्रण झालेले 'अमीर' दिसतात. तसे दुराचारांच्या थरांत आणि भरांतहि मानुषतेची छटा वागविणारे जानकीराम हि आढळतात. या वातावरणांत रस्त्याच्या नळावरला धांगड-धिंगा मला ऐकूं आला, तशा बशीरबागेंतल्या उजेडांत न येणाऱ्या गोष्टी हि मला दिसल्या. येथल्या वातावरणांत अधःपतित 'पथनारी' आढळतात, तशा विश्वाला आधार होणाऱ्या महन्मंगल 'पुरनारी' हि दिसतात. सूर्याचं मिणमिणतं दिवटं कामांध रजनीच्या धक्क्यानं लवंडलं कीं, घाबरून जाणारी काळी राधा येथलीच ! परवाच्या महायुद्धानं ज्यांचा अधःपात केला, ज्यांना चढविलं आणि ज्यांच्या जीवनांत बिघाड आणला, तीं तीन चित्रंहि या परभणींतलीच !

माझ्या कथा कोणत्या आणि मी आजवर अनुभवलेलं जीवन कोणतं, हें मला सांगता येणार नाहीं.

परभणी

— बी. रघुनाथ

# पैसा कुठें जातो ? ● ●

वडवळच्या भररस्त्यांतून संध्याकाळीं नियमानं कांहीं कुत्री रडत असतात. पांच सहा वर्षांपूर्वी म्हणे, गांवांत प्लेगनं कहर उडविला होता तेव्हां कुत्र्यांच्या सायंकालीन विलापानंच त्या संकटाची सूचना दिली होती ! आणखी कांहीं दिवसांनी मुसलमानांच्या स्वातंत्र्याच्या घोषणा सुरू झाल्या न् नियमानं संध्याकाळी कुत्र्यांचं रडणं ऐकूं येऊं लागलं.

पोलीस ॲक्शन् सारखी महान् क्रांति झाल्यानंतरहि स्वानगीतांना पुन्हां बहर यावा हें नवलाचं नसलं तरी शंकाखोर मनाला उगीच चुरचूर लागत होती !

' भद्रेश्वरा ' च्या आळींतल्या रिकामटेकड्यांच्या अड्ड्यावर हा विलाप ऐकून कुणी तरी एक सुरवात करीत होता,

' दैवाचं आतां कसलं वाढण आहे ? '

' कांहीं विचारूं नका: पाऊस नाहीं ! पाऊस नाहीं म्हणून पेरण्या नाहीत. अन् पेरण्याच न झाल्यावर धान्य कुठलं ! धान्याचे भाव यंदा खात्रीनं कडाडणार ! '

हें हिशेबी सत्य बोलून दाखविणारा सरकार नियंत्रित धान्याच्या दुकानाचा कुणीतरी एक असतो.

गांव गप्पांचं बोलकं गॅझेट असलेला तिसरा म्हणत असतो,

‘ धान्य महागलं तरी तुझं दुकान बंद होत नाही. माळपांड्यांच्या घरी बारीक तांदळाचं महिन्याला एक पोतं न् मणभर साखर पाठविली की, तुझं ‘ लायसन् ’ [Licence] साबुत ! मरणाचा फेरा यंदा आम्हा रेशनकार्ड वाल्यावर आहे ... ! ’

दुकानदाराला थोडंसं राजकारणहि कळत होतं की काय न कळे ! त्यानं उत्तर केलं,

‘ लोकांचा जमाना आहे बाबा हल्ली ! तुम्ही कशाचे मरतां ! मरू आम्ही दुकानवाले ! माळ पांड्याचं न् आमचं आता पटत नाही बरं का ! त्यांची मर्जी आतां हिरालालवर ...... ! ’

भाषणाला खंड पडला तो प्रत्यक्ष हिरालालच येतांना दिसला म्हणून. हिरालालनं आपलं भाषण ऐकलं तर नाही, अशा शंकेनं दुकानदार थोडासा घाबरला की काय न कळे ! हिरालाल अलीकडे सावरण्यासारखेच प्रस्थ झाले होते !

पोलीस ॲक्शन झाले न् हिरालालचे महत्त्व वाढलं. नूतन अधिकाऱ्यांच्या दिवसा भरणाऱ्या मेळाव्यात पांढरी टोपी घालायची संवय केलेला हिरालाल टेकलेलाच ! रात्रीचं रंगदार रमलं कुठं सुरु होणार असलं अथवा उठून जाऊं लागलं तर तिथं हिरालाल नाही म्हणजे कसं शक्य होतं ! गांवांतली कॉंग्रेस कमेटी म्हणजे हिरालाल ! थोडक्यांत गांवांतलं ‘ गंगाजल ’ म्हणजे हिरालाल आणि गंगा नाच म्हणजे हिरालालच ! असं सांगतात की एका ३० जानेवारीच्या संध्याकाळी राष्ट्रावर कोसळलेल्या महान संकटाच्या चवथ्या पांचव्या दिवशी हिरालाल गांवभर फिरला. महात्माजींना सावरणाऱ्या तीनचार व्यक्तींपैकीं तो एक असल्याचं नासवीत होता अन् कंठ मोकळा सोडून दुःखोद्गार काढीत होता ! त्या प्रसंगापासून त्याच्या जीवनात थारेपालट झाला की काय कुणाला माहीत !

आज आतां या संध्याकाळी हातात साखरेची पुडी धरून महेश्वराच्या देवळाकडे येत असलेला हिरालाल म्हणजे अहाहा ...

पोशाक आधुनिक लोक-सेवका सारखा ! पदकमलांची तऱ्हा कोणत्याहि महान् सज्जनासारखी ! सबंध विश्वाचं कसं होणार ही काळजी !

मुंग्यांना घालण्यासाठीं हातांत वागविलेली साखरेची पुडी काय दर्शवीत होती ? भद्रेश्वराच्या दर्शनाचा हेतु काय सांगत होता ?

हिरालालला खरंच कांहीं अभौतिक अध्यात्मिक चिंता लागल्या होत्या?

★ ★ ★ ★ ★

रिकामटेकड्यांच्या अड्ड्यावरील रिकामपणच्या काळज्या अथवा श्रीमान् हिरालालजी सारखी गूढ वेदना मुळींच बाधणार नाहींत अशी वडवळमधील माणसं म्हणाल तर एक झुंगरी, दुसरें माळपांडे आणि तिसरा मन्या !

झुंगरी सकाळीं नवाला उठते. उठते म्हणजे डोळे किलकिले करून पहाते. खोलींतील प्रकाश तिच्या मुस्ताळ डोळ्यांतून प्रेरणा घेऊनच प्रगटतो आहे असें वाटतें. केसाचं उग्रट तेल उशीवर झिरपल्यासारखं दिसतं. केशरचना ढिली झालेली असते. हिरव्या रंगाची पातळ चौकटी चादर अर्ध्या अंगावर आलेली असते. निद्रेनं जागृतीचं चित्र काढतां काढतां अर्धवट सोडलेलं असतं कीं काय कळत नाहीं. जें अनावृत्त आहे तें विलोभनीय तर दिसतंच पण हिरव्या चादरीच्या आवरणाखालील अस्पष्टतेंत रम्यतेच्या कित्येक आवर्तनांना अवकाश आहे असं वाटल्यांवाचून रहात नाहीं !

बैटकीसाटीं टाकलेल्या चादरीला चुंण्या पडलेल्या दिसतात. पानाच्या तबकांत पानाचे एक दोन विडे सुकून नाहींतर तसेंच उलगडून पडलेले असतात. पलीकडच्या कोपऱ्यांत दाहंयावर डग्गा पालथा रचून टेवलेला दिसतो. तिच्या उशाच्या बाजूला पैशांची लहानशी पेटी अर्धवट उघडीच असते. एकेक रुपयाच्या नोटा झांकणाच्या सामटींतून बाहेर डोकावतात. झुंगरीला कसलीच काळजी नाहीं ! धान्य महागलं, पाऊस न पडला अथवा माळपांड्यांची मर्जी हिरालालवर बसली तरी जीवनांत कांहीं बदल होईल हें संभवत नव्हतं !

झुंगरी ज्यावेळीं प्रकाश पहात असते त्यावेळीं माळपांडे आत्मदर्शनात आणि आत्मनिरीक्षणांत मग्न असतात !

तालुक्याच्या अधिकाऱ्याचा बंगला ! वडवळच्या डाक बंगल्यांतलं सजावटीचं सामान आणून सजावलेलं त्यातलं माळपांड्यांचं ड्रेसिंग रूम !

माळपांड्यांनीं दाढी आटोपून नुकतांच बदामाचा शिरा चापलेला असतो. भिंतीवर कांहीं नवे जुने फोटो टांगलेले आहेत ! ते तसें लटकाविण्यांत सहजच कालानुक्रम साधला आहे कीं काय न कळे ! पहिल्याच फोटोंत कुठल्याशा मूर्ख आणि स्तुतिप्रिय साहेबांच्या पाठीमागे माळपांडे उभे आहेत. 'कुऱ्हाड' प्रांतांतल्या आगपूर गांवांत काढलेला फोटो तो! माळपांडे त्यावेळी हेडक्लार्क होते! त्या जागेवर कुत्रे घासी करतां करतां माळपांड्याच्या अंगातलं रक्त झिजून गेलं होतं. त्या वेळचे पर्शियन कोटांतले किडकिडीत माळपांडे आणि आजचे सकाळीं बदामाचा शिरा खाऊन नव्या पद्धतीचा कोपरी कोट आणि डोक्यावर इंग्रजी टोपडं घालून 'जिपड्यां' त फिरणारे माळपांडे, यांत केवढं अंतर होतं ! माळपांड्याचं त्यावेळीं पेपरवेट इतकंहि वजन नव्हतं ! आतां त्यांच्या अंगांत माज आणि रंगांत तकाकी चढली होती. पूर्वी इंग्रजांची राजवट होती ! आतां स्वतंत्र भारताचा कारभार होता ! तालुक्याच्या कारभाराचं सगळं स्वातंत्र्य माळपांडे अनुभवीत होते.

माळपांड्यांनी वडवळच्या सर्वाधिकाऱ्याचा चार्ज घेतला आणि दिल्लीतलीं सर्व सूत्रं आपल्या हातीं आहेत अशा डौलानं कार्याला आरंभ केला. वडवळच्या जुन्या सरकारी नोकरांना कांहीं. कळत नसलंच पाहिजे, हें तें समजून होते. धमक्यांचं इंग्रजी धोरण प्रारंभी त्यांनीं हाताळलं अन् मग त्यांचे हात 'ओले' होऊं लागले. आगपूर गांवांतल्या नातेवाईकाशीं होणारा त्यांचा पत्र व्यवहार 'अर्थगर्भ' होऊं लागला. तीस जानेवारी आणि दोन ऑक्टोबर रोजी माळपांड्यांचीं वडवळमध्यें जाहीर भाषणं झालीं. महात्माजींचं स्मरण आणि स्तवन करतांना त्यांचा गळा भरून आणि सुजून आला ! त्या प्रसंगीं ते बेसुमार बोलले. सारखे बोलत राहिले. त्यांना आपली वाणी आवरतां येईना तसा गळा देखील ! (ते प्याले होते असं कांहींनी उठविलं होतं तें खोटं असावं) नंतर दोन दिवसांची रजा घेऊन त्यांना आपली प्रकृति सुधारून घ्यावी लागली. 'युग पुरुषाचं धोरण' आणि 'पंडितजींची पुण्याई' या माळपांड्यांनी घोषित केलेल्या शब्दांचा लोक काय पण अर्थ काढूं लागले ! लोकशाही राज्यकारभारावर टीका व्हायचीच असा समज करून माळपांड्यांनी बदा–

म्हाऱ्या विन्यान दैनिक क्रमाला आरंभ करावा हें अगदी ठरून गेलं होतं.

* * * * *

मबूकाचं प्रकरण या दोघांपेक्षां निराळंच आहे ! पस्तीस छत्तीस वर्षांच्या काळ्या कुळकुळीत उघड्या बंब गलेलठ्ठ दिसणाऱ्या माणसाला मबूक्या हे नाव गांवकऱ्यांनीं दिलं होतं. त्याच्या नांवागांवाचा कांही ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही.

सकाळपासून त्याची घरोघर फेरी सुरू असते. 'मायसाब' अशी प्रत्येक गृहिणीच्या नांवानं ललकारी टोवून तो क्षणभर थांबतो. काळवेळेचा सद्विचार नेहमी करीत आलेल्या एखाद्या दयाळू म्हातारीकडून शिळे तुकडे पडलेच तर त्याच्या पदरांत पडतात !

त्याच्या कानावर पडणारी मुक्ताफळेंही कमी मासलेवाईक नसतात !

"काकोबानच टेघल्या आहेत नोकरी करून ! " हे अर्धहीन सौम्य उत्तर अगदीच सामान्य झालं.

खाजगी बैठकीत अन्नधान्यावर वडावदाचा वादविवाद करणारा एखादा शिक्षित रिकामा म्हातारा त्याला दम भरतो,

" अरे ! सर्वाधिकारी माळपांडे आहेत का तुझ्या ओळखीचे ? आमचं कल्याण करायला आले आहेत ते ! त्यांना जाऊन सांग, घरोघर तुझ्या नांवानं रेशनकार्डावर प्रोव्हिजन करा म्हणावं ! चल नीघ ! पुढारी उपास करायला मागत आहेत ! भिकारी भीक मागताहेत ! पांढरपेशांनी काय करावं हे सांगितलं नाही कुणी. . . ! "

मबूक्या निर्विकार चेहऱ्यानं परततो ! गांवांत मध्यावर असलेल्या चौकांत येई तों दुपार होते. सार्वजनिक नळाजवळ त्याचं लंच आटोपलेलं असतं, चौकांत एखादा थर्मास तुकडा मिळाला तर तो पहात असतो. त्यावांचून त्याचं अडतंच असं नाहीं ! तरं फार श्रम न करतां तो तुकडा त्याच्या पायाशी येऊन पडतो. ! रमत गमत स्वारी निवासाला येते ती थेट झुंगरीच्या दारापुढं.

रात्री दहापासून झुंगरीच्या घरांतला दिवस सुरू होतो. झकक रोषणाई, सुंदर बिछायत आणि जिच्याशी चावटपणानं बोलतां येईल, जिच्याकडे

सविकार पाहतां येईल अशा गायिकेचं संगीत ! धान्याच्या काटकसरीवर व दुर्मिळतेवर व्याख्यान देणारे न् मवाल्याला खेसकून बोलणारे तेथें प्रवेशतात ! हिरालालचा द्वेष करणारे मधून मधून त्या घराची पायरी झिजवतात ! मुंग्यांना साखर टाकणाऱ्यांची साखर झोप तिथेंच उडते. जदामाच्या शिऱ्यानंतर एकाद्याच्या मुखशुद्धीला तिथलं पान सहज परवडतं !

बैठक भरली म्हणजे मवश्या पायरीच्या अगदीं जवळ येऊन पहात आणि ऐकत असतो. त्याच्या सभोंवती अंधार पसरलेला असतो तो कदाचित त्याच्या नित्याच्या अनुभवाचा कटुतर वर्तमान असावा ! प्रकाश, प्रलोभन, प्रसाधन आणि प्रमादाचीच भूमि असलेल्या अर्धवट उघड्या प्रवेशद्वाराला स्वप्नभूमीचाच मार्ग म्हणता येईल ! मवश्या हें सर्व उघड्या डोळ्यांनी पहात असतो. भुंगरी लाडिक आवाजांत आणि झोंकदार उठावांत गात असते,

" सजणारे ऽ सांज झाली – "

हळूहळू मवश्याला चलत्सृष्टीचे आवाज ऐकूं येत नाहींत. दृष्टीला फक्त स्वप्नभूमीची सजावटीच शोभेल अशी दृश्यें दिसते आणि श्रुति-भोंवती सुस्वर भिरभिरत असतात.

" सजणारे ऽ सांज झाली "

चित्रपट सुरू होण्यापूर्वी दोन तीन सूचनेच्या घंटा होत असतात ! बहुमुखी गीतांच्या ध्वनिमुद्रिका आलटून, पालटून लावल्या जातात. मग 'रामदास बिडी', 'शिवाजी मलम', 'औरंगजेब मासू फॅक्टरी' अशा स्थानिक जाहिरातींची रांग सरकते.

वडवळ मधील महान् ( ? ) चित्रपटाला असाच प्रारंभ झाला होता असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं ! घंटांचं काम सायंकालीन स्नानविला-पानं केलं होतं. स्थानिक अधिकाऱ्याविरुद्ध होणाऱ्या ध्वनिमुद्रिका आलटून पालटून लागत होत्या. लहान लहान चोऱ्या व्हायला आरंभ झाला होता. धान्याची तूट जाहीर केली गेली होती. कारण धान्याच्या सांठ्यांनी दूरे गोदाम जवळ केले होते. भूक भिक मागत होती. रिकाम्या पाक पात्रांतून भूक खणखणत होती ! उकिरड्यांत दारोदार फिरून कांहीं मिळालं नाहीं तर

भूकं अंधारांत अत्याचार करींत होती ! कुठं कांहींच लभ्य झालं नाहीं तर चामडीच्या मुरकुत्यांतलं पाणी चाटून भूक हाडं आंतल्या आंत चघळून टाकीत होती ! शील आणि सदाचार नग्न आणि निर्लज्ज होऊन फिरत होते !

काळा बाजार उघडा झाला होता ! पुढारी खूप गर्जत होते अन् चापून जेवत होते. अधिकारी बदामाचा शिरा खाऊन 'वर' चाईट रिपोर्ट करून मोकळे होत होते !

माळपांड्याचं जाहीर व्याख्यान झालं. भाषण रंगलं. कारण बदामाचा शिरा खाऊनच ते केलं होतं. माळपांड्याचे तालुकाभर दौरे झाले आणि ते फार यशस्वी ठरले असा पोबारा केला गेला. प्रत्येक मुक्कमांत लोण–कढ्या तुपाची माळपांड्यासाठीं व्यवस्था राखली गेली. ह्यांतच त्या यशाचा निम्मा वांटा होता !

काळ्या बाजारासंबंधी माळपांड्यांनी केवढं कडक धोरण स्वीकारलं होतं ! भर दुकानदार आणि टेच डांबून ! हा प्रकार सारखा चालू होता. साखर, तांदूळ, गहूं असं नगदी मालाचं एकेक पोतं कुठं आढळत होतं न् जप्त केलं जात होतं ! अमका एखादा खाद्य पदार्थ घरीं कमी आहे असं कळलं कीं माळपांडे या मोहिमेवर निघत होते. मोहीम व्हायची त्या पद्ध–तीनं यशस्वी झाली की दुकानदार जमानतीवर मोकळा होऊन कोर्टाच्या एकदोन चकरा करीत होता न् पुन्हां दुकान लाऊन नव्या दमानं कमाई करीत होता ! झुंगरी जवळपास हपीसराच्या बदलीच्या निमित्तानं कार्यक्रमाला जात होती न् परत येत होती ती नोटांची पुडकी घेऊन ! थकून भागून आल्यामुळं हातरुमालांत बांधलेली कमाई गादीवर तशीच अर्धवट उघडी पडत होती. रात्रीच्या उजेडांत तिच्या सौंदर्यासारखीच संपत्ती बेपर्वाईत पडंत होती ! मन्या हें पहात होता न् फाटक्या बोऱ्यावर उरलेली रात्र काढीत होता ! अलीकडच्या भुकेच्या कल्लोळांत त्याची थोडीशी फजीती होऊं लागली होती. झुंगरी कार्यक्रमासाठीं बाहेरगांवीं गेली होती न् भीक मागणारे फार झाले म्हणून आणि कालमान चांगलं राहिलं नाहीं म्हणून हिरालाल घराच्या पिछाडीचे दरवाजे रात्रीं सातलाच काळजीपूर्वक बंद करीत होता.

मबद्याचे हे दोन भरंवशाचे अन्नाचे वरवे बंद झाल्यामुळं गांवभर फिरुनहि त्याला कांहीं लाभ होत नव्हता.

चौकांतल्या नळावर पाणी पिऊन नं मिळतील तेवढे बिड्या सिगरेटचे तुकडे ओढून तो रात्री आठला आपल्या निवासाला परत आला. दूरवर रस्त्यावरचा दिवा मिणमिणत होता. त्याच्या उजेडांत त्यानं आपला फाटका बोऱ्या साफसूफ करुन पसरला. ॲल्युमिनियमचा गंजलेला कटोरा उशाला घेतला. आणि गोधडीखाली पाय लांबविले. शरीराच्या कुठल्याच भागावर ती धडपणें पुरली नाहीं. कांहीसं हुडहुडत मबद्यानं डोळे मिटले. उपाशी पोट कणाकणांतून टाहो फोडीत होतं; जेवण्याचा अंमल आपोआप डोळे मिटवीत असे, असा त्याचा नित्याचा अनुभव होता. आज डोळे मिटून घेतले तरी झोप येत नव्हती. रस्त्याच्या उघडलेल्या खिडीवरुन एक टांगडं हळूंहळूं खळाळत जात होतं. दूरवर कुठला तरी एक मुसलमान मक्कामदीनाचे स्तवन गात होता. जवळच्या उकीरड्यावर एक गाढव उगीच फुरफुरत होतं! हिरालालच्या घराचा पिछाडीचा दरवाजा बंद होता. आंत दूरवर पाक पात्रांच्या उचलण्या धुण्याचा आवाज येत होता. त्या पात्रांतून सुग्रास अन्न शिजविलं गेलं असावं! मबद्याला त्याचा वास आल्या शिवाय राहिला नाहीं. मबद्यानं आपली कल्पना आणखी ताणली, पदार्थांची नावं, त्यांचे रंग, रुप, रुचि त्याच्या दृष्टीपुढे आणि जिभेवर क्षणभर तरळली. पण कल्पनाच ती!

थकावटीनं त्याला आतां ग्लानि येत होती- झुग्गीचं दार आज उघडणार होतं का? हळूं हळूं ग्लानी वाढूं लागली. त्याची चिंतनं तिच्यापर्यंत पोंचली कीं काय न कळे. बंद दाराचा अडोसा एकदम निखळून पडला. उजेडाचा घरभर लखलखाट दिसूं लागला. बिछायतीचा सारा साज सभा संपून गेल्यानंतरचा होता. नोटांचे कागद इकडं तिकडं निष्काळजीपणे पडले होते. झुंगरी झुकून गिरदीला टेकून बसली होती. नोकर दार बंद करणार इतक्यांत तिनं त्याला म्हटलं,

'अरे, त्या मबद्याला कांहीं वाढलस का?'

नाहीं असं उत्तर येतांच तीं थोडीशी संतापली कीं काय नकळे! तिनं आजूबाजूच्या नोटा सांवरल्या, आणि नोकराच्या अंगावर भिरकावून त्यां

मवाल्याला खावयाला सांगितल्या ! हेतु हा की मवूल्यानं त्याचे खाद्यपदार्थ आणावे आणि खावे ! इतक्यांत खाडकन् एक पेटी मवूर्यापुढं आदळली.

आतां मात्र मवूर्या जागा झाला होता. रस्त्यावर जिकडं तिकडं शुकशुकाट होता. मध्यरात्र उलटून गेली असावी. हिरालालच्या दारापुढें दोन तीन माणसं कुजबुजत होतीं. चोरी ? डोळे ताणून मवूर्या एकेकाची आकृति नीट पाहूं लागला. हिरालालनं हलकेंच दार उघडलं कीं कुणास ठाऊक ! हा तोच ! त्याची उघडीचंच स्थूल आकृति ओळखूं येण्यासारखी होती ! आगपेटी ओढली जाऊन मवर्याजवळ पडलेली पेटी उचलली गेली. उकीरडा असल्यामुळं मवूर्याच्या गोधडीला निरगुटं पडली असावींत असं मानलं गेलं असावं. किंवा माईन तिकडं लक्ष गेलं नसावं. मग दार एकदम बंद झालं आणि पूर्वीसारखाच शुकशुकाट पसरल्या सारखा वाटला !

झुंगरी आली नव्हती. सकाळीं नेहमीं सारखी मवूर्याची गावफेरी सुरू झाली. एका पोलीसाचं त्याच्याकडं लक्ष गेलं आणि ठाण्याकडं त्याची खेचाखेंच सुरूं झाली. सरकारीरीत्या भिकाऱ्यांना जेवूं घालण्याची कांहीं खास व्यवस्था तर नव्हती ? ठाण्यावर आणखी काही माणसं धरून आणली होतीं. शिव्यांचा नं दंड्यांचा वर्षाव होत होता. निरपराध वेदना चित्कारून उठत होत्या ! सरकारी संतार खवळून अंगावर तुटून पडत होता ! कालच्या रात्रीचा प्रकार जसा अद्भुत तसा आतांचा हि !

मवर्याच्या अंगावर दोन काठ्या बसल्या. आणि तो शुद्धीवर येतांच ठाण्या बाहेर पडला तेव्हां त्याला कळलं की माळपाड्याच्या घरी काल रात्री चोरी झाली होती. आणि आजचा हा देखावा केवळ चोर सांपडावा म्हणून सुरूं होता. मध्य रात्रीच्या सुमारास हिरालालच्या घराचं पिछाडीचं उघडलेलं दार, कुजबूज, जमीनीवर आदळलेली पेटी आणि हलकेंच दार बंद केल्यावर झालेली सामसूम या सर्व गोष्टी मवूर्याला आठवल्या शिवाय राहिल्या नाहीत. पण ' आऽह अथाई ' या उद्गारा खेरीज त्याला कसलीच वाच्यता करतां येण्या सारखी नव्हती !

ठाण्यावर असा प्रकार घडत होता. माळपाड्यांच्या घरीं वेगळं ' दृश्य होतं ! गांवांतली शिष्ठ मंडळी चौकशीला येत होती. मुंग्यांना टाकण्यासाठी हातांत साखरेची पुडी आणि चुवट खादीचा पोशाख अशा थाटात

हिरालालजी त्या मेळाव्यात आले. चोर कुठून आला, व केव्हां आला, कसा आला आणि कसा घराबाहेर पडला या विषयींच्या बारीक सारीक तपसीलांची चर्चा झाल्यावर पसार झालेल्या ऐवजाच्या किंमतीचे अंदाज बांधले गेले. शेवटीं हिरालालजी गांभीर्यानें म्हणाले.

‘ महात्माजीनं कल्पिलेला (?) माणुसकीचा नमूना आजच्या संक्रमणाच्या काळांतहि आढळणं कठीण नाही ! (म्हणजे काय ?) चोरानं आपणहून मुद्देमाल परत केला आणि इनामादाखल कांहीं रक्कम मागितली तर आपण त्याला शिक्षा कराल ? रामराज्यांतल्या रीतीभाती अशाच असाव्या अशी माझी कल्पना आहे ! ’

माळपांडे उत्तरले ,

‘ जे गेलं तें फारसं नाहीं ! ज्याचं होतं त्यानं नेलं ( धन्य ! धन्य ! ) चोरानं तें परत आणून द्यावं इतक्या किंमतीचं नव्हतं ! चोराचीच त्यावरून किमत कळून येईल ! ’

नंतर माळपांडयांनी हास्य केलं त्यांत औदासीन्य किती होतं, हळहळ किती होती आणि बेफिकिरी किती याचा जाणत्या श्रोत्यांना अंदाज लागणं कठीण नव्हतं !

गांवांतली इतर चावट माणसं मात्र निराळंच कांहीं तरी कुजबुजत होती न् मोठयानं हंसत होती.

चित्रपटाची एक ‘ रील ’ अशी संपली होती.

या चोरीसारखाच ग्रामचर्चेला आणखी एक विषय मिळाला.

झुंगरीचा अंत ! गांवांच एक लेणंच जणूं काय नाहींसं झालं होतं !

झुंगरी परगांवच्या कार्यक्रमाहून परत आली ती आजारी होऊन ! डॉक्टरची ये जा सुरू होती. दवा पाणी चालू होतं. मबद्या दोन तीन दिवसापासून उपाशी होता. त्याची अन्नदात्रीच आजारी पडल्यावर जेवून तरी काय करायचं होतं ! दार उघडलं गेलं कीं तो डोकावून पहात होता. रात्रीं फटींतून येणाऱ्या प्रकाशरेषांचा आधार घेत मनोमन तो आंत प्रवेश करीत होता. ‘ सजणारे सांज झाली ’ हे गीत ज्या लाडिक आवाजांत निघत होतं तो आवाज आतां नुसता कण्हत होता आणि हुंकार टाकीत होता ! त्याच्य

स्वप्नभूमींत विध्वंसाचा प्रवेश झाला होता ! माणसांची घाबरट कुजबुज निघत होती ! जाण्यायेण्याचे, घाईचे आणि कर्णकटु आवाज निघत होते. स्वर, ताल, लय आणि सौंदर्य यांना जणुं आवकाशच नव्हता ! काय केलं म्हणजे पूर्वीची अवस्था प्राप्त होईल, हें मबग्याला कळत नव्हतं !

अखेर तो एका रात्रीं उठला आणि दार ढकलून त्यानं आंत प्रवेश केला. आभाळाच्या छता खेरीज कांहींच पाहिलं नाहीं असा माणूस राजवाड्यांत प्रवेशला तर क्षणभर थक्क व्हावा यांत नवल नव्हतं ! मबग्याची अशीच अवस्था झाली. घरांत सर्वत्र सामसूम होती. हिरालालच्या दारापुढं मध्यरात्रीनंतर अनुभवलेली सामसूम आणि आतांची सामसूम यांत महदंतर होतं. मबग्या या शांततेंत विश्वासानं प्रवेशला होता. त्या शांततेंत भयाणतेचे ठोके पडत होते. म्हणूनच मबग्याचं काळीज जोरानं थडाडलं होतं. येथें शांततेचा खराखुरा साक्षात्कार होता ! देवळांत त्याला कधीं काळीं प्रवेश मिळाला होता किंवा नाहीं कोण जाणें !

आंतल्या खोलींत त्यानं डोकावून पाहिलं. झुंगरी त्याला लवकर दिसली नाहीं. मंद केलेल्या दिव्यांतल्या प्रकाशांत प्रथम त्याला तिची पैशाची पेटी दिसली. आणि मग पुष्कळच अलीकडं झुंगरीची निद्रामग्न आकृति अपुऱ्या प्रकाशांत दिसेल तेवढी त्यानं पाहिली आणि मग त्याच्या कामनेला दृष्टि आली !

तिच्या अंगावर नेहमीची हिरवी ओढणी होती कीं काय न् कळे ! मऊ उशांनी तिला दिलेला आधार अपुरा तर नव्हता ? मंद प्रकाश, मानसिक गोंधळ निवविणारी शांतता आणि अशा वातावरणांत निश्चिंत झोपलेली ती युवती पाहून मबग्याला हंबरडा फोडून म्हणावसं वाटलं असावं,

'अन्नदात्री ! जागी हो ! रुग्णावस्था सोड आणि या दलिताचा उद्धार कर !'

जन्मांत कधीच न रडलेला मबग्या सकाळीं तिच्या दारांपुढं बसून मात्र मुळमुळत होता !

रीतसर व्हायच्या त्या गोष्टी झाल्या. उल्लेखनीय घडलं तें असं होतं.

झुंगरीचं घर हिरालालच्या मालकीचं झालं होतं. झुंगरीची आई हिरालालच्या वडिलांची रखेली ! त्यांनींच तिला तो वाडा राहण्यास दिला होता. हिरालालनं घराला एक जाड जूड कुलूप ठोकलं आणि तिची पेटी आपल्या घरांत नेली जाईल अशी काळजी घेतली ! मबद्यानं सर्वच प्रकार न्याहाळला होता. मग कांहीं रात्रीं तो बंद दाराशीं बसून कानोसा घेत असे. क्षणभर घरांत प्रकाशाचा लखलखाट दिसत होता. लाडिक आवाजांतलं गाणं श्रुतीवर पडत होतं ' सजणारे सांज झाली ऽ ' —— मध्यरात्र होत होती. नोटांचे कागद इकडं तिकडं पसरत होते. झुंगरी थकून आंथरूणावर पडत होती अन् हिरालाल हलकेंच येऊन नोटांचे कागद जमवून पांढऱ्या मद्ऱ्याच्या खिशांत कोंबीत होता न् घाईनं निघून जात होता !

★ ★ ★ ★ ★

वडवळांतला सरकारी अंमल आतां कडक आणि कायदेशीर होत चालला होता ! राज्यव्यवस्थेचा सकाळ संध्याकाळ अक्षरशः वाजा वाजत होता ! अधिक प्राकृतांत बोलायचं झालं तर एक कळकट आणि खप्पड चेहऱ्याचा म्हातारा माळपांड्यांचे नवनवे वटहुकूम सकाळ संध्याकाळ रस्त्यांतून पुकारीत जात होता. त्याच्या तोंडांत दांत नव्हते. ( अलीकडच्या राज्यव्यवस्थेचा तो परिणाम असावा. ) दंवडी पिटवतांना तो काय बरळत होता हे लोकांना कांहीं समजत नव्हतं. लोकांना समजून तरी काय करायचं होतं ? कायद्याची घोषणा, पालन आणि अंमल बजावणी कशी व्हावी आणि कशी करावी हें सांगण्याचें आणखी निराळें कांहीं मार्ग होते ? जुन्या दुकानांचे लायसन्स रद्द होत होते. नवीं दुकानं कायम होत होतीं. वडवळच्या आसपासचा सारा व्यापारी कारभार हिरालालच्या नांवें होता. मिळकतीचा फार मोठा भाग गुंतून पडला होता न् तो तसाच अचल राहिला तर त्याच्या कित्येक पिढ्यांचं अन्न वस्त्र बंद होणार होतं. माळपांडे चोरी झाल्यापासून बिथरले होते. हिरालालच्या लायसन्सवर गदा आली. कांही तरी अप्रिय घडणार असं वाटूं लागलं !

मबद्याच्या कानांवर ही बातमी पडली. हिरालालच्या घरांपुढं बसून तो जोर जोरानं हंसूं लागला. त्याला वेड लागलं होतं ? झुंगरीच्या निघ-

नानंतर लोक तरी असंच समजत होते ! झुंगरीच्या घरापुढून ती सारखा चकरा करीत होता. हिरालालच्या घराच्या पिछाडीच्या दाराला ठोठावीत होता आणि मग सरळ पुढल्या दारानं हिरालालच्या घरांत प्रवेश करीत होता. झुंगरीची मिळकत हिरालालनं लांबविली होती. ती व्यवस्थित आहे कीं नाहीं हें पाहणं, तिचं रक्षण करणं मबद्याचं काम नव्हतं ? जवळ पास एकादा बघ्या असला तर हिरालालजी बैठकींतल्या महात्माजींच्या फोटोकडं पहात. नंतर मबद्याकडं नजर वळवीत. सहानुभावाचे समुद्र त्यांच्या नेत्रांत भरले आहेत असं वाटे ! मग एका नोकराला बोलावून ते मबद्याला जेवण द्यायला सांगत !

शेटजीचं लायसन्स जप्त झालेलं ऐकतांच मनमोक्त हंसल्यावर मबद्यानं घरांत प्रवेश केला. बैठकींतल्या मुनीमांनीं विशेष लक्ष दिलं नाहीं. कारण त्याचं येणं आणि आंतल्या अंगणांत जाणं नित्यांच झालं होतं ! गृहिणी पाकसिद्धींत दंग होत्या. अंगणांत लिंबाखालीं खुंटाला एक कालवड बांधली होती. मबद्यानं वर माडीकडं लक्ष दिलं. हिरालालजी दोन्ही हातांत डोकं धरून बसले होते. जणुं एकादी संकट परंपराच त्यांच्यावर कोसळली होती. जरा वेळानं ते उठले. गजाळीच्या खिडकींतून मबद्याला दिसत असलेली तिजोरी त्यांनीं उघडली. काय चमत्कार ! झुंगरीची पेटी त्यांत होती. आणखी इतर ऐवज होते ! बराच वेळ शेटजी रक्कम मोजत होते. सदऱ्याच्या आंतल्या खिशांत त्यांनीं कांहीं तरी कोंबलं. तिजोरी बंद केली आणि डोक्यावर खादी टोपी चढवून ते खालीं उतरले. विचाराच्या भरांत मबद्याकडं त्यांचं लक्ष जाईल हें कसं शक्य होतं ? मबद्यानं त्यांचा मागोवा केला. हिरालाल निघाला तो सरळ माळपांड्यांच्या घरीं.

अर्ध्या पाऊण तासानंतर शेटजी बाहेर आले. जातांना ते जेवढे खिन्न, विचारमग्न होते तेवढेंच परततांना सुप्रसन्न दिसत होते. जणूं विघाड व्हायला आलेल्या एकाद्या महान योजनेला सुव्यस्थित चालविण्याचे ते बळकट प्रयत्न करीत होते !

एक दोन दिवसानंतर गांवांत साधार बातमी पसरली होती, ' हिरालालचीं दुकानं कायम ठेवली गेलीं ! '

शेठजी शत्रूंच्या आणि मित्रांच्या मेळाव्यांत लीनतेनचं पण टांमून सांगत होते,

ज्या दिवशी खादीची टोपी या डोक्यावरून उतरेल त्याच दिवशीं माझीं सारीं दुकानं खाक होऊन जातील ! अंगावर खादी आहे तोंवर मला मनाची शुद्धी राखतां यावी म्हणून देवानंहि मदत करावी अशी प्रार्थना आहे ! '

बिचारा मबद्या ! तो मिळेल ते खात असतो. जागा सांपडेल तिथं पडत असतो. कधीं डोळा लागलाच तर दूरवरून अस्पष्ट ललकाऱ्या येत असतात, ' सजणारे सांज झालीं ! ' मग हिरालालच्या घराचं पिछाडीचं दार उघडलं जातं अन् पैशाच्या पेटया हलकेंच घरांत पसार होतात ! माळपांडयांच्या घरी चोरी झाली असा आकाशभेदी आवाज होतो अन् मबद्याच्या अंगावर पोलीसी दंडुक्याचे प्रहार होऊं लागतात. "अन्नदात्री! मला वांचव ' असं कांहीसं म्हणण्यासाठीं तो किंचाळतो तोंच, नोटांच्या थरांवर झुंगरी गत प्राण होऊन पडलेली त्याला दिसते. हिरालाल घाईत येतो न तिचा सुकुमार देह दूरवर फेकून नोटा सांवरूं लागतो ! हिरालालचं सरकारी दुकान बंद झालं म्हणून कुणीतरी रस्त्यावरून ओरडत जातं न् हिरालाल खिसे भरून हलकेंच माळपांडयांच्या घराच्या रोखांत निघतो !

मबद्याला जाग येते ! कुठं कांहींच दिसत नाहीं ! कुत्र्याचं रडणंच काय तें त्याच्या कानीं येतं !

---★---

# किशी ● ●

तिकडे लढाईचें रणशिंग वाजलें अन् इकडे किशीने आपल्या अस्तित्वाची घोषणा केली! जबरीने भरती केलेल्या, अपुरें खाऊन शत्रूवर प्रतिप्रहार करण्यापूर्वीच धारातीर्थी पतन पावलेल्या, लक्षावधी माणसांच्या आशा, आकांक्षा आणि आवेश घेऊनच किशी जन्मली होती की काय न कळे!

किशीला मेंदू आला. किशीला हातपाय आले. किशी माणसें ओळखूं लागली. हे वडील, ती आई, ही आजी, हा तमका, तो फलाणा, हें ती जाणूं लागली. नेत्राना जेवढें दिसूं शकतें तेवढें पाहूं लागली. त्यांतलें आवडलेलें साध्य व्हावें अशी इच्छा बाळगूं लागली. रसनेंद्रिय ही काय चीज आहे हें तिला समजूं लागलें. वडील माणसें आपली इच्छितें मिळवूं देत नाहीत हें तिच्या लक्षांत येऊं लागलें. जें मिळवायचें त्यासाठीं ओरडणें, उद्घोष करणें, हा आजच्या युगाचा धर्म आहे हें देखील तिला कसें समजलें कुणाला ठाऊक! जें मिळत नाही त्यासाठी बेधडक ती रडूं – ओरडूं लागली!

जन्मापासून तीन – साडेतीन वर्षांच्या कालांत तिच्या सर्वांगीण प्रगतीचें मान येथवर आलें होतें!

तिच्या पाठीवर कुणाचा अवतार संभवेल अशीं चिन्हें दिसून आलीं नव्हतीं. त्यामुळें तिचा ' प्यायचा ' अधिकार अबाधित होता. त्याबद्दल व्हावी तेवढी अरुचीहि निर्माण झाली नव्हती.

एकदा तिच्या आईला आजार झाला. आजीने सांगितलें, ' किशे, आई आजारी आहे ! तिला उगीच त्रास देऊं नकोस ! ' किशीने एक – दोन वेळां तोंड लावून पाहण्याचा प्रयत्न केला. आईचें अंग शुष्क झालें होतें. रक्ताचा सांठा कमी झाला होता. आपल्या अतृप्त आतुर ओठांनी ' दूधसागर ' हेलावण्याचा तिने प्रयत्न केला, पण रसहीन फळें कुरतडण्याची आईने तिला सप्रहार बंदी केली. मग भेटायला येणाऱ्या स्त्रियांकडे ती पाहूं लागली. त्यांतल्या एक – दोन तिला आवडल्या. विश्वजननीचें संवर्धनाचें ऐश्वर्यच त्या ल्यायल्या होत्या की काय न कळे ! उठावें न् त्यांच्या प्रफुल्ल रसनिर्भर पदराआड दडावें असें किशीला वाटत होतें. ईश्वरानें किशीचें दैन्य जाणलें असावें. तिची आई बरी झाली – तिने मनोमन ठरविलेल्या मातेसारखी ! किशीचा खंडित कार्यक्रम जोराने सुरू झाला.

या आणि अशाच इतर गोष्टीमुळे आईचें न् तिचें कधीच जमत नव्हते. सामान्य घरांत सकाळीं गृहिणींचीं कामेधामें आटोपायची नुसती गडबड चाललेली असते. किशीच्या घरीं ती तशी चालू असे. तासभर पाणी सोडणाऱ्या बारीक धारेच्या नळावर ब्राह्मणांचीं पांच – सहा बिऱ्हाडें आहेत. घागरी लावण्याची गडबड चालू आहे. बायकी बाचाबाचीचा गोंगाट ऐकूं येतो आहे. ओंवळयाच्या न् सोवळयाच्या पाण्यासाठीं जीव टाकला जातो आहे. सकाळचीं खोडकर किरणें किशीला डिवचून जागी करताहेत. अर्धवट मिटल्या डोळयांनी किशी आईला हाका मारते आहे. अन् आई हाकेला जागत नाही असे पाहून किशी उठून बसली आहे न् तिने भोकाड पसरले आहे ! ही घोषणा अर्थात ' मला प्यायचें आहे ' ही मागणी करणारी असते.

' सूनबाई ! ' दोन तांबे अंगावर घेऊन सोवळयाच्या नांवाचें जीर्ण जुनेरें गुंडाळीत असलेली आजी म्हणते आहे, ' तिला थोडंसं घे बाई आधीं ! '

'आतां लहान का आहे ती ? बसूं द्या कोकलत अशीच !' असें कर्कश आवाजांत सूनबाई गरजते आहे. किशीचा भोंगा 'माणसां'ना असह्य होतो आहे असें दिसतांच ती चडफडत किशीला जवळ घेते आहे. किशीचें समाधान लवकर कसें होणार ? आलटूनपालटून किशीची आवृत्ती-वर आवृत्ति चालू आहे ?

'नुसता चरक लावते आहे सटवी !'

या आईच्या शब्दांत त्रास, तिरस्कार नुसते गदगदून येताहेत. किशीला तोडायचे सौम्य शाब्दिक उपाय व्यर्थ ठरत आहेत असें पाहून आई जोराचा बदका बसविते आहे ! प्रकरण एकेरीवर आलें असें ओळखून अन् मिळालें तेवढें समाधान मानून किशीने माजघरांत धांव टोकली आहे.

आई तात्पुरती सुटली. पण आजीवर हजार मागण्यांचा वर्षाव होऊं लागला.

सोवळें गुंडाळलेली आजी चुलीजवळ स्थिर झाली आहे. शिजवायचे न् भाजायचे पदार्थ त्या – त्या संस्कारामार्टीं सिद्ध आहेत. घरमालकाचा चहा उकळतो आहे. साखरेचा डबा किशीला न दिसेल अशा बेताने आजीने क्षणभर लपविला तरी कांही उपयोग नाही. एक – दोन बोकणे होईतो चहा गाळला जातो आहे. अर्थात् चहावरहि तिचा हक्क लागलाच. बशीभर चहाने काय होणार ? मग थोडेसें दूध. दूध आल्यावर साय का सुटते ? मग पुरुषांच्या पहिल्या पंक्तींत यथाशक्ति भाग आहेच. गरम – गरम भात आणि वर पडणारी तुपाची धार ! आमटी, चटणी, भाजी हे तिखट – खारट पदार्थ किशीचे नव्हतेच ! आईच्या न् आजीच्या बरोबर जेवायला किशी तयार ! दुपारी पुन्हा पिणें ! आई चिल्लर भांडीं विसळते आहे. किशीने आंथरूण टाकून ठेवलें आहे. हेतु हा की शक्य तो निजून प्यावें अन् पितां – पितांच झोपी जावें. वडील घरीं नसल्यावर हातचें काम मोडून आई किशीसाठी येईल हें कसें शक्य आहे ? आईला त्या तशाच अवस्थेंत गाठून किशी पुढे घुसते आहे ! हुदड्या मारते आहे ! रात्रीं तर मुद्देमाल तोंडांत असल्याशिवाय ती झोपीं जाईल हें शक्यच नव्हतें !

पिण्याबरोबर तिचें खाण्याचेहि वेड वाढत चाललें होतें. घरीं सर्वांबरो-बर हात ओलावून आईबरोबर सहज कुठे बाहेर जाण्याचा प्रसंग आला

अन् कुठे खाण्यासारखें दिसलें की किशीनें तें मागितलेंच म्हणून समजावें. एकदा एक लहानसें चकचकीत नाणें खाण्याचाच पदार्थ आहे असें समजून तिने खुशाल गिळून टाकलें. मग पैशाचा कसा उपयोग घेतात हें तिला कळलें. आजीकडून दिडकी घेऊन ती सरळ जवळच्या दुकानावर उघडीबंब पळूं लागली. मुलांना हरहमेश खेचून आणणारा ' पेपरमिंट ' नांवाचा रंगीत शर्करायुक्त अपूर्व पदार्थ त्या दुकानदाराने विक्रीसाठी ठेवला होता ना ! लवकरच असाहि चमत्कार दिसूं लागला की, ' चूरणवाला ऽ ' ' चिवडेवाला, ऽ ' ' थंडा मीठा बर ऽ फ ' अशा आरोळ्या ठोकणारे फिरते मोसमी विक्रेते किशीच्या दारापुढून मुद्दाम सरकूं लागले. मुलांना सूचना करण्याचीं एकेकाजवळ साधनें तरी केवढीं तऱ्हेतऱ्हेचीं ! एक नुसती जोरजोराने घंटी खणखणवितो आहे. दुसरा भोंग्यांतून ओरडतो आहे. ' चला ! चला ! चिवडा ताजा आहे ! ' तिसऱ्याजवळ तालबद्ध गीतें आहेत अन् चौथा अशी कांही निराळीच कॢप्ति काढतो आहे की त्याच्या ललकारीवरूनच त्याच्या मालाची कल्पना यावी ! हे सगळे आवाज किशीच्या चांगल्या परिचयाचे झाले आहेत ! या सर्वांना साहाय्य करण्यांत घरांतलें आर्थिक मान बिघडवून टाकण्याचा तिने जणू पण केला आहे. बाजारांत तर यापेक्षाहि आकर्षक अशा अनेक भानगडी असत. हलवाई नांवाचे स्थूल, गुबगुबीत प्राणी कांचेच्या आलमाऱ्यांतून काय एकेक मिष्ट, रसपूर्ण, तजेलदार पदार्थ मांडून ठेवीत ! किशीने तर एकदा भररस्त्यांत अंग टाकलें ! एका संभावित घराण्यांतली मुलगी जिलबीसारख्या बाजारी पदार्थासाठी रस्त्यावर लोळण घेते हें आईला कसें देखवणार ? घरी आणल्यावर किशीला तिने नुसतें बदडून काढले. अन् बदडून काढलें म्हणून अखेर तिला हवासा पदार्थ आणवून द्यावा लागला.

वर्षप्रतिपदेपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत सण म्हणून आणि देवादिकांच्या तुष्टीप्रीत्यर्थ होणाऱ्या मिष्टान्नांचीं विविध नांवें आणि रुची तिच्या लक्षांत आलीं. पुरण हा तर तिचा आवडता पदार्थ होऊन बसला. चुलीजवळ हरभऱ्याची डाळ दिसूं लागली, साखर निघाली, भाज्यांची गर्दी दिसूं लागली की बस्स !

अशा दिवशीं किशीला आईकडून सूचना मिळायची. " किशे ! बस्स कर ! जास्त ढोसूं नकोस ! " कारण प्यायल्यावर ती खाणार काय ? पण ती

यथेच्छ पीत होती न् मग आजी आणि अग्निदेव पदार्थ केव्हा सिद्ध करतात याची वाट पाहत चुलीच्या गदमदाटांत सारखी बसत होती. परातींत वाढून पडलेली पुरणाची लालसार रास केव्हां एकदा तोंडांत पडते असें तिला होऊन जायचें! एकादशीच्या दिवशीं ती गप्प बसेल म्हणतां? सण निराहार यांत तिच्या दृष्टीनें फारसा फरक नव्हता. नेहमीपेक्षां निराळे पदार्थ मिळतात कीं नाहीं हेंच ती बघे. एकादशीला तरी काय कमी भानगडी असत? शेंगदाण्याचे लाडू! साबुदाण्याची खीर! खजूर! केळीं! कमी दांत असलेली आजीसारखी गरीब स्वभावाची अत्यंत दयाशील आणि उदार मनाची वृद्धा अशा पदार्थांवर स्वतःचाच हक्क सांगेल हें काय शक्य होतें? "मेली काळांतूनच उटली आहे?" अशा शब्दांनी आईकडून सक्रिय संभावना झाली तरी "खाऊं दे ग!" हें आजीचें एकच वाक्य अपमानाचा विषाद नाहींसा करून हवें तें करायला स्फूर्तिदायक ठरे!

लढाईच्या सर्वविध्वंसक पदराचा फटकारा हळूहळू किशीच्या घरांतल्या खाद्य पदार्थांना बसूं लागला, सत्तर-ऐंशी रुपये मिळणाऱ्या पांढरपेशा कुटुंबाचें जीवन खडतर होऊं लागलें, पगारवाढ झाली ती महागाईचें तोंड भरायला पुरी पडेना. सरकारनें नोकरवर्गासाठीं काय कमी सुखसोयी केल्या? त्यांना धान्य मिळावे म्हणून कांहीं छापील कार्डें काढलीं. त्यावर कुटुंबनेत्याचें नांव, घरांतल्या माणसांची संख्या,पदार्थांचें दरमाणशीं प्रमाण आणि शिवाय ते पदार्थ चटकन् उपलब्ध होतील अशीं सरकारी दुकानें! दुर्लभ असलेल्या मांसाच्या तुकड्यावर माशा तुटून पडाव्या तशी सरकारी दुकानावर माणसांची गर्दी होत होती. अन् अखेर पैसे खर्चून धान्याच्या नांवाने अक्षरशः माती आणून, फुंकून, नीट करून पोटात ढकलावी लागत होती!

किशीचे तोबरे कमी होत चालले. आजीचें 'निराहार' निराहार होऊं लागले. साबूदाणा दिसेनासा झाला. शेंगादाण्यांचें प्रमाण पशावर आलें. भाकरीसारखा खडबडीत बेचव पदार्थ अपुऱ्या दुधाबरोबर कसातरी घशाखाली ढकलण्यासाठीं साखरेच्या नांवाने फारच थोडीशी चिमुट मिळूं लागली. किशीच्या रसनेची तृप्ति मुळींच होईना!

धान्यावरचें नियंत्रण उठविलें तर धान्य गडप होऊन जाईल, तें मिळतंय् तेवढेंहि मिळणार नाहीं, असें सरकारी गोटाचें सांगणें होतें. दुकानदार म्हणत होते: सरकार व्यापाऱ्यांचा प्राण घेतें आहे! धान्य नाहीं म्हणतां कीं काय ? पण तें आम्ही विकावें अन् सर्वांना भरपूर मिळावें अशी सरकारची इच्छा कुठे आहे!

एकीकडे सरकार आणि एकीकडे व्यापारी यांच्या टोलंटोलींत सामान्य नोकरवर्गाचें हाल अवर्णनीय होते.

किशीच्या जात्याच निरुपद्रवी वडिलांना खरे काय आहे हें कसें कळणार? चार माणसांप्रमाणें तेहि मिळेल तेवढें घेत होते न् दिवस चालवीत होते. किशीबरोबर देवांनाहि सणवार विलक्षण नैवेद्यावर काढण्याचा प्रसंग येऊं लागला. देवापेक्षां किशीचें नशीब बलवत्तर! एकदोन परिचितांच्या घरीं लग्नें झालीं. जेवणाचें किशीलाहि निमंत्रण होतेंच. आपल्या अजाण ओढाळ रसनेचें लाड पुरवायला किशीला ही अपूर्व संधि लाभली होती. पोटाचा नगारा करून प्रसन्न मनाने ती घरीं आली. पचनक्रियेंत कुठें काय कमीजास्त झालें होतें कुणाला माहित.लगेच खाल्लेलें किशीला ओकावें लागले. जिव्हेला आलेली तगरी क्षणांत नाहीशी झाली! मग लग्नगृहांतून कांहीं दिवसांनंतर लाडू वांटण्याचा कार्यक्रम सुरू झाला. एक नवरी, दोन प्रौढ बाया आणि विणलेल्या मखमल रुमालानें झाकलेलें टोपलें असें मंडळ आणि सरंजाम किशीच्या घरीं प्रविष्ट झाली. हळदकुंकू होईतो नवकांत पडलेल्या पदार्थाकडे किशी सारखी पाहत होती. आलेल्या बाया निघून जाताच किशीच्या आईने दोन–अडीच लाडू लपविल्यासारखे केले अन् उगीच गोडासा चूर किशीच्या हातावर ठेवला. कल्याद आईपुढें कांहीं चालणार नाहीं हें तिने ओळखलें. आजी कुठें पोथीला गेली होती. अन् घरांत लाडू आले असतांना ती येईतो वेळ काढणें फार कठीण होतें. कांहीं घरगुती कामानिमित्त आई शेजारी सरकली हें पाहून किशीनें एक काठी घेतली अन् माजघरांतल्या फळीवरला एक ठराविक डबा हालविण्याचा प्रयत्न केला! आईने लपविलेली खाद्यसामुग्री त्यांत नक्की होतीच! एक–दोन धक्क्यांनी फळीचा आधार खिळखिळा झाला की काय कुणाला माहित! एकदम किशीच्या कानठाळ्या बसविणारा खडखडाट झाला. फळी

निखळली. दूध किशीच्या अंगावर सांडलें, चहा भुईवर पसरला. संध्या काळच्या चहासाठीं मुद्दाम जपून ठेवलेली थोडीशी साखर मातीमोल झाली. आणि असेंच इतर पदार्थ माजघरांत पसरले!

किशीची जाणीव जागी झाली तेव्हां पाठीची आग होते आहे हें तिला कळलें. पाठच नव्हे तर सबंध अंग सणसणत होतें! जवळ बसलेली आजी अंगावरून हात फिरवीत होती अन् निष्फळ संतापानें म्हणत होती, "अशा आयांना देव मुलं देतो तरी कशाला?"

मोठ्यानें गळा काढून आपल्यावर झालेला अन्याय सर्वांना कळवावा असें किशीला वाटले. पण तिची शक्ति तिला साथ देईना. आंतल्या आंत किशीला ओढल्यामारखें होऊं लागलें. दिवस चालले. दिवसाचे आठवडे झाले. किशी स्तब्ध, निश्चल आणि निःशब्द पडूं लागली. वैद्य–कीय उपचार होऊं लागले. आईने जवळ पडून कित्येक वेळां पदर वर केला. शंकराचें शिरोभूषण झालेली दुग्धधवल गंगा पार्वतीच्या प्रेममय उरस्थलांत सामावली ती शंकराने पचविलेल्या कालाकूटाचा रंग तोंडावर घेऊन! तें रसाळ 'कालकूट किशीच्या परिचयाचें होतेंच. पक्कतेचे, निर्भरतेचे सर्व साक्षात्कार आणि आवेश किशीपुढे आपणहून झेपावूं लागले.किशी तर तिकडे पाहायलाहि तयार नव्हती. रस्त्यावरून फेरीवाल्यांच्या जोरजोराच्या ललकाऱ्या येत होत्या. उठावें, आजीकडून पैसा घ्यावा अन् धांवत रस्त्यावर जावें असें तिला वाटले पण तेवढी तत्परता तिच्या हातापायांत नव्हती. पथ्य बिघडविणार नाहीत असे थोडेबहुत मिष्ट पदार्थ किशीपुढें येत होते. ती त्यांची नुसती चव पाहून थुंकून टाकीत होती. अन् मग निपचित पडून राहात होती.

तिची जीवनशक्ति रुसली, रागावली की थकली होती कांहीं कळत नव्हतें!

माणसाला खेचून धरणारी अन्नपाण्याची ओढ एकदम कार्यप्रवण झाली की थकली आजीचे नवस फळाला आले कुणाला माहीत! किशी उठून बसूं लागली. तिचा आवाज स्पष्ट होऊं लागला. पण तिचे मूळचे रूप मात्र आता राहिलें नव्हतें. पूर्वी तीं झिंज्या मोकळ्या सोडून उघडी-वंब दारांत फेरीवाल्यांची वाट पाहत उभी राहिली की एखाद्या खूप मोठ्या हिरव्यालस दुध्याभोपळ्यासारखी दिसे.आता वाळून कोळ झालेल्या कद्दूची

अवकळा तिजवर पसरली होती! रसनेंद्रिय जागे होतें, पण पूर्वीसारखी हाव त्यांत नव्हती. प्रत्येक खाद्य पदार्थ तिला हवासा वाटत होता, पण तो पुढे आला की सेवनाची क्रियाच कडवट आणि कंटाळवाणी ठरत होती!

तशांतच एक सण आला. आजी आत्मविश्वासपूर्वक किशीला सांगूं लागली, "किशी! आपण पुरणाची पोळी करूं या आतां!"

इतर सणांप्रमाणे हिंदूंच्या सणालाहि सरकारने दरमाणशी गव्हाचें, साखरेचें न् तांदळाचें कांहींएक प्रमाण द्यायचें ठरविलें. वांटपाच्या दुकानाला माणसें चिटकलीं. खेचाखेचींत कांहीं माणसें मागे पडलीं तीं कायमचीं वगळलीं गेलीं. बळीराम दुकादाराने एकदम घोषणा केली, "संपलं धान्य!"

सनदशीर आणि बारकाईची चौकशी करणाऱ्या माणसांना त्यानें उत्तर दिलें, "लोक प्रामाणिक राहिले नाहीत. सरकारहि शक्य तेवढा कानाडोळा करतें आहे! हजार कार्डांना पुरेल एवढा माल द्यायचा न् दीडहजार कार्डें मालासाठीं द्यायची! सर्वांना धान्य कसें मिळेल? बोला—"

बोलायला जागा नसलेले चडफडत परतले. परतणारांत किशीचे वडीलहि होते. धान्याचा स्थानिक नियंत्रक ब्राह्मण होता. आपल्या अडचणी त्याला कळतील, तो कांहीतरी व्यवस्था करील असें वाटून किशीचे वडील त्याला भेटले. मिष्ट भाषणाखेरीज तिथे कांहीच लाभ झाला नाही. अन्नधान्याच्या टंचाईवर त्याने एक लांबलचक व्याख्यान द्यायला आरंभ केल्यावर किशीचे वडील उठले. धान्य मिळायचें आता एकच ठिकाण होतें. काळा बाजार! पण हा बाजार अंधेनगरीच्या कोणत्या चांदणी चौकांत बसलेला होता हें पोशाखी माणसाला कसें कळणार? किशीच्या वडिलांनी बळीराम वाण्याला एकीकडे गाठले. वाण्याने कित्येकांना नाराज करून परतविलें होतें. किशीच्या वडिलांना वाटेल त्या भावांत का होईना धान्य द्यावयाला तो कच्चा गुरूचा चेला नव्हता. काळ्या बाजाराची भाषा वेगळी असते. अन् त्या बाजारांतली दलाली करायला सौम्य सोज्वळ चेहेरे उपयोगी पडत नाहीत?

किशीचे वडील परतले. सणाचा दिवस अत्यंत असंतोषांत गेला. नैवेद्याच्या नांवाखाली देवांना जाड रटरटीत अन्न समर्पण केलें गेलें. दातांत

कांहीतरी धरून चावायचें न् पाण्याच्या घोटाबरोबर तें आंत ढकलायचें असा जेवणाचा कार्यक्रम उरकला गेला. किशी रागावली, रडली, थोडीशी लोळली अन् मग पुढे आलेल्या अन्नाचे एक – दोन घास खाऊन गप्प बसली.

बाहेरच्या सृष्टीशी कित्येक दिवस ती जानपछान विसरली होती. दुपारी दारांत बसून आपले एकेक परिचित केव्हा येतात याची ती वाट पाहत होती. दाराच्या बाजूला थोडासा पैसा न् झाडाची छाया होती. तिथे एक लंगडा भिकारी येऊन थांबला. जरा वेळाने हातावर फरकत येत असलेला दुसरा एक खुळा भिकारी त्याला येऊन मिळाला.

लंगड्याने विचारलें, ' काय दादू, काय कमाई आहे आजच्या सणाची ? '

" आज काय सांगावं ! पुरणपोळी ! "

' साखरभात ' बळीराम वाण्याच्या घरापुढे पहाटपासून ठिय्या देऊन होतो तेव्हा कुठं हें पदरांत पडलं ! तुझं ? – '

साखरभात ! पुरणपोळी ! या शब्दांचे आघात किशीच्या मेंदूपर्यंत पोंचले. ती चटकन उठली अन् घरांत धांवली. तिने आजीला बाहेर आणले. घरांतल्या सर्व माणसांनी तिला फसविलें होते ! पुरणाची पोळी शक्य नाही ही गोष्टच मुळीं खोटी होती ! ती आजीला दाखवायचा तिचा हेतु होता ! आजीची, आईची कांहींतरी लबाडी होती !

आतापर्यंत भिकाऱ्यांनी आपापल्या झोळया सोडल्या होत्या. खरकट्याचा नुसता खिचडा झाला होता, पण लंगड्याच्या झोळींत पुरणाच्या पोळीचे तुकडे निवडून काढतां येतील इतके स्पष्ट दिसत होते. तो खुळयाला सांगत होता, " आज ' कंट्रूलर ' साहेबाकडं मोठं जेवन होतं, तीन वेळा चपराशी अंगावर धावून आला, पण मीं चिकाटी सोडली नाहीं, अखेर हें एवढं खरकटं मिळालं. पत्रावळीवरहि हात मारायचा विचार होता पण पाय अधु असल्यामुळें तिथं लवकर पोचतां आलें नाही !– "

ती पुरणाची पोळी किशीला खावीशी वाटली की नाही कोण जाणे ! तशांतच आजीचा न् किशीचा संवाद ऐकून तिची आई तिथे आली न्

म्हणाली, " भिकारडी मेली ! त्या लंगड्याच्या खरकट्यावर कशाला ग वासना तुझी ! "

किशीची अशक्तता पाहून मारायचा बेत तिने बदलला असावा. आजीच्या बुबळावर पाण्याचा पडदा तयार होऊं लागला होता. बैठकींतून किशीचे वडील हें सर्व ऐकत होते. मघा रस्त्यावरून फिरतांना त्यांच्या जीर्ण होत आलेल्या शुभ्र, धुवट कोटावर चिखलाचें कांहीं शिंतोडे उडाले होते. ते कलंक नाहीसे करण्यांत कोट तर निकामी होणार नाही ना हा प्रश्न ते सोडवीत असावेत !

☆———☆———☆

# हत्याकांडांतील तीन सर्ग • •

मोठ्या रस्त्याला जोडणाऱ्या एका आडरस्त्यांत ती विचित्र मिरवणूक निघाली होती ! विचित्र या अर्थानं की मिरवणुकी पुढं वाद्यं नव्हतीं. मिरवणूक म्हटल्यावर जेवढा व जमा समुदाय अपेक्षित तो तसा व तेवढा नव्हता. अन विशेष म्हणजे मिरवणुकीचं अंतिम घर देऊळ, दर्गा अथवा स्मशान नसून जिल्ह्याच्या ठिकाणचा सरकारी दवाखाना होता ! जमावाचं नियंत्रण करायला प्रत्येक मिरवणुकी बरोबर पोलीस असतात तसे या मिरवणुकींतहि होते. स्वच्छ दिवस होती. मोटा रस्ता फारसा दूरवर नव्हता. पोलीस कांहींसे बेफिकिर दिसत होते. कारण दंगा दगडफेक अथवा डोकेफोड करणारी ती मिरवणूक नाहीं अशी त्यांची खात्री असावी. या सरकारी देखरेखीखाली जे मिरवीत चालविलं होतं त्याचं वैचित्र्य काय वर्णावं !

कांहीं महार आळीपाळीनं एक खाट वहात होते. खाटेवर लिंबाच्या लहान लहान डहाळ्या होत्या. आणि त्या खाली रक्ताळलेलं एक प्रेत होतं.

इकडूनं तिकडं जात येत असलेलं एखादं खेडवळ पोलीस पहाताचं कुतुहलानं थोडंसं बाजूला सरकून वाट देत होतं अन् कांहीं तरी भयंकर पाहिल्या सारखं करून चालू लागत होतं. नागवाडीच्या गांवखोऱ्यांत मिरवणूक शिरली ! सरकार दरबार आम्ही हि पाहिले आहेत अशा समजु–

—तीनं धिटाई आलेल्या एका म्हाताऱ्यानं पोलीसांना सलाम करून विचारलं,

" कोठली ही खाट खां साहेब ? "

शिव्यांनीच सुरवात आणि शेवट होईल आणि असंस्कृत, हृदयभेदी तुच्छता हाच ज्याचा अर्थ असेल असं एक वाक्य एका पोलीसानं उच्चारतांच म्हातारा दचकून मागं सरकला.

देशी भाषेतलं अनर्गळ वृत्तपत्र वाचणाऱ्या दुसऱ्या एका पोलीसानं म्हटलं,

" तुमच्याच लोकांचं कृत्य आहे ! साले प्रजापक्षांचं नांव घेतात न् आपल्याच लोकांवर गोळया चालवतात ! भोरक्याचा पाटील आहे हो! तुमच्या लोकांनी डाका घातला काल त्या गांवावर ! "

विचारणाराला अधिक खुलासा नको होता. मिरवणूक दृष्टि बाहेर गेल्यावर तो परतला आणि मटकन् खालीं बसला. नागरवाडीचंहि मरण त्याला दिसलं असावं. घरधनीण बाहेर आली. शेजारी जमा झाले. सरकारी लोकांनींच किंवा सरकारच्या सरकारचं पाठबळ असलेल्यानींच ही लूटमार केली होती हेंच खरं होतं. पण उघड खरं बोलायची सोय नव्हती ! म्हातारी त्वेशानं कांहींतरी बोलणार होती पण—

ती कांहींच बोलली नाहीं. तिच्या मुग्धतेंनच जणूं त्या घटनेंतील सर्व अर्थ ओळखला. बत्तीसगडच्या दिशेकडं पहात तिनं बोटं मोडली !

प्रतिकाराची तिची ती मुकी असहायता दर्शविणारी क्रिया तिचीच नव्हे तर आसपासच्या कैक खेडयांतील पीडितांची हताशा आणि हतदशा दाखवीत होती !

× × × × ×

' हा बत्तीसगड रेडियो आहे ' किंवा ' आम्ही बत्तीसगड रेडियोवरून बोलतो आहो ' अशा घोषणा करणारं बत्तीसगडचं नभोवाणी केंद्र एका काळीं कुणी फारसं ऐकत नव्हतं. 'केंद्र ' म्हटलं कीं बाजारभाव, हवामानाचं चढउतार, फिल्मी गाणीं अथवा स्थानिक कलावंतांचा कार्यक्रम यहा गोष्टींची कल्पना पुढं येत होती. विलायती वातावरणांतून शिजून आलेली ऐखादी नवलपूर्ण बातमी कधीं मधीं ऐकूं आली तर येत असे ! 'बाऱ्या—

वरले शब्द ' म्हणून एरव्ही कुणी तिकडं लक्ष देत नसे. अलीकडं मात्र बत्तीसगड केंद्राला भलतं महत्व आलं होतं ' बत्तीसगड ' संस्थानाच्या कक्षेंतील लोकांचें जीवन घडविणाऱ्या बातम्या महत्वाच्या राजकीय घोषणा अथवा तत्सम इतर बाबी आजकाल तेथून प्रसृत केल्या जात होत्या. ऐकण्याची सोय असलेल्या ठिकाणीं श्रोत्यांचा समुदाय वाढता दिसत होता. राजकारणाच्या नव्या वावटळी बत्तीसगडच्या आकाशांत घोंघावू लागल्या. काय होतंय,काय घडणार, आणि कसं होईल त्यांचा निर्णय घ्याव याचं तें एक महत्वाचं ठिकाण झालं होतं. दोन महिन्यांतून तीन प्रधानमंडळं बदलणारी आणि चोवीस तासांतून अठ्ठेचाळीस जाहीरनामे काढणारी बत्तीसगड संस्थानांतली शासनसंस्था केवढी क्रांतिशील, लोकहितदक्ष आणि जागरूक असली पाहिजे हें सांगणं नलगे ! तशांतच आम्हीं बत्तीसगड रेडियोवरुन बोलतो आहो म्हणणारानं नुकत्याच चौथ्यांदा बदललेल्या प्रधानाचं नांव घेऊन आजरात्रौ ते भाषण करतील असं सांगितलं. कपडे बदलण्या इतकं प्रधानमंडळहि बदलणं सामान्य आणि नैमित्तिक होत चाललं आहे कीं काय या कल्पनेंत त्रस्त झालेलें लोक या नव्या प्रधानांच्या भाषणाबद्दल उत्सुक दिसत होते. बत्तीसगडांतल्या वाढत्या अशांततेनं अनिश्चित झालेलं जीवन आतां थोडं बहुत समाधानानं चालतां येईल अशी लोकांची कल्पना झाली !

मानपानाचे हारतुरे भेजवान्या आणि प्रासंगिक मुलाखती यांतून मुख्य प्रधानाची केव्हां सुटका होईल सांगता येत नव्हतं. महिना संपत आला तरी निमंत्रणं आणि अभिनंदनाच्या तारा यांचा ढिगारा प्रतिदिनी वाढत होता. या गडबडींत प्रधानकीच्या खुर्चीवर "बसायला देखील त्यांना सवड सांपडली नव्हती !

भाषण करायचं त्या संध्याकाळी ते थकून भागून परत आले. बंगल्याच्या कंपाउन्डांत भेटूं इच्छिणाऱ्या माणसांच्या झुंडी थांबल्या होत्या त्या,प्रधानांना वेळ नाहीं, राज्यकारभाराच्या कटकटी वाढल्या म्हणून प्रकृति टीक नाहीं, अशी कारणं ऐकून बाहेर पडल्या ! कपडे उतरले गेल्यावर हात पाय आराम खुर्चीवरुन सोडून देऊन प्रधानांनीं सेक्रेटरीला बोलावून विचारलें.

" भाषण तयार झालंय ना ? " सेक्रेटरीनं चटकन भाषणाचें कागद पुढं केले. प्रधानांची एकेका वाक्यावर नजर फिरुं लागली. ' मी लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे ' ' बहुजनांना सुखानं न समाधानानं जगता यावं म्हणून मी ही जागा स्वीकारली आहे ' ' लोकांची सेवा करण्यांत कांहीं कसूर होतो आहे असं माझ्या मनोदेवतेनं सांगितलं तर मी चटकन स्थानत्याग करीनं !....

भाषण वाचून झाल्यावर नटाच्या आवेशांत कांहीं वाक्यें प्रधानजीनी मनोमन उच्चारलीं. मग एक महत्वाचं खाजगी पत्र त्यांच्या पुढं आलं. परिचित अक्षर असल्यामुळं चटकन त्यांनी तें हातीं घेतलं. ' मामा साहेब ' असा पत्राचा प्रारंभ होता. अन् पुढं म्हटलं होतं,

" आज एकदम तीन चार खेड्यावर हल्ला करण्याच्या सूचना मी माझ्या स्वयंसेवकांना दिल्या आहेत भोरक्याचा पाटील मारल्याबद्दल दरीच बोंबाबोंब झाली. प्रजापक्षीयांनींच पाळमुळं खणून टाकलीं आहेत. मिझ्रीपल्लीची लूट आपल्या घरीं शक्य तितकी सुरक्षित आणि गुप्त रीतीनं पोंचावी म्हणून स्थानिक पोलिसांची मदत घेतली आहे. आपण अधिकार स्वीकारल्यापासून माझ्या स्वयंसेवकांत अपूर्व आवेश संचरला आहे. हत्यारांचा सांठा मात्र तातडतीनं रवाना करावा.

× × × × ×

रात्रीं आठ वाजून चाळीस मिनिटांनी नवीसगड रेडिओवरुन शब्द उठत होते, " मी लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे ! नवीसगडच्या प्रजाजनांना सुखानं न् समाधानानं जगतां यावं म्हणून मी ही जागा स्वीकारली आहे !..."

लोकांना साधू सत्पुरुषाचे आवाज ओळखूं येत होते. लोकांना उघड डाकुगिरी करणाऱ्यांच्या आवाजाची कल्पना होती. लोकांना रांडेच्या आवाजांतील लाघव कळण्यासारखं होतं. लोकांना जीवन संभवापूर्वीच्या मातेच्या वेदनांचा आवाज ओळखतां येत होता. पण मुख्य प्रधानाच्या आवाजांत त्यांना तळमळ, कळकळ किती आढळली अथवा त्याच्या धोरणापणीची कौटिल्याची कितपत कल्पना आली हें सांगणं कठीण होतं !

× × × × ×

व्यंकटाचारी एकाएकी जागा होऊन ताठ उभा राहिला. एक कमरेंच न् दुसरं खिशांतील अशी वेगवेगळी आयुधं त्यानं चांचपुन पाहिलीं. तीं जिथल्या तिथं न् जशींच्या तशींच होतीं. ज्या गूढ न् जोरकस प्रेरणेनं त्याला जागं केलं होतं तीच त्या आयुधांतूनहि भरली असली पाहिजे! त्यांत प्राण असल्या सारखी उष्णता आणि सोबत करण्याची सिद्धता आढळल्या मुळंच कीं काय व्यंकटाचारी लगेच चालूं लागला.

त्याचे सहकारी शांत झोपले होते. बत्तीसगड संस्थानांतल्या बेचिराख झालेल्या 'मिर्झापल्ली' गांवाच्या त्या जंगलांत त्यांना शांत झोप तरी कशी येत होती कोण जाणे! आसपासच्या खेडयांतून लूटमारीचा गिला ऐकूं येत होता. आगी धडकत होत्या! व्यंकटाचारीचें सहकारी गंभीर होऊन चर्चा करीत होते न् त्याला संयम ठेवायला सांगत होते! व्यंकटाचारीचं न् सहकाऱ्यांचं यापुढं जमेल याची शक्यता वाटत नव्हती. ते त्याला वेडयांत काढीत होते! बत्तीसगड संस्थानांतल्या 'मिर्झापल्ली' ची भूमि दिल्लीपर्यंत पसरली होती. वातावरण, प्रकाश, अंधार ह्यांनी मिर्झापल्ली आणि दिल्ली एकसूत्रांत आणली होती. मग मिर्झापल्लीच्या आगीनं, मिर्झापल्लीतल्या अश्रूनं, मिर्झापल्लींतल्या उसाशांनीं दिल्लीच्या हृदयाला द्रव येणार नाहीं, रक्त उसळणार नाहीं, हे कसं शक्य होतं? सहकाऱ्यांची विधानं अशा स्वरूपाची होतीं. व्यंकटाचारीचें विचार निराळ्या आणि निराशेच्या दिशेनं हिंडत होते. दिल्लीच्या वाटाघाटी बत्तीसगढच्या सत्तेशी चालल्या होत्या. त्या प्रजेच्या हितसंबंधासाठीं असतील. पण प्रजेला त्यांत दुय्यम स्थान होतें. प्रजेचे हितसंबंध म्हटल्यावर सत्तेला विचारांत घ्यावयाचं कांहींच कारण नव्हतं, पीडितांच्या चौकशीसाठीं एखादं कमिशन नेमलं जाण्याची शक्यता होती! कडक शब्दांत एकादा खलिता लिहिला जाईलसं वाटतं होतं! किंवा निषेध करण्याची शक्यता होती! बस्... हे सारे सनदशीर उपाय योजले जाणार असतील! साधनांचो शुचिता पाहिली जाणार असेल! शुद्ध साधनंच उपयोजिलीं जाणार असतील! कचरा उपसून फेकण्यासाठीं सोन्याचांदीची पात्रं घडविण्याचाच हा प्रकार म्हटला पाहिजे! बत्तीसगडचा धांगडधिंगा होता तसाच चालूं राहणार होता.

कांहीं अपेक्षित होईल म्हणून व्यंकटाचारीनें आणखी किती दिवस वाट पहायला पाहिजे होती ?

मिर्झापल्लींच 'अग्निकांड' त्याला सारखं डोळयापुढं दिसत होतं. त्यांतलो प्रत्येक बारीक प्रसंग आणि अनुभव स्मृति-सान्निध्यान असा कांहीं ताजा ठेवला होता कीं, जणु जे घडलं ते कांहीं क्षणांपूर्वींचं! किंबहुना ते तसंच अद्यापहि आहे! त्या वेळचे प्रहार न् त्या वेळचे चटके तसेच बसताहेत! आणि सूड घ्यायला तो अधीर झाला आहे.

जागेपणे या विचारांना दाबूं शकेनासं झालं. निद्रेला हा कल्लोळ आवरेनासा झाला. एकच गोष्ट त्याला दिसत होती मिर्झापल्लींचं त्याचं घर जळाल होतं. आणि एकच गोष्ट त्याला करावयाची होती—त्या वेळच्या अत्याचाराचा सूड घ्यायचा होता! मेंदूंतले हे संस्कार इंद्रियांत मुरूं लागले. शरीराच्या कणाकणांतून त्याचे ध्वनी उठूं लागले. त्याच ज्वाला, घरांपुढल्या अंगणांतला तोच प्रकाश, तेच गणवेषांतल्या शस्त्रधारी उन्मत्त गुंडांचे निर्दय चेहरे, त्या विनवण्या, अत्याचार, धडधडत्या आगींत पडलेल्यांच्या असहाय्य किंकाळया, आगीत भाजतांना शरीरांतल्या आंतडीचा होणारा चटचट आवाज...............

त्याच्या शरीरांतल्या रक्तवाहनाची क्रिया त्यांच आठवणींतून होत होती कीं काय नकळे! वृक्षाच्या ठिकाणीं व्यंकटाचारीला आपली पत्नी दिसूं लागली— जाळाच्या प्रकाशांत गुंडानी निर्वसन, भ्रष्ट आणि विकलांग केल्यासारखी! एकदां झोपेंत त्यानें आपल्या सहकाऱ्याचा गळा दाबला. एकदां अंधारांतून येणाऱ्या एका सहकाऱ्यां वर तो तुटून पडला, एकदां रात्री छुप्या हल्ल्याच्या प्रतिकारांत त्याच्या दंडांत गोळी शिरलीं. सकाळीं सहकाऱ्यानं रक्ताळलेली जागा पाहिल्यावर व्यंकटाचारिला जखमेची जाणीव झाली. शरीर निःसंवेदन झालं, असं म्हणतां येणार नाहीं. सर्वच जाणीव–नेणीवांचा ओघ एकाच केंद्रा भोंवती घोटाळत असल्यामुळं रोमरोमांतल्या जीवन शक्तीला अपूर्व ताठरपणा आला असावा! व्यंकटाचारी आतां उठून चालूं–लागला तो अशाच मनस्थितींत ?

उत्तर रात्रींच्या गुंगींत सभोंवतल स्तब्ध निश्चल होतं. तालवृक्ष, जमीन आणि नेहमी परिपूर्ण असलेले जलाशय म्हणजे तेथल्या शांत जीवनाचे

वाटेकरी ! एका रात्रीं ' मिर्झापल्लीवर ' हल्ला झाला. गांव आणि गांवाच सभोवताल निर्मनुष्य उरलं, व्यंकटाचारी जमिनीवरुन चालत नव्हता, उध्वस्त घराची तो रक्षा तुडवीत होता : ताडवृक्षा जवळून तो सरकत नव्हता भुतांचे सांगाडे उभे होते ते ! जलाशयांत लहर उठत नव्हती. अंधारांत पाण्याचा पृष्ठभाग अर्धवट अस्पष्ट दिसत होता तो भुताच्या उघड्या डोळ्यांतल्या निश्चल बुबुळासारखा वाटत होता ! भुमीतलें, ताडवृक्षांतले तळ्यांतले प्राण कुठं हारवले होते कीं व्यंकटाचारी सारखे जळत हिंडत होते ?

चालतां चालतां व्यंकटाचारी एकदम थबकला. समोर कसलीशी हालचाल झाल्यासारखी त्याला दिसली ! अगदीं तोच ! मिर्झापल्लीचं त्याचं घर जाळणाऱ्या गुंडाचा सेनानी ! तोच गणेश ! हृदय असल्याचं अंधुक चिन्हहि दिसणार नाहीं असाच काळाकुट्ट चेहरा ! काय पण नेमका सांपडला होता आतां ! व्यंकटाचारीच्या मेंदूनं नेहमी पेक्षांहि अधिक उष्णता धारण केली. पिस्तुल काढून लागोपाठ त्यानं दोन तीन बार केले. फाड असा लक्ष्याचा आवाज झाला अन् कांहीं तरी जमीनीवर पडल्यासारखं वाटलं. गोळी खात्रीनं त्याचा मेंदू भेदून गेली असली पाहिजे ! अन् हे घ्या ! त्या गुंडाची बायको देखील भयचकित होऊन जवळ उभी ! व्यंकटाचारी तिला जिवत सोडील याची शक्यता नव्हती ! तिच्या विनवण्यांचा न् करुणा भाकण्याचा व्यंकटाचारीच्या मनांवर कांहीच परिणाम होणार नव्हता.

......जळत्या घरांच्या आगीचा प्रकाश पडला होता. व्यंकटाचारीला हात पाय बांधून सिद्ध केलेल्या बंदुकाच्या जाळ्यांत उभं केलं होतं ! गुंडांच्या नायकानं लगेच व्यंकटाचारीच्या सौभाग्यवतीच्या वस्त्राला हात घातला... हायरे दुर्दैवा! त्वेशानं नसनसा फुललेल्या अवस्थेत व्यंकटाचारीची अनावर, अवर्ण्य तडफड होत होती ! त्यांनं डोळे मिटून घेतले होते अन् उघडल्यावर अत्याचारानं रक्तलाञ्छित बधिर झालेलं । तिचं शरीर आगींत फेकलेलं त्याला दिसत होतं. तिच्या पाठोपाठ त्याला उचललं तेव्हां सुटलो आपण असं वाटतं न वाटतं तोंच अर्धवट भाजून निघालेल्या अवस्थेत तो सावध झाला होता......

आतां एकट्याच उरलेल्या या गुंडाच्या स्त्रीचें गोळीसरशी, प्राण हरण करणं त्याला कठीण नव्हतं, पण तें त्याला करायचं नव्हतं. तिचे अवयव सुऱ्यानं छेदून तिचं शरीर छिन्नविछिन्न करतां येईल तेवढं त्याला करायचं होतं! शेवटचे क्षण मोजीत असलेल्या तिच्या नवऱ्याला ते दिसायला पाहिजे होतं. अन् दोघांच्याहि वेदना पाहून मग तो समाधानानं हंसणार होता. त्या स्त्रीच्या मांडीवर वार करण्यासाठीं खिशांतला सुरा त्यानं बाहेर काढला. अन् असा जोरानं मारला कीं 'कच्च' असा आवाज झाल्याशिवाय राहिला नाहीं. तिची मोठी किंकाळी ऐकण्याची त्याची अपेक्षा मात्र सफल झाली नाहीं. पाठीमागून शब्द आले, "व्यंकटाचारी! काय करतो आहेस हे?" गोळीबार ऐकून त्याचे सहकारी धावून आले होते. अंधाऱ्या रात्रीचा फिकट दिवस झाला होता. चारीनं एका बुजगांवणाऱ्यालाच गुंड समजून गोळी झाडली होती. आणि शिरच्छेद केल्यासारख्या दिसणाऱ्या तेथल्या ज्या निष्पर्ण खुजट वृक्षाला स्वतःची बायको समजून तो मधून मधून आपली व्यथा सांगत होता त्याच वृक्षावर त्यानं सुरा मारला होता!

बुद्धीच्या तळापर्यंत हें प्रत्यक्ष पोंचलं तेंव्हां व्यंकटाचारीनं रडायला आरंभ केला!

# असंच होणार होतं! ● ●

★ **ज्या**चा पगार साठपासून सव्वाशें रुपयांपर्यंत आहे, काव्य (शाळेंत शिकावं लागलेलं अन् मासिकांतून येणारं), शास्त्र (ज्याची व्याख्या करणं कठीण), इतिहास (परीक्षेसाठीं ज्याच्या फक्त नोट्स् घोकाव्या लागल्या तो), संगीत (सिनेमांतून न् तबकड्यांतून ऐकूं येणारं अथवा आसपासच्या किंवा स्वतःच्या हौशी गळ्यांतून फुटणारं) आणि राज-कारण (सभोंवतालच्या परिस्थितीबद्दलची शामळू आणि फुरसतीनं होणारी चर्चा) जो थोडंबहुत बऱ्यावाईट रीतनं जाणूं शकत होता, असा माणूस 'वरसणी'च्या दादा संतुरामच्या चाळींत नाहीं तर कुठं राहणार?

दाट वस्तीचं वरसणी गांव तिथून थोडंसं वेगळं आणि निराळं होतं. खुद्द गांवांतलीं घरं जुनाट आणि जमेदारी थाटाचीं होतीं. आधुनिक सौंदर्य–दृष्टीच्या विलासाला आणि विकासाला तिथं योग्य वातावरण नव्हतं.

मागं-पुढं व्हरांडा असलेली, दोन-दोन दालनांच्या वीसपंचवीस बिऱ्हा-डांची एकलग, एकमजली आणि सफेद्यानं नेहमी चमकणारी इमारत म्हणजे दादा संतुरामची चाळ! समोरची आणि आजूबाजूची विशाल उघड (Exposure) कांहीं सरकारी आणि निमसरकारी बंगल्यांनीं सुशोभित होती. प्रत्येक वस्तु आणि वस्तीचीं चिन्हं नुसतीं झकपक होतीं! रेल्वे–स्टेशन तिथून जवळ होतं. 'वरसणी ते मन्दार' धांवणाऱ्या बस सर्व्हिसचा स्टँडदेखील ऐन समोर होता. सिनेमाचं थिएटरहि फारसं

दूर नव्हतं जणुं आधुनिकतेचीं सारीं मर्मस्थळं येथून हेरतां येत होतीं! जणुं नवतेच्या ग्रहणाची शक्ति येथल्याच हवेंत होती!

सकाळीं व्यवसायाला धांवत जाण्याची चाळींत एकच गडबड दिसे. दुपार गृहिणींच्या सुस्तींत नाहीं तर शृंगारांत खर्च होई. संध्याकाळच्या चहापानानंतर माणसं हवा खायाला निघत. रात्री रडकीं मुलं जागत आणि जागवीत. रात्र होणारच अशा विश्वासानं दिवस घालविला जाई आणि तो तसा घालविणं अपरिहार्य आहे, म्हणून रात्र काढावी लागे!

सुटीच्या आदल्या दिवसाच्या संध्याकाळचं आणि सुटीचं वातावरण कांहीं नित्य आणि अपूर्व करण्याची ती पर्वणी असे. कुठं पत्ते कुटले जात. सिनेमाच्या खेळाची चौकशी होई. रात्रीं भोजनोत्तर कुठं एखादी गाण्याची बैठक रंगत असे. कांहींच करायला नसलं तर राजकारणाचं चर्वण सुरू होई.

हिंदूची वाढती दुर्बलता आणि दुर्दशा, मुसलमानांची आक्रमक वृत्ती, संस्थानी सत्तेचं त्यांना होणारं प्रकट-अप्रकट सहाय्य, स्थानिक गुंडागिरी आणि त्यावरील उपाय आणि काजळाइतकाच उजळ भविष्यकाळ,— असे कित्येक विषय चर्चेला असत!

रात्रीच्या मानानं विषय फार असत अन वाढत्या रात्रीबरोबर ते अधिक गहन होत जात! सुट्या भरपूर असल्या तर भारतीय राजकारणांतल्या कूट-प्रश्नांचा फडशा पाडायला फारसा अवधि लागला नसता!

रिकाम्या मनाच्या करमणुकीचं अथवा विचारांना चालना द्यायचं कार्य समोरचा मोटार-स्टॅण्ड मोठ्या तत्परतेनं करी. मोटार आली की कांहीं माणसं उतरत आणि चढत. त्यांचे चेहरे-पोशाख पहात त्यांच्या येण्याजाण्याचं कारण गमतीनं निश्चित केलं जाई. निष्क्रीय स्वैपाला उसळून आणतील अशाहि गंभीर घटना तिथं घडत. मुसलमान ड्रायव्हर हिंदू उतारूंना अन्यायानं वागवी. गर्दी करणारा न् चेपणारा वर्ग मुसलमान होता. चेपले जाणारे बहुसंख्य अर्थात् हिंदू असत!

अलीकडचं जीवनहि असचं घाईचं, गर्दीचं आणि रेटारेटीचं झालं होतं! कुठून तरी घाईनं गर्दीत यावयाचं अन धड बसायलाहि जागा

नाहीं अशा अवस्थेंत पसार व्हायचं, असहि तत्व-चिंतन एखादा आत्मा करी !

चाळींतली सर्वांत टळक व्यक्ति म्हणजे यशवंत राजूरकर! पत्त्यांचे फड त्याच्याशिवाय रंजक ठरत नसत. मासिकांतील कथा–कवितांचं रसग्रहण करणारा लायक माणूस तोच ! ‘सखी मोरी’–घोटलेले गवई यशवंतच्या दर्दीपणावर आणि ‘दाद’ देण्यावर खूप असत. राजकारणाची चर्चा तर त्याच्यावेगीज नीट रंगतच नसे. तो दिसण्यांत चांगला होता. कापड–बाजारावर देखरेख करण्याची (Textile Inspector) त्याची नोकरीहि चांगल्या पगाराची होती. कालमानाप्रमाणं पैसा खायला त्यानं आरंभ केला असता तर महागाईच्या पहिल्या दोनतीन वर्षांतच यशवंत म्हणजे नामवंत धनिक होणं शक्य होतं पण ध्येयवादी कीं काय म्हणतात, तसं राहून नोकरी करावयाची असं त्यानं ठरविलें होतं !

सत्ता मुसलमानांची! यशवंतला अशी इतमामाची नोकरी मिळाली हीच कांहीतरी गफलत झाली असली पाहिजे ! तरीहि त्यांतल्या त्यांत यवन व्यापाऱ्यांना शक्य तो दाबायचं अन् हिंदू व्यापाऱ्यांना सवलती द्यायच्या असं व्यवहारी राजकारण करायला यशवंत भीत नसे !

राज्यकर्त्यांचं धोरणच असं होत चाललं होतं कीं, हिंदूला मुसलमानाचा द्वेष वाटावा ! मुसलमान म्हटला कीं यशवंतला चीड येत असे. सुदैवानं कीं दुर्दैवानं कुणाला माहित, त्याला चपराशी मिळाला होता तो मुसलमान ! त्याचं नांव यासीन ! .........

यासीन उपद्व्यापी आणि उपद्रवी माणूस होता. तो वयानं तरुण होता. सर्व प्रकारच्या व्यसनांचा व्यासंग त्यानं बालपणापासूनच चालवीत आणल्यामुळें या भर वयांत तर त्याचा भर होता! उन्हं वर आलीं, हॉटेलांत चहापाणी झालं आणि सर्व खाजगी धंदे आटोपले म्हणजे तो नोकरीवर हजर होत असे. मग सरकारी टपाल आणणं अथवा नेऊन टाकणं होईतों दहा साडेदहा होऊन जात. मग कधी नास्ता झालेला नसणं, कधी तब्यत ठीक नसणं, कधीं ‘दादी’ ‘नानी’ अशा नात्यागोत्याला स्टेशनवर नेऊन पोंचविणं अशीं निमसरकारी कामं उपटत. अशा सवलती घेऊनाहि यासीन

नेहमी कुर्च्यीत असे. सरकारचंच त्याच्यावांचून कांहीं अडत असलं पाहिजे, अशी त्याची कुणी खात्री करून दिली होती कीं काय न कळे ! संध्याकाळचे पांच साडेपांच झाले की त्याची नोकरी संपली ? मग कुणांचाहि फर्मान त्याला थांबवूं शकत नव्हतं. पान आणि पतनाच्या भानगडी मोहल्यामोहल्यांतून त्याची वाट पहात बसत असाव्यात ! दुकानदारांकडून तो पैसेहि खातो अशा वार्ता यशवंतच्या कानावर आल्या. ' फकीर मुरशद व्हायला सरकारी नोकरी करायची नसते ' असं यासीनचं रोखठोक सांगणं होतं !

यासीन दिवसेंदिवस यशवंतला दुःसह होत चालला होता. सनदशीर रीतीनें त्याचा कांटा काढण्यासाठीं यशवंतनं आपल्या अधिकाऱ्याला लिहिलं, ' मी हिंदु माणूस ! मेहेरबानगी करून मला एखादा हिंदू चपराशी द्यावा. ' सरकारी भाषेत उत्तर आलं, ' हिंदु चपराशी उपलब्ध होत नाहींत. सबब, आहे त्याच्याकडूनच काम घ्यावं. ' नव्वद टक्के हिंदूंचं संख्याबल असलेल्या प्रांतांत हिंदु चपराशी मिळत नाही असं म्हणणं म्हणजे जात्यंधतेची परमावधि होती ! यशवंत नुसता बेचैन होऊन गेला होता !

अधिकारी दौऱ्यावर आला तेव्हां यासीनबद्दल बोलणं निघालं.

' सरकारी कामासाठीं दिला गेलेला माणूस मुसलमान असला तरी काम कां अडावं, समजत नाही ! तुम्ही स्वतः हिंदु असाल ! पण नोकरी तर मुसलमानांची करतां ना ? मुस्लिम समाज आधींच अल्प ! त्याचं हित पाहण्याऐवजीं तुम्हीच सत्तेला नांवं ठेवावीं ? काय म्हणावं अशा मनोवृत्तीला ? '

यशवंताला नोकरी करायची होती ! अधिकारी बोलला तें ऐकून घेऊन गप्प बसणं भाग होतं !

एका सुटीचा आरंभ करणारी संध्याकाळ कांहीं मधुरतर कल्पनांचे फटकार घेऊन यशवंतच्या मनाला अस्थिर करती झाली ! आंच लागतांच सुरनळयांतून प्रकाशाचीं फुलंच्या फुलंच उडावीं तसं होऊं लागलं !

उद्यां गांवांतल्या एका वकिलाची मुलगी पहायला जायचं नक्की झाल होतं ! वकीलसाहेबांनीं पांचसहा वेळां यशवंतकडे चकरा केल्या होत्या.

'वस्तुलाभ पटला म्हणजे पुढील बोलणीं करायला वडिलांकडे जाईन' असं ते दर वेळीं अजीजीनं म्हणाले होते. आतांपर्यंत यशवंतनं तीनचार मुली पाहिल्या होत्या. पण त्यांतली एकहि मुलगी त्याला पटली नव्हती. नव्या मुलीबद्दल त्याच्या मनांत विचार येऊं लागले. या विचारांतून विविध तरंग निघाले. त्याच्या टेबलावर एक ताजं मासिक पडलं होतं. मुखपृष्ठावर एका उत्कंठित युवतीचं तिरंगी चित्र होतं. यशवंत जिला पहायला जाणार होता ती अशीच तर नव्हती?

सकाळीं न् संध्याकाळीं चाळीपुढून जातांना न् येतांना खिडक्यांतील एकेक कटाक्ष झेलण्यांत त्याला गंमत वाटत होती. त्याच्या सौंदर्याचा तो सत्कार होता! पण त्याला नशा आणील किंवा त्याला ध्यास लावील असा एकहि चेहरा त्या चाळींत आढळत नव्हता! ऋतुराजाच्या आगमनाबरोबर अंतःस्फूर्तीनं बहरून येणाऱ्या फुलवेली निराळ्या आणि कृत्रिम उपायांनीं आणलेली बहार निराळी! चाळींतली स्त्रीसृष्टि ही अशी दुसऱ्या प्रकारची होती! मग कल्पनेला आवाहन करण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. कधीं कधीं रात्रीं अथरुणावर अंग टाकलं कीं कुणी एक युवती आपल्याजवळ आल्यासारखी त्याला वाटे. तिची कुजबुज, तिचा स्पर्श, तिच्या नजरेंतलं वादळ आणि ओढ सर्व कांहीं त्यानं मनानं निश्चित केल्यासारखीं असतें. डोळे उघडून पाहिलं कीं ती मनोज्ञ आकृति अस्तंगत होई. प्रत्यक्ष एवढं ठिसूळ,तकलुबी होतं कीं कल्पनाजीवी वस्तूंना न् मूर्तींना जसंच्या तसंच तें धारण करूं शकत नव्हतं!

उद्यां पहायला जायची आजपासूनच तो तयारी करूं लागला.आरशापुढं उभं राहून प्रणयार्तीची उत्कंठा सुचविणाऱ्या पद्यपंक्ती त्यानं गुणगुणल्यासारख्या केल्या. तो सिनेमाला गेला. जात असतांना चाळींतल्या एका खिडकीकडं त्यानं पाहिलं. खिडकीचा रेशमी पडदा बाजूला सरकलेला होता आंत भरपूर प्रकाश होता. अन् सिद्धशय्या पर्यंकावर घराची मालकीण मच्छरदाणीची काठी धरुन वाट पहात बसली होती!

तिचा उभारलेला गौर बाहू त्याला दिसला होता. रात्रीं दिव्याच्या उजेडांत स्त्रियांचा रंग एवढा तकतकीत कां दिसावा? दिवा हा रतीचा सख

कीं शत्रू ? घरांत प्रकाश करायचा तरी कशाला ? पांथस्थ प्रियकराची वाट उत्कंठ प्रेयसीच्या नेत्रांनींच उजळ व्हायला पाहिजे ! तो स्वतः जे डोळे निवडणार होता ते कसे असावे ? सिनेमांतलीं चित्रं, हालचाली पाहतांना आणि ती पाहून परत येतांना त्यानं आपल्या कल्पनेला फुलवून टाकलं ! उद्यां त्याला त्याची प्रणयमूर्ति दिसणार होती ! तिच्या पहिल्या वहिल्या दर्शनासाठीं हव्या असलेल्या अनुरागाच्या आणि औत्सुक्याच्या रंगांनीं त्यानं आपली 'मनभरणी' पूर्ण केली होती !

अंथरुणावर त्यानं डोळे झांकले मात्र ! असं वाटलं कीं तो घाईनच कुठून तरी परत आला ! खोलींत केव्हांचा दिवा उजळलेला होता ! सौम्य शुभ्र रंगाच्या एखाद्या आसुसलेल्या पक्षिणीचा तो पिसारा तर नव्हता ? त्या अत्यंत सूक्ष्म, मऊ आणि उबदार पिसाऱ्यानं यशवंतला एकदम गाढ मिठी मारली !

बाह्य सृष्टींत एकदम कसला खडखडाट झाला कुणाला माहित ! यशवंत जागा झाला. त्यानं इकडेतिकडे पाहिलं. घरांत कुणी नव्हतं. दिवस चांगला वर आला होता. पांडू दूधवाला आला असेल असं त्याला वाटलं. पण सातआठ दिवसांपासून तो तर कुठं गडप झाला होता. दुधावांचून यशवंतची केवढी अडचण झाली होती ! समोरच्या मोटारस्टॅण्डवर गोंधळगोंगाट चालला होता. यशवंतनं उठून पाहिलं तों मोटारचं धूड येऊन थांबल होतं. त्याच्याच खडबडाटानें त्याला जागं केलं होतं !

चढणारांची न् उतरणारांची घाई चालली होती. चढउताराच्या त्या रेटारेटींतून एका स्त्रीची आकृति प्रकट झाली !

खच्चून भरलेल्या गुड्सच्या डब्यांतून सुबक रेशमी आवरणाचं एखांदच पार्सल कसं तरी खेंचून बाहेर काढावं तसं वाटलं तें !

समुद्रमंथनानंतर लक्ष्मीची आकृति पृष्ठभागावर येतांच दैवी आणि दानवी नेत्रांनींहि पाहिलं नसेल एवढ्या कुतुहलानें यशवंत तिच्याकडे पाहूं लागला. काय आश्चर्य ! ती त्याच्याच रोखानं सरकूं लागली. तिची हालचाल, तिच्या आकाराच्या रेषा अधिकाधिक स्पष्ट होऊं लागल्या. त्याला दाखविण्यासाठीं कुणी एखादा माणूस आपली मुलगी तर घेऊन येत नव्हता ?

"राम राम, मालक!..." या हांकेनं यशवंत सावध झाला.

तें अभिवादन पांडूचं होतं! चावट लेकाचा ! आठदहा दिवस त्यानं कुठं दडी मारली होती कुणाला ठाऊक ! त्यानं सांगून जायला नको होतं? म्हणजे दुधाची व्यवस्था करतां आली असती ! किंवा त्यानं तशी करून जायला हवं होतं ! एक छदाम त्याच्या हातीं ठेवायचा नाहीं, असा यशवंतानं निश्चय केला होता. पैशाची गोष्ट काढायचा उशीर, यशवंत त्याची हजेरी घेणार होता! पण पांडूनं पैशाची मागणी केली नाहीं. एखादं अपूर्व कार्य केल्याच्या आनंदांत त्यानं म्हटलं,—

"घरधनीण करून आणली साहेब ! दुधावांचून तुमची अडचण झाली असल ......"

तोंच पाठीमागून येत असलेल्या युवतीकडे पांडूनं सूचक दृष्टि टाकली. यशवंत जिच्याकडे रोखून पहात होता तीच होती ती !

रात्रभर केलेल्या चिंतनांतील आणि पाहिलेल्या स्वप्नांतील रंगरूप साकार झाल्यासारखं यशवंतला वाटलं !

विवाहसंस्कारांनीं झळकत असलेला सौंदर्य आणि आरोग्याचा असा डौल यशवंतनं यापूर्वी कधींच पाहिला नव्हता. तिच्या अंगावरचं नेसूं कोरं होतं. तें तिच्या अंगकांतीचीच झळक घेऊन झगमगत असलं पाहिजे! तें तिच्या रसरशीत यौवनाचा दर्प प्रकट करण्यासाठींच सळसळत असलं पाहिजे ! क्षणैक तिनं यशवंतकडे पाहिलं. काय धारदार कटाक्ष होता ! अशाच कटाक्षांनी मनाला नुसतं धुंद करून टाकावं, असं त्याला वाटलं ! पांडूचा त्या क्षणीं त्याला हेवा वाटल्याशिवाय राहिला नाहीं ! उतार वयांत त्यानं ही रानकिशोरी आणली तरी कुठून ? तिची त्याला जोपासना करतां येईल ? असेहि विचार त्याच्या मनांत आल्याशिवाय राहिले नाहींत.

मग तो अशा उत्साहानं न् त्वरेनं उठला कीं, जणुं त्याला लगेच गांवांतील मुलगी पहायला निघायचं होतं !

सकाळ झाली तरी दारावर विशिष्ट टिकटिक झाल्याशिवाय उठायचं नाहीं; असं यशवंतचं अलीकडे चाललं होतं. जरा वेळानं ती अपेक्षित टिकटिक व्हायची. ती परिचयाची असूनहि तो विचारीत असे,

"कोण ?"

"मी तान्ही ! दूध आणलंय् !"

दूध घालायला येणारी पांडूची बायको ती !

मग दार उघडलं जायचं. तान्ही स्वयंपाकघरांत प्रवेश करून नेहमीच्या पातेल्यांत दूध ओतायची. अन् तें झांकून ठेवून असा एक कटाक्ष यशवंतकडे टाकून जायची कीं, त्याचं तियाचं लक्ष्य होऊन रहाणं सुखकारक वाटावं ! यशवंतला तें तसं सुखकारक वाटत होतं. अन् मग दुसऱ्या सकाळची तो वाट पहात होता.

गेल्या कांहीं दिवसांपासून हा असा क्रम चालू होता !

गांवांतील वकिलाची मुलगी त्यानं पाहिली. ती त्याला पटली नाहीं. नेसूं, रंग, चेहरा, डोळे, आवाज शुष्क होतीं. यौवन होतं तें दबकत येऊन थांबलेलं ! रूप होतं तें यौवनाच्या चाहुलीनं प्रकट झालेलं ! त्याच्या कल्पनेंतला एकहि रंग त्या मुलीच्या ठिकाणीं नव्हता !

मुलगी नापसंत असल्याचं मुलीच्या आशाळभूत पालकाला त्यानं कळविलं. यशवंतनं ज्या रंगरूपाच्या मुलीशीं विवाह करण्याचं मनोगत ठरविलं होतं ती हुबेहुब तान्हीसारखीच होती ! ती मनोवासिनी त्याच्या खोलींत प्रकाश करून सिद्धशय्या पर्यंकांवर मोत्कंठ होऊन केव्हां बसणार होती कुणाला ठाऊक ! तोंवर तान्हीकडे पाहून तो स्वतःचं समाधान करून घेत होता ! रूपरसांचा एवढा घनगर्द थाट या व्रजांगनेनं कुठून मिळाविला असावा ? आतांच्याच रंगरेषा घेऊन मुळांतूनच तो साकार झाला असला पाहिजे ! कुणीकडे त्या पांढरपेशांच्या रूप-दरिद्री नटमोगऱ्या मुली ! अन् कुणीकडे ही मस्त रानवट जवानी ! मध्यमवर्गीयांच्या तरण्या मुलींजवळ कांहीं पहाण्यासारखं, लुब्ध होण्यासारखं आहे का नाहीं याचा सुक्ष्म दृष्टीलाच पत्ता लागूं शकत होता ! येथला आवेश कांहीं निराळा होता ! पुंज घनांनीच त्याची कल्पना यावी ! किंवा दुथडी वहाणाऱ्या सरितौघानांच तें अनुसरता यावं !

रसवाही वृक्षावर घडे लटकवून ठेवावे अन् रसानं ते केव्हां भरतील याची वाट पहावी, तसा तो तान्हीच्या आगमनाच्या क्षणाची सारखी वाट

पहात बसत होता! तिच्या अवयवाचं, पदक्रमाचं, हावभावाचं सूक्ष्म निरीक्षण करतांकरतांच ती निघून जात होती. आतां कचेरीला जावयाचा न् परत यावयाचा रस्ता त्यानं तिच्या घरावरूनच ठेवला. आपण तिला पहाण्यासाठींच तिच्या घरावरून जात-येत असतों, हें इतरांच्या अथवा पाठीमागून येणाऱ्या यासीनच्या लक्षांत येऊं नये, याची तो खबरदारी घेत होता. ती ओझरती दिसत होती. सुरक्षित फलभार कुणी पाहील या भयानं घाईनं सांपडेल तसा ओरबडून घ्यावा तसा तो तिची गौरकांती टिपून घेत होता! तें फक्त क्षणभरच! कारण मग दृष्टीपुढं जड आणि अभेद्य आडोसे येत होते! मग मानवी दृष्टीचा अधूपणा त्याला तीव्रतेनं जाणवत होता. लक्ष्य विषय दिसेल तिथं खेचून सतत दृष्टीच्या कक्षेत ठेवायचं नेत्रांना सामर्थ्य नव्हतं!

यशवंत आपल्या नित्य-दर्शनाला भुकेला आहे हें तान्हीनं अंतःशक्तीनं जाणलं कीं काय कुणास ठाऊक! त्याच्या जायच्या न् यायच्या वेळा तिला ठाऊक झाल्या होत्या न् नेमकी त्याच वेळीं ती घराच्या अंगणांत उभी रहात होती.

यशवंतच्या शेजारी नवीन बिऱ्हाड आलं. 'ॲग्रिकल्चरल असिस्टंट' असा त्याचा हुद्दा होता. 'जरीला' न् 'गांवरानी' कापसाचं वर्गीकरण करीत बसण्याऐवजी कृषक-कन्यकाशीं बोलणंच त्याला महत्वाचं वाटत होतं. दूध घालायला येणाऱ्या तान्हीकडे एकदोन वेळां त्यानं 'तशा' नजरेनं पाहिल्याचं यशवंतच्या निदर्शनास आलं. ती आली कीं तो तसं पहातो कीं काय, हे निरखायची एक नवीन कामगिरीच आतां यशवंतला लागली. यशवंतला राग येईल अशाच गोष्टी घडूं लागल्या. एकदां सहज तो यशवंतच्या खोलींत आला न् तान्ही पायऱ्या उतरून गेल्यावर म्हणाला,-

"फार झकास काम आहे!"

त्याच्या तोंडांत भडकवावी असं यशवंतला वाटलं. यशवंतनं एखादी कविता रचली असती किंवा एखादी मूर्ती घडविली असती आणि एखाद्या नाठाळानं तिची कुचेष्टा केली असती अथवा हीन मनोवृत्तीचं प्रदर्शन केलं असतं तर तो असाच संतापला असतां!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तान्ही आली तेव्हां त्यानं तिला मुद्दाम थांबविलं 'थांब' म्हणतांच ती थांबली. हें त्याला बरं वाटलं. मग त्यानं तिला विचारलं,

"शेजारच्या घरी किती शेराचा रतीब आहे !"

"दीड"

"उद्यांपासून तो बंद कर न् माझं दूध वाढव! नं तिथं दूध घालावंस हें मला पसंत नाही!"

काय नवल! तिनं चटकन् रुकार दिला. यशवंतला आवडतील तेव-ढ्याच गोष्टी करायच्या, हें तिनं ठरवूनच टाकलं होतं कीं काय! शिक्षणाचे संस्कार न झालेल्या या मुलीच्या ठिकाणीं समजसपणा केवढा, हा विचार यशवंतला फार सुखकारक वाटला! केवळ सौंदर्यदृष्टीच्या तृप्त्यर्थंच नव्हे तर त्याच्या अपेक्षांच्या पूर्तीसाठीहि ती झटत होती!

यासीनखांची हजिरी आतां रोजची आणि अधिक नियमित झाली होती. हा धटिंगण अलीकडे एवढा तत्पर कसा, याचं यशवंतला आश्चर्य वाटलं. कारण तान्ही यावयाच्या आंत यासीन घराच्या ओटयावर येऊन थांबू लागला न् कचेरीला जाताना यशवंतची सोबत करूं लागला.

कमालीच्या भुकेल्या नजेरनं तो तान्हीकडे पहात असल्याचं यशवंतला आढळून आलं! स्वतःच्या बायकोकडे एखाद्या गुंडानं कुत्सित नजेरनं पाहिल्यावर आला असतां तसाच क्रोध यशवंतला आला.

अरे रानवटा! विकारांनीं सडूनकुजून गेलेलं पटकूर हेंच ज्याचं महावस्त्र अशा माणसाला तान्हीकडे पहायचा कांहींच अधिकार नव्हता. कैफ केलेल्या नेत्रांना तान्ही दिसूं शकत होती? विषयानं बरबटलेलं मन तान्हीच्या क्षणैक ध्यानाला तरी योग्य होतं?

यासीनखांचा कसा सूड उगवावा हें यशवंतला समजेना. ती यायच्या वेळीं तो त्याला कांहीं तरी काम सांगून बाहेर पिटाळूं लागला. आणखी काय करणार?

परगांवचा दौरा काढावा लागला तर यशवंत तो अशा बेतानं आटोपूं लागला कीं सकाळ घरीं झाली पाहिजे! एकदां तो एका तालुक्याच्या गांवी गेला अन् गाडी चुकल्यामुळं त्याचा असा कांहीं खोळंबा झाला कीं, त्याल वेळेवर घराकडे परततां आलं नाहीं. रात्रीं झोप चांगली मिळाली तर दिवस आनंदांत जातो. त्याचं कालचक्र थोडसं उलट झालं होतं. सकाळ आनंदांत जाणार नाहीं या विचारानं तो बेचैन झाला. सबंध दिवस तळमळींत गेला. रात्रींची झोप विसकटून गेली. अन् प्रकाशाची आयुधं घेऊन कालपुरुष त्याला डिंवचूं लागला, खिजवूं लागला! तान्ही घरावरून परत गेली असली पाहिजे! शेजारचा 'गांवरानी कापूस' तिच्याकडे रोखून पहात असला पाहिजे ही कल्पना तर त्याला फारच बोचली. यासीन बरोबरच होता म्हणून बरं होतं. नाहीं तर कुणाला माहित, यशवंतच्या गैरहजेरींत तान्हीला जबरीनं बरोबर घेऊन तो पळून गेला असता!

यशवंतनं खिडकींतून खालीं पाहिलं. खालून कुणी तरी दूधवाली जात होती, ती जात होती हे ठीक होतं. पण पाठीमागून येत असलेल्या एका मुसलमानाच्या चावट हांकेसरशी ती थांबली, त्याच्याशी कांही बोलली न् फिदफिदी हंसली; हा प्रकार यशवंतला आवडला नाहीं. मग त्या मुसलमानाची न् खालीं व्हराडयांत बसलेल्या यासीनखांची नजरानजर झाली. हंसत सलाम आणि हातमिळवणीचे शिष्टाचार झाले. त्या गौळणी वरून संभाषण सुरू झालं. आपले कान विटाळूं नयेत असं यशवंतला वाटलं पण त्या संभाषणाचा उपसंहार यशवंतच्या कानावर पडलाच.

यासीनखां दर्द भरल्या आवाजांत सांगत होता.

"मोहब्बत क्या चीज है हें तुला नाहीं समजणार याकूब! मला माशूक मोठं बेदर्दी मिळालंय् ! माझ्या कलेज्याच्या रक्तानं स्वतःचीं पावलं रंगल्याचं दिसत असूनहि तें कांहीं दाद घ्यायला तयार नाहीं!..."

यशवंत स्वतःशींच खो खो हंसूं लागला.

यासीनची मजल कावित्वापर्यंत पोंचली होती हें आश्चर्य नव्हतं तर काय? ढोंगी बदमाष! तान्हीकडे तो कशा दृष्टीनं पहात होता हें यशवंतला

टाऊक कां नव्हतं ? वासनांच्या धुराळ्यांत सदैव लोळणाऱ्या यासीनखां-सारख्या माणसान प्रेमाच्या लंब्या बाता झोंकण्यांत कांहीं अर्थ होता ?

अखेर यशवंत वरसणीकडे येणाऱ्या गाडींत बसला. घरीं यावयाला संध्याकाळ झाली होती मग रात्रीं अंथरुणावर अंग टाकल्यावर वाढत्या अंधाराला त्यानं मनोमन म्हटलं,

"हे तमांधा ! उत्कंटितांच्या तृप्तीचं श्रेय निदान एकदां तरी घे ! आंवर, आंवर आपलं मायाजाल !..."

अखेर एकदांची सकाळ झाली. दारावर टिकटिक होतांच त्यानं विंचारलं,

"कोण"

"मी तान्ही ! दूध आणलंय् !"

तोच आवाज ! तेच मोजके शब्द ? तीच दृष्टी ! साऱ्या गोष्टी जिथल्या तिथं आणि जशाच्या तशाच होत्या. अन् विशेष म्हणजे यशवंतला आवडत असलेल्या क्रमानेंच त्या घडत रहाव्या ही योजना अबाधित होती !

यशवंतला आणखी एक मुलगी सांगून आली असल्याचं वर्तमान घरून आलेल्या पत्रांत होतं. मुलगी सुस्वरूप होती ! मुलीचे वडील नामांकित वकील होते ! यशवंतनं स्वतः एकदां मुलगी पाहिली आणि निवडली कीं, पुढील गोष्टी बोलायला आणि करायला मुकर होणार होत्या ! वडिलांनीं त्याला लिहिलं होतं-- 'शक्य तितक्या लवकर एक दिवसासाठीं येऊन जा!'

सध्यां रजा मिळणं कठीण असल्याचं यशवंतनं नम्रतेनं लिहिलं !

म्हणे मुलगी सुस्वरूप होती ! पांढरपेशांचा 'सुस्वरूप' या शब्दाचा एक ठरीव अर्थच होऊन बसला होता कीं काय न कळे ! चार बायकांसारखी ती सुस्वरूप ! — लग्नाला जिचं रूप (?) योग्य झालं आहे ती !

ती 'सुस्वरूप' मुलगी त्यानं कल्पनेनं आपल्या डोळ्या पुढं आणली. प्रसाधन – चूर्णानं चेहरा रंगविलेली, किडक्या शरीरावर झगमगतं वस्त्र गुंडाळलेली, फुगीर बाहीच्या झंपगांतून बारीक बाहू लुळलुळ लोंबत असलेली

एक सामान्य युवती! बस्! तान्हीचा ठसका तिथं आढळेल हें शक्यच नव्हतं! विकारांचा वन्हि शमवायलाहि सौंदर्याबरोबर सामर्थ्य असावं लागतं! तें तान्हीच्या ठिकाणी होतंच होतं! आधीं तान्हीकडे पहावं न् मग एखादी मुलगी सुस्वरूप आहे की नाही हें ठरवावं, म्हणावं, नाहीतर लिहावं!

अशा गोष्टी वडिलांना सुचवतां आल्या असत्या तर यशवंतला कशी मुलगी पसंत पडेल हा प्रश्न चटकन सोडवितां आला असता!

तान्हीचा वेष मळकट होत होत आतां बऱ्याच ठिकाणी जीर्ण झाला होता. वांड्च्या खुज्या घरांतल्या संसाराच्या खडबडीशी टक्कर घेऊन तिच्या विवाहवस्त्राची नवता झिजून गेली होती! कांचोळीचा भाग तर असा कांहीं तटतटून गेला होता कीं, जणूं एखाद्या डौलदार पांखराचं मर्मस्थलावरलंच एखादं मनोरम पीस उखडून गेलं होतं! तें दैन्य यशवंतला पहावलं नाहीं. त्याच्या सौंदर्यदृष्टीचा तो अपमानच नव्हता तर काय? तो फाटक्या भागाकडे रोखून पहात आहे असें लक्षांत येऊनहि तान्हीनं पदर सावरला नाहीं! यशवंतनंच ती लाज झांकायला पाहिजे होती, हे सांगायला शब्द कशाला हवे होते?

त्यानं विचारलं,

"तानें कपड्यांची एवढी आबाळ कां झाली?"

पहिली अडचण म्हणजे पैसे नव्हते! पैसे जमविले तरी कापड बाजारांत उघड रीतीनं आणि मनासारखा कपडा मिळेल हें शक्य वाटत नव्हतं!

जगाचे आर्थिक व्यवहार कधीं सुरळीत होणार होते कुणाला माहित? अन्नवस्त्राच्या नित्याच्या गरजा मुक्त करणारा काळ आणखी किती दूर होता?

मग यशवंत कापडबाजारांतून हिंडूं लागला. देखरेखीसाठीं नव्हे!— त्याला एक चांगली साडी खरेदी करायची होती! साड्यांचे नमुने पहात असतांना एक दोघा दुकानदारांनीं विचारलं,

"जुळलं कीं काय साहेब आपलं? आम्हाला लवकरच लाडू आहेत म्हणायचे!"

यशवंत एकेका साडीचा पोत पाहूं लागला. रंगरंजन हाच ज्या प्रमदेचा एकमेव विलास अशा मनोरमेला कोणत्या रंगाची साडी घ्यावी, किनार कसली निवडावी, हें त्याला ठरवितां येईना.

एकदांची निवड आणि खरेदी झाली आणि ती जिची तिला पावतीहि झाली. कल्पनेचं क्षेत्र जेवढं व्यापक असूं शकतं तेवढयाच्या प्रत्येक अंशांत त्या नव्या साडीची सळसळ भरून गेली होती ! मध्यरात्रीच्या निवांत वेळीं पूर्ण आणि पक्व फळांच्या रसाच्या आणि गंधाच्या संघर्षांतूनच ती सळसळ निघाली असली पाहिजे !

रात्रीची सामसूम झाली न् यशवंतचं दार टिकटिकलं गेलं ! त्यानं दार उघडून पाहिलं तों तान्ही ! ती चटकन् आंत झाली न् तिनं दार बंद करून घेतलं ! नवी साडी लेवून यशवंतला दाखवायला ती आली असली पाहिजे. वेलींच्या जाळींतून झिरपणाऱ्या चांदण्याप्रमाणं त्या साडीच्या मावळत्या झिरझिरींतून तिचा रूपभार दिसत होता. दृष्टी कावरीबावरी दिसत होती. अनिश्चितीच्या शंकेनं न् भयानं श्वसन अस्थिर आणि कांहींसं अनावर वाटत होतं. ती अस्थिरता उरोजांना हेलावीत होती ! दिवा मालवून टाकावा आणि त्या हेलावांत कायमचं बुडून, मिटून जावं असं यशवंतला वाटलं. पण प्रकाश मालविल्यावर कांहीं चांगलं दिसण्याऐवजीं आपल्याच नग्नतेचं प्रदर्शन होईल अशी यशवंतला शंका आली असावी. कांपऱ्या हलक्या आवाजांत त्यानं विचारलं,

"तान, तूं अपरात्रीं इकडे कशी ?"

या शब्दांनीं तिच्या मुग्धतेचा ओरखडाच काढला कीं काय न कळे ! तिनें कोणत्या शब्दांत उत्तर द्यायला पाहिजे होतं !

"घरीं एकटीच आहे मी आज ! रात्र इथंच काढीन म्हणते !....."

ज्या भाषेत कविता लिहिल्या जातात, परस्परांवर आसक्त झालेल्या सुशिक्षित युवकयुवतींची अनामिक मागणी ज्या भाषेत व्यक्त केली जाते, ती भाषा तिला अवगत नव्हती ! ज्याच्यावर मन जडलं अशा एका उच्च

कुळांतल्या माणसाला आपलं मनोगत शक्य तेवढं सुस्पष्ट व्हावं म्हणून साध्य असलेल्या शब्दांचा तिनं आधार घेतला होता!

पदराचं टोंक ती बोटाला गुंडाळींत होती; अन् 'कांहीं चुकलं तर नाहीं?' अशा अभिप्रायानं ती यशवंतकडं पहात होती.

शेजारच्या घरांत खुडबुड झाली. यशवंतचें काळीज जोरानें धडधडूं लागलं.

तान्हीला त्यानं वेगळं अंथरुण दिलं, अन् प्रकाश मालवून टाकला. तिचा श्वास, तिच्या नव्या वस्त्राची सळसळ, तिची चुळबुळ, तिच्या बांगडयांची किणकिण या सर्वांच्या ध्वनींचा एक प्रचंड प्रवाह झाला! त्या त्याच्या ईप्सिताच्या लाटा तर नव्हत्या? त्या त्याच्या अंथरुणाजवळून धो धो वाहत होत्या. त्यांत मग्न होणं न होणं हें त्याच्या स्वाधीन होतं! त्यांचा प्रत्येक आघात त्याला हादरून टाकूं लागला. त्या लाटांचा आवाज आणखी मोठा होऊं लागला. शेजारींपाजारीं तो ऐकूं जाऊं लागला. एवढंच नव्हे तर तो यशवंताच्या वडिलांच्या कानावर गेला कीं काय?

कारण दारावर थाप पडली आणि प्रत्युत्तरादाखल आवाज आला तो यशवंताच्या वडिलांचाच!

बाप रे!

यशवंतनं दार उघडलं. प्रकाश केला. तान्ही उठून बसली. यशवंतच्या घाबरटपणाला अंत राहिला नाहीं. खरजुल्या कुत्र्याकडे पहावं तसं वडिलांनीं तान्हीकडे पाहिलं. सुचरित पित्याच्या मुलानं घरांत कामशांतीचं उपायन आणून ठेवावं? यशवंत सारख्या कडून अशा अपेक्षा नव्हत्या! ते काय पहात होते हें?

त्यांनीं घोगऱ्या आवाजांत विचारलं,

"ही कोण!"

ही कोण? यशवंतच्या सौंदर्य–कल्पनांचा साक्षात्कार! त्याची आदर्श वधू! त्यानं आपलं प्रेम जिला अर्पण करायचं टरविलं होतं ती हीच!

यशवंतचं खरं उत्तर हें होतं. पण तें वडिलांसमोर सशब्द झालं नाहीं. त्यानं म्हटलं,

"ही आमची चाळींतली दूधवाली! नवरा गांवीं गेला आहे अन् गांवांतलं वातावरण कुलांगनांनीं रात्रीं एकटं घरीं रहावं असं राहिलं नाहीं. सकाळीं येईलच हिचा नवरा न्यायला!......"

विभिन्न शय्या आणि चांचरत आलेले शब्द यावर वडिलांनीं विश्वास ठेवला कीं नाहीं कोण जाणे! अमके वकील आपली मुलगी घेऊन आल्याचं अन् गांवांत तमक्याकडे उतरल्याचं त्यांनीं सांगितलं. मग कपडे काढून त्यांनी एक सतरंजी ओढली न् उपरणं झटकून ते व्हरांड्यांत पडले.

त्यांच्या प्रत्येक कृतींत निषेध नुसता खवखवून आल्यासारखा दिसत होता!

सकाळीं यशवंत उठला तो नेहमींच्या उत्साहानं नव्हे! उत्सवाची आरास तो सुरू होण्यापूर्वींच उधळली जावी, मांडव उन्मळून पडावा, पेयपात्राचे खंड झालेले दिसावे, नर्तिकांचीं नूपुरं विखुरलेलीं दिसावीं, आणि त्यांच्या उंची तलम वस्त्रांच्या चिंध्या होऊन त्या वाऱ्यावर भरकटाव्या तसं त्याच्या कल्पनाजीवनाचं झालं होतं!

तान्ही केव्हांच उठून गेली होती! अंथरायला मिळालेली सतरंजी वांकडीतिकडी कशी तरी गुंडाळून तिनं कोपऱ्यांत ठेवली होती. जणुं तिच्या अभिलाषेचा तो चोळामोळा होता! तें फटकूर यशवंतचं होतं न् तें यशवंतसाठीं तिनं तसंच गुंडाळून ठेवलं होतं!

मग यशवंतचे कांहीं दिवस धूमधडाक्यांत न् गाजावाजांत गेले होते. माणसांची गर्दी, वाद्यं, आहेर, मेजवान्या, काय एकेक भानगडी झाल्या होत्या! मुलगी पाहणं, बोहल्यावर चढणं, मंगलाष्टकं संपतांच माळा अर्पण करणं, हाताला हात लावणं न् एकनिष्ठेच्या संस्कृत शपथा घेणं हे प्रकार आटोपले होते! पण जिच्याबरोबर हें सारं आटोपलं होतं, तिचा चेहरा मात्र त्यानं कधींच नीट पाहिला नव्हता!

नोकरीवर रुजू व्हायला तो परत वरसणीला आला. रात्रीं स्टेशनहून टांग्यांतून येतांना रस्त्यावरील दिव्याच्या उजेडांत त्याला तान्ही दिसली.

हां, ती तान्हीच होती ! पदर सांवरला नाहीं किंवा यशवंताबद्दल कुतूहल प्रदर्शित केलं नाहीं. वाममार्गावरून ज्या रंग ढंगांनीं हिंडावं लागतं ते तिच्या अंगवळणी तर पडले नव्हते ? ती पान चघळीत होती न् तिनं एकदोन पिचकाऱ्याहि टाकल्या. सुगृहिणीनं खाल्लेलं पान आणि जारिणीनं चघळलेला विडा यांतला फरक कळणं कठीण नसतं !

टांगा थांबवून त्यानं तिला हांक मारली, पण तिनं ती कानांवर घेतली कीं नाहीं कोण जाणे ! तेवढ्यांत तिला कोणीतरी जोडीदार मिळाला अन् त्याच्याशी ती दिलखुलास बोलूं लागली !

लग्नानिमित्त मेजवानीची अन् नवी नवरी लवकर घेऊन येण्याची मागणी चाळींत यशवंतची वाट पहात होती. त्याच्या गैरहजरींत घडलेले चाळींतल्या जीवनांतले सामान्य चढउतार सर्वांनीं त्याला सांगितले. राजकारणहि झालं. एक विशेष बातमी म्हणजे गांवांतल्या धनाढ्य हिंदुव्यापाऱ्याचा, ज्याच्या दुकानांतून यशवंतनं मागे साडी विकत घेतली होती त्याचा खून झाला होता. यशवंतचा चपरासी यासीन खुनाच्या भानगडींत असल्याची बारीक बातमी होती. पण तो गांवांत उजळ माथ्यानं वावरत होता !

खून होणं न् खुनी मुक्तपणानं हिंडणं अशा गोष्टी उजळ माथ्यानं वावरत होत्या.

दुसऱ्या दिवशीं सकाळी यासीनखां सलामीसाठीं साहेबाकडे आला, व तो नुसताच आला नाहीं, तर नोकरीचा लेखी राजीनामा साहेबाला दिला.

आपण होऊन ही पीडा जाते आहे याचा यशवंतला अत्यानंद झाला. वरपांगी खेद प्रदर्शन करीत त्यानं विचारलं,

" नोकरी कां सोडतो यासीनखां ?"

" सरकारी नोकरी आतां जमणार नाहीं साहेब ! प्रेयसीला घेऊन खेड्यांत जाऊन रहायचं ठरविलं आहे मी ! "

प्रेयसी ! यशवंतनं हास्याची उकळी दाबली न् म्हटलं, " अस्सं ! पण चरितार्थ चालवायचं साधन काय ? "

हातांतल्या दंडुक्यावरील पकड आवळींत त्यानं उत्तर केलं,

'खुदाची माथ असल्यावर सबकुछ आहे !'

तो दंडका आणि तो पेलणारा हात या गोष्टी म्हणजेच त्याचा खुदा होता !

दुसऱ्या दिवशी आणखी एक घटना घडली. मोटार – स्टँडवर यासीनखां नं तान्ही गांवाला जायच्या तयारीनं उभी होती ! तान्ही यासीनखां-बरोबर निघून जात होती हें उघड होतं अन् चार चौघांची माहितीसुद्धां हेंच सांगत होती !

चाळींतल्या नजरा खिडक्या खिडक्यांतून मोटार स्टॅण्डकडे पहात होत्या. मोटार आली आणि या नवोढ्या जोडप्याला घेऊन मंर्र आवाज करीत चालती झाली.

गावरानी कापसाचा पदवीधर आणि आणखी एकदोन वावदूक राज-कारणी यशवंतच्या खोलींत जमले होते. अर्थात् त्या दिवशी सुटी होती न् राजकारणाची चर्चा करायला उत्पातकारी प्रसंग घडला होता. कृषितज्ञ म्हणाला, --

'या अशिक्षितांचं मानसशास्त्रच फार निराळं असतं ! तान्हीसारख्या स्त्रिया शिक्षितांकडे कधी चुकूनसुद्धां वळणार नाहीत ! .. ...'

विश्वांतील सर्व कार्यकारणभावांचं मूळ आपल्यालाच समजूं शकतं अशा विश्वासानं आणखी एका मुरब्बी माणसानं वक्तव्य केलं, --

'मी तिला पहिल्यांदा पाहिलं तेव्हांच तिची चाल ओळखली ! पाडूनं उतारवयांत लग्न करायला नको होतं ! केव्हांतरी हें असंच होणार होतं, याची मी खूणगांठ बांधून ठेवली होती ! निदान एकाद्या हिंदु माणसाबरोबर तरी तिनं पळून जायला पाहिजे होतं ! ......'

यशवंत स्तब्ध होता. मोटार गेली त्या दिशेकडे तो निश्चल नजरेनं सारखं पहात होता. कांहीं दिसत नव्हतं. मोटारनं उडविलेला धुरळा मात्र वर झेप घेत घेत नाहींसा होत होता !

---

# जिथं तांबडं फुटायचं आहे! ● ●

'मराठवाडी' ते 'डोंगरखेड' पर्यंत सत्तावीस अठ्ठावीस मैलांची एक पक्की सडक सरकारनं तयार केली आहे. सडकेच्या नांवानं वार्षिक रिपोर्टात पडलेला खर्चाचा आंकडाहि तसाच जबर आहे. तो तसा असणारच! कारण वाहतुकीच्या सोयीबरोबर कांहीं लहान मोठया नोकरवर्गांचं जन्माचं कल्याण व्हावं अशी सरकारी इच्छा त्याच्या मुळाशी नसेल असं म्हणतां येणार नाहीं!

सडकेच्या आंखणीच्या वेळीं झालेल्या गमती न् गफलती काय सांगाव्या! रस्त्यासाठी ज्यांचीं शेतं गेलीं त्यांना अद्याप सरकारकडून मोबदला मिळाला नाहीं अशा तक्रारी आहेत. या तक्रारींत कांहीं अर्थ नाहीं. रक्कम मिळायला थोडासा वेळ झाला म्हणून काय झालं? सर्व नंबर पहावे लागतात. प्रत्येकाची जमीन किती गेली याचा हिशोब घ्यावा आणि द्यावा लागतो. त्याला मजूरी मिळवावी लागते. कामाच्या गर्दीमुळें कित्येक वेळीं नेमके कागद सांपडत नाहींत. काय एकदोन भानगडी असतात त्या? रेव्हेन्यु खातं काय झोपा काढीत बसलंय? लोकांचा सरकारवर विश्वास असू नये हें एक नवलंच म्हणावं न् काय!

या सडकेसारख्या सुधारलेल्या सुखसोयीचं लोण ज्या ज्या गांवावरून दवाखान्यांत आले. एक खटारा मोडतोड नेतां आलं आणि नेलं, तिथं

पोलीस चौक्या कायम झाल्या आहेत ! चोरांची, लुटारूंची आतां भीति अशी राहिली नाहीं. पण खेडवळ माणसं अडाणी तशीं असमंजस ! सरकार ही काय ' चीज ' आहे याची कल्पना नसल्यामुळं या नव्या सुखसोयी आणि व्यवस्थेची त्यांना सारखी धास्ती वाटत आहे !

आतां हेंच पहा ना, पक्का रस्ता झाल्यांमुळं ' डोंगरखेडसारखा ' तालुका ' मराठवाडी ' जिल्ह्याला किती जवळ असल्यासारखा वाटतो. डोंगरखेडला एकादी दंगल, दंगा अथवा खुनाखुनी झाली तर मराठवाडीहून पाठविलेली सरकारी मदत चटकन् पोंचूं शकते. सरकारी कामं सुरळीत चालली आहेत किंवा नाहीं हें नेमलेले अधिकारी हौसेनं न् आरामशीर रीतीनं पाहूं शकतात !

रहीम रोहिल्यानं बससर्व्हिस सूरू केल्यापासून तर दळणवळण, आणि त्यांतून निघणाऱ्या इतर कित्येक धंद्यांना उत्तेजन मिळाल्यासारखं झालं आहे !

सर्व्हिसच्यां बाबतींतली एक गंमत अशी सांगतात कीं, सडक तयार झाली न् वाहतुकीला खुली केली गेली ! दुसऱ्या जिल्हयांत मोटार-सर्व्हिसमध्यें भांडवल गुंतवून बेफाम नफा लुटीत असलेला एक पारशी ह्या सडकेवर डोळा ठेवून होता. वेळ येतांच कांहीं ओळखी आणि ' वजन ' घेऊन त्यानं सर्व्हिसची परवानगी काढली ! डोंगरखेडच्या ब्राह्मण वाकिलाचा एक गबर पोऱ्या परवानगीसाटीं मुटाबुटांत कचेरींत खेटे घालून थकला आणि गार होऊन बसला !

मग सकाळ संध्याकाळ पारशाचें दोन खटारे रस्त्यावरून खडाडूं लागले. खटारेच ते ! गरजेपेक्षां माणसांची सहानुभूतीच त्यांना चालवूं शकत होती ! सीटा, छत, आणि ड्रायव्हरजवळची जागा मिळून चाळीस पन्नास माणसांची वाहतूक करतांना कांहीं एक आंकडा बाद धरावा लागतोच ! कधीं पोलीस जमादार आहेत, कधीं फौजदार आहेत ! ह्या लोकांच्या प्रवासाचं महत्व पारशाला कसं कळणार ? व्यापारी धोरण पारशाला नडलं.

एक दिवस असा आला कीं. ते रेंगाळणारे खटारे चालविणारे ड्राय-व्हर मार खाऊन 'मराठवाडी'च्या सरकारी दवाखान्यांत पडले होते ! एक खटारा नादरुस्त होऊन दुधना नदीच्या पुलाखालीं पडला. दुसरा सडके-वरून कुठं कसा गडप झाला, कळलं नाहीं !

तपासणीच्या सरकारी हालचाली पद्धतशीर सुरूं व्हायला फारसा वेळ लागला नाहीं ! पारशीच दुर्दैवी ! ड्रायव्हरांना मारणारी माणसं सांपडली नाहींत, अन् मोटारीचा खटारा तर कुठंच आढळला नाही ! मग सरकारी गोटांतून आवाज निघूं लागले:– पारशाजवळ दोन मोटारी होत्या याला पुरावा काय ? उतारूंनीच ड्रायव्हरांना मारलं असलं पाहिजे ! बिचारा पारशी ? अखेर त्यानं मोडतोड झालेला खटारा पडेल भावांत फुंकून टाकला न मराठवाडी जिल्ह्यांतलं आपलं चंबूगवाळं आटोपलं !......

मग रहीम रोहिल्यानं आपली सर्व्हिस सुरूं केली.

प्रारंभीं रंगरंगोटी आणि जोडघड करून नवेपणा आणलेली एक मोटार रस्त्यावरून हालूं लागली. असं कांहीं गुपचुप आणि शांतपणानं काम चालूं झालं कीं विचारूं नये !

अशाच कांहीं उल्लेखनीय गोष्टींपैकीं आणखी एक गोष्ट सांगण्यांत येते. रहीम साहेबांचा एक टूरींग सिनेमा होता. खेड्यांतून न् यात्रेतून त्या फिरत्या सिनेमाचा फार उपयोग होत असे. मराठवाडी सारख्या जिल्ह्याच्या ठिकाणीं चांगल्या थिएटरची उणीव फार जाणवत होती. गावांत बंकटसिंग नांवाचा एक हरहुन्नरी माणूस होता. तो घड्याळं नीट करीत असे, साय-कलीचं दुकान चालवीत असे, फोनोच्या मशीनची रिपेरी करीत असे. त्यानं कांहीं भांडवल जमा केलं अन् एका जुनाट गोदामांत बोलका सिनेमा चालूं केला. तशांत रोहिल्याचा फिरता सिनेमा जिल्ह्याच्या ठिकाणीं तळ ठोकून बसला.

धंदा म्हटल्यावर त्यांत चढउतार असणारच ! असं दिसूं लागलं कीं, बंकटसिंग टॉकीजमध्यें प्रेक्षकांची 'ही गर्दी' झाली आहे ! अन् रोहि-ल्याच्या तंबूंत खेळ सुरूं व्हायच्या नुसत्या घंटा खणाणत आहेत.

रहीम रोहिल्यानं पडत्या काळाची पर्वा केली नाहीं. कारण चांगले दिवस आणावे लागतात हें त्याला माहीत होतं. मग असा काळ आला कीं, बंकटसिंगला वेड लागल्याचं लोक बोलूं लागले. असंहि उजेडात आलं कीं, बंकटसिंग भयभीत झाला आहे ! बडबडतो आहे ! दोन तीन माणसांनीं त्याला धरलं आहे, एक धिप्पाड माणूस छातीवर बंदूक रोखून धमक्या देतो आहे, अन् सिनेमाचा धंदा बंद कर म्हणतो आहे, अशी कांहीं वाक्यं तो बोलतो आहे ......

अखेर एके दिवशीं ' बंकटसिंग टॉकीज ' ही पाटी काढली गेली. अन् त्या ठिकाणीं रोहिल्याचं नांव झळकूं लागलं.

रोहिल्याच्या चलतीला आतां अंत राहिलेला नाहीं !

× × × × ×

रहीमच्या नांवाबरोबर त्याच्या गांवाचाहि उल्लेख नेहमीं होत असतो. त्या मग्रूर पठाणी थाटाकडं पाहून ' कोण हे ? ' असं एकाद्यानं विचारलं तर माहितगाराकडून हलक्या आवाजांत उत्तर येतं, ' रोहीलवाडीचा रोहिला ! '

मराठवाडी ते डोंगरखंड या टापूंत ' रोहीलवाडी ' आतां चांगली गाजते आहे. कांहीं गोष्टींचं हें असंच असतं ! त्यांचा सुगंध अथवा दुर्गंध प्रसृत झाल्याशिवाय रहात नाहीं !

सरकारी तनखाचा खुराक असलेल्या मेंदूंतून ग्रामसुधारणेच्या, आदर्श ग्रामाच्या कांहीं योजनाबद्ध गोष्टी प्रसिद्ध होत आहेत. आदर्श ग्राम कसं असावं हें सप्रयोग दाखविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

रोहिलवाडी हें आदर्श ग्राम आहे असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. तिथलीं घरं खुलीं आणि खुलासेवार आहेत कीं नाहीं, घाण आणि घाण-पाण्याची वाहणी काहीं एका विशिष्ट पद्धतीनं केली आहे किंवा नाहीं, एव-ढ्याच गोष्टीवरून आदर्श ग्रामाची कल्पना पूर्ण होते असं म्हणतां येणार नाहीं.

रोहीलवाडीत कुणी भांडखोर नाहींत तेव्हां भांडणं कुठलीं ? पोलिसांची, न्याय अथवा रेव्हेन्यू खात्यांतल्या माणसांची

दगदग वाढविण्याची प्रजेंत महाभयंकर साथ पसरली आहे ती रोहिल-वाडींत आढळणार नाहीं! या भागांत नावांजलेले करडे फौजदार येऊन गेले, पण रोहीलवाडी पाहून त्यांना 'ब्र' म्हणतां आलं नाहीं! 'खाण्या-पिण्यांत' मोठ्या जबड्याचे न् जहांबाज मामलेदार आले आणि बदलले; पण रोहीलवाडीवर आपला अंमल चालविण्याची त्यांना इच्छा झाली नाहीं. पोलीस कमिशनर आले अन् ठाण्यावरील हडेल हप्पी पाहून चालते झाले. रेव्हेन्यूमेंबरनं दौरा केला अन् 'या भागांत पिकं चांगलीं आहेत नाहीं!' असं मोटारींत शेजारी बसलेल्या कलेक्टरला विचारुन आबादानी-बद्दल समाधान व्यक्त केलं.

'रोहीलवाडी' हें 'आदर्शग्राम' आहे असं सिद्ध झाल्यावर सरकारी अधिकाऱ्यांनीं तिथं जाऊन पहायचं काय?

कांहीं दिवसांपूर्वी ही पठाणी जमात 'गुन्हेगार' समजली जाऊन त्यांच्या प्रवेशावर नियंत्रण होतं. तें आदर्श ग्राम वसवूं शकतात हें ओळखू-नच कीं काय आतां सरकारनं सारे निर्बंध नाहींसे केले आहेत, आणि त्यांना जिकडं तिकडं प्रवेश सुलभ करुन ठेवला आहे!

रोहीलवाडीच्या बाजूला कांहीं पडकीं घरं दिसतात. तिथल्या घरांना इतिहास होता न् ऐतिहासिक महत्व होतं. 'देशमुखवाडी' या नांवानं ही वस्ती ओळखली जात होती. तिथली एखादीच वीट, एकादाच दगड किंवा घराचा एकादाच उरलेला भाग पाहून वस्तीचा दर्जा ओळखतां येत होता.

हें पहा देशमुखवाडीचं बाहेरचं पटांगण! पटांगणाच्या त्या शेवटच्या टोंकाला पिंपळाचं भलं मोठं झाड उभं आहे. झाडाच्या जन्मापासून देश-मुखवाडीला अस्तित्व आलं असावं! त्याला फारशी पानें राहिलेलीं नाहींत. उध्वस्त वस्तीच्या थडग्यावर अश्रु ढाळतां ढाळतां त्याचाहि हृदयोदधि शुष्क झाला असावा! झाडांवर पाखरांची घरटींहि दिसत नाहींत. वेळ सांपडेल तेव्हां बंदूक वागावणारे कांहीं नवे शिकारी तिथून हिंडत असतात. त्याचा तो परिणाम म्हणायला पाहिजे.

ही इकडं विहीर!

वेशीची विहीर असं हिला म्हणत. तहानलेल्या न् थकलेल्या वेशीबाहेरूनंच जाणाऱ्या प्रवाशांना पाण्याची सोय व्हावी म्हणून एका देवरुप देशमुखानं कल्पना बोलून दाखविली. दुसऱ्या दिवसापासून सारं गांव रिचविलं. थोड्याच दिवसांत विहीर बांधून तयार झाली. कित्येक कुलांगनांचे प्रतिप्रभातीं विहिरींत पोहरे बुडत. त्यामुळें त्या निळयाडोंब पाण्याला असा कांहीं मिठासपणा आला कीं, त्याची चव माहित असलेला पण फारशी तहान नसलेला पांथस्थ पाणी प्याल्याशिवाय पुढं जात नसे. विहिरीच्या बाजूला अप्सरांची प्रीतष्ठा होती. न्हात्याधुत्या पोरींना किंवा बाळंतिणींना बाहेर–बाधे पासून वाचविणाऱ्या त्या देवता आहेत अशी श्रद्धा अढळ होती!

आतां गृहिणी त्या स्थानांकडे फिरकत नव्हत्या!

हें देशमुखवाडीचं मारुतींच देऊळ! पडझड झाली असली तरी दाक्षिणी बांधणींतला डौल आणि दिमाख पूर्ण नष्ट झालीं नाहींत. चौथरा शाबूत आहे. जोत्याचे कांहीं घडीव काळे दगड मात्र कुणी मुद्दाम काढून नेल्यासारखे दिसतात. आतां देवळांत तेलवात होत नाहीं! पारांवर कुणी बसलेलं आढळत नाहीं! एकादी महामारी यावी न् साऱ्या वस्तीला धुवून चालती व्हावी तशी विलक्षण निर्मनुष्यता त्या स्थानीं दिसते!

या वेशीच्या बुरुजावर विनाश केव्हांचा पाय देऊन उभा आहे. बुरुजावर रात्री अपरात्रीं एखादं पाखरु घुमूं लागलं म्हणजे देशमुखवाडीची विटंबित वास्तुसुंदरी अतिकरुण विलापगीत गात बसली आहे असं वाटूं लागतं!

वेशीच्या आंत कांही पडकी भिंताडं विनाशाच्या शेवटच्या अनुग्रहाची वाट पहात उभीं आहेत. ती देशमुखांची गढी! तिची उंची ढळली, आणि तिच्या छायेंतल्या घरांची छपरंहि उपडी झालीं.

हा गढीपुढून जाणारा रस्ता! देशमुखवाडीचं वैभव याच रस्त्यानं आलं, आणि येथूनच कायमचं नाहीसं केलं गेलं.

आतां या रस्त्यावरून एक बैलगाडी येऊं लागली. रस्त्यांत एक म्हैस आडवी उभी होती. हाड्कू, हाड्कू म्हणत गाडीवान तिला सरकण्याचा इशारा करीत होता.

म्हैस कांहीं मामुली काम नव्हतं. कोणत्याहि उभ्या शेतांत नेहमी चरत आल्यामुळं तें भुस्सट जनावर माजून मस्त झालं होतं. बदलत्या कालमानाचाहि तिजवर परिणाम झाला असला पाहिजे. रस्ता अडवून उभं राहणं हें त्या परिणामाचा एक भाग होता की काय न कळे! नुसत्या शाब्दिक ललकारीनं म्हैस सरकत नाहीं असं पाहून गाडीवान कोरडा घेऊन खाली उतरला. पुढून एक माणूस आला, अन् गाडीवानाला म्हणाला,

' भल्या माणसा म्हशीवर कोरडा ओढलेला धन्याला कळला तर गाडी बैल सोडून अन् मार खाऊन तुला परत जावं लागेल! ही गोहील वाडी आहे! देशमुखांचा जमाना विसर आता! वळव बाजूनं गाडी न जा आपला निघून!'

सांगणारा घाईनंच निघून गेला. गाडीवानानं गाडी बाजूला काढली न बैलाच्या शेपट्या पिरगाळल्या! उगा वेळ गेला तर एखादं प्राणसंकट येईल अशी दोघांनाहि धास्ती वाटली असावी. ती खरीच होती! त्या दोघांवर, तेथल्या उजाडभूमीवर, त्या उध्वस्त वास्तूवर जो प्रकाश फांकला होता त्यांत मुक्त जीवनाचा विश्राम नव्हता. नष्ट, खंडित, आंतल्याआंत भगणाऱ्या वर्तमानकाळाची ती असहायता होती; कांहीं नवीन घडवायला आवश्यक असलेला विचार आला होता हें त्याला दिसत होतं! शुभारंभाचे नांवडं फुटायला किती अवधि आहे हे भविष्य भेदून पाहण्याची त्याची पराकाष्ठा चालू होती!

# सरत्या पावसाळ्यांतील एक रात्र ●●

**डोळ्यांची** मिच् मिच् करून लिंबाजी पहाण्याचा प्रयत्न करतो. वातावरण झांकळल्यामुळें आधींच मंद झालेल्या त्याच्या दृष्टीला फारसं स्पष्ट दिसत नाहीं. प्रगट सृष्टि त्याची नजर टाळीत होती कीं काय कोण जाणे ! त्या सृष्टींत कित्येक सुखकारक गोष्टी गडप झाल्या आहेत. त्याच्या आवडत्या मादक पेयावरला शुभ्र फेंस, बायकोची हालचाल, मुलां-मुलींचे चेहरे आणि आणखी कितीतरी !

डोळे दगा देताहेत ही जाणीव झाली कीं तो कानांस येऊं लागतो. श्रवणशक्तीहि फारशी काम देत नाहीं. थोडंसं ऐकूं येतं नि थोडासा ऐकूं आल्याचा भास होतो. त्याला नकळत जगांतलीं सर्व माणसं कांहीं तरी विचित्र, विलक्षण हालचाली करीत असलीं पाहिजेत! त्या हालचाली त्याला कां दिसूं नयेत ? त्याला त्या कां ऐकतां येऊं नयेत ? सगळे आवाज त्याला पारखे कां व्हावेत ? तो जगातून उठला कीं काय ? माणूस केवळ अंथरुणाला खिळला म्हणजे टाकाऊ ठरतो ? त्याच्याशीं कुणीच कांहींहि कां बोलत नाहीं ? त्याचीं माणसंहि त्याला कंटाळलीं कीं काय ? त्याची बायको, त्याची मुलगी, त्याची सून, त्याचा मुलगा, त्याचा जांवई आपापलें व्यवसाय मर्जेने करीत असलें पाहिजेत ! मात्र त्याच्या जवळ फिरकायची एकाचीहि उत्सुकता नसते. त्याला खोकल्याची उबळ आली म्हणजे उगीच त्याच्या

जवळ कुणीतरी येतं न् राख भरलेली वेळणी त्याच्या तोंडापुढं धरत ! तो केव्हां मरतो याची वाट पहात असावी ती ! कांहीं ऐकूं न येणं, कुणाची हालचाल न दिसणं, कुणी जवळ न येणं अथवा कुणाच्या जवळ न जाणं-येणं, यापेक्षां मृत्यु निराळा असेल असं वाटत नाहीं. पण लिंबाजी मरायला तयार नाहीं. तो चिडून सर्वांना शिव्या देऊं पहातो. शिव्यांच्या ऐवजीं दणदार खोकल्याचा आवाज मात्र छातीची हाडं कडकडवीत बाहेर पडतो अन् अशा रीतीनं लिंबाजीची संध्याकाळ सुरू होते !

**घराकडे** परतणाऱ्या पारूच्या पावलांनंच संध्याकाळ या जगावर येत असावी ! तिच्या चेहऱ्यावरील खिन्नतेत प्रकाश मंदावत असावा. ती घराजवळ येते तसे अंधाराचे तंतू परस्परांत मिसळून गडद होत जातात आणि तिच्या मानसिक व्यथाहि तशाच दाट होऊं लागतात.

लिंबाजीची प्रकृति सुधारण्याची आशा तिला उरली नाहीं. त्याची सरकारी नौकरी तिला सुखावह झाली नव्हती. साहेबाच्या खिजमतींत तो दिवसा घर सोडत होता न् रात्रीं पिऊन न् मारामारीची भांडणं घेऊन घरीं येत होता. पहिल्या तारखेच्या संध्याकाळी देणेकऱ्यांचा त्याच्या घराला वेढा पडत असे. त्यांतून कशीबशी सुटका झाल्यावर पुन्हां तोच क्रम !

लिंबाजीची सरकारी नोकरी संपली न् सोनाजीला—त्याच्या मुलाला—त्याची जागा मिळाली तेव्हां पारूला वाटलं दुर्दैवाचे खेळ आतां संपले !

पण सोनाजीनं महिन्याची तनखा तिच्या हातीं द्यायचं सोडलं. तो पीत नसला तरी आडबरं धुंडाळीत असावा. पारूनं जवळपासचीं गांवं पाहिलीं न् सोनाजीचं लगीन करून दिलं. थोडंसं कर्ज काढावं लागलं होतं. पण त्याचं काय ? सोनाजी संसारांत रमला की सर्व काही सुरळीत होणार होतं. लग्न झालं न् झालं तोंच सोनाजी बायकोच्या तंत्रानं वागूं लागला. सर्व पगार तिच्या आवडीवर न् स्वतःच्या चैनीवर खर्च करूं लागला.

पारूच्या नशिबाची कष्टदशा पुन्हां सुरू झाली !

लग्नाला काढलेल्या कर्जाचं व्याज वाढूं लागलं. सावकार खेटे घालूं लागला. चारचौघांत अब्रूची नासाडी होणार असं दिसूं लागलं. पारूनं

आपली दहा वर्षांची बया, नामा बोऱ्हाळे नांवाच्या माणसाला विकली! नामा असेल तीस एक वर्षांचा! बया लौकरच मोठी होऊन संसार करूं लागणार होती न् नामाला आपल्या मुठींत ठेवणार होती! पारूनं नामाला शहरांत आणलं. आपल्याकडंच ठेवलं. सोनाजीच्या कचेरींत त्याला माळ्याची नौकरी लावून दिली. मुलाचा नाहीं तरी तिला जांवयाचा आधार वाटूं लागला. पण तो आधार हळुहळूं निराधार ठरूं लागला.

बया तिच्या घरामागच्या पटांगणात तिची वाट पहात बसली होती. पारूला पाहतांच 'मास्रओ ऽ' अशी तिनं हांक मारली. धांवत जाऊन तिला बिलगली न् तिला मिठी मारून बयेनं रडायला आरंभ केला. बया अद्याप शहाणी झाली नव्हती. तिला फारसं कळत नव्हतं. नामा तिसऱ्या प्रहरीं चहा प्यायला घरीं आला होता. चहा चांगला झाला नाहीं म्हणून रागानं त्यानं बशी बयेच्या अंगावर भिरकावली होती!

पारू घरात आली तेव्हां सून चुलीपुढं बसलेली तिनं पाहिली. सोनाजी मात्र घरांत नव्हता. ती घरीं यावयाच्या वेळीं नवराबायको बोलत बसलेलीं तिला दिसत. तिनं सोनाजीची चौकशी केली. सुनेकडून समाधानकारक उत्तर आलं नाहीं. भाकरीचं पीठ चुरीत असलेल्या तिच्या हाताकडं पारूचं लक्ष गेलं. रुप्याच्या पाटल्या चमकलेल्या तिला दिसल्या नाहींत. सोनाजीनं त्या काढून नेल्या असल्या पाहिजेत! सुनेची साथ नर नसेल त्याला? सोनाजीला बायकोचे दागिनेहि पुरत नव्हते तर? पारूनं सुनेच्या चेहऱ्याकडं बारकाईनं पाहिलं. नेहमींपक्षा त्यावर आज थकाट अधिक होती! सोनाजीनं तिला मारलं तर नव्हतं? ती गंभीर होती न् अशा अवस्थेंत सोनाजीनं केलेला रानवटपणा पारू मुळीच सहन करणार नव्हती.

पारूच्या व्यथांचा आतां कळस झाला होता!

सप्टेंबरला सुरवात झाली तरी, पावसाळा सपत आला की सुरू होऊं लागला, समजत नाहीं. कसं समजणार? 'लगातार' पाऊस नसतो किंवा मारखी उघाडहि नसते. सकाळीं आभाळ चक्क असतं. दुपारीं न् संध्याकाळीं पुंज मेघांचे खंड मध्याकाशांतून पश्चिमेकडं सरकत नाहींसे होतात. रात्रीं रुईदार मेघांचे लहान लहान क्वचित् वाटोळे तुकडे चादण्यांत तरळूं आणि तरंगूं लागले की वाटतं, संपला पावसाळा!

पण पावसाळा एवढ्यां लवकर कुठला संपायला ! मोठ्या पहाटेस कुठून ढग येत असतील ते असोत. आभाळ धुंदकारून येतं मधून मधून झिम्‌झिम् सुरूं होते अन् सारा दिवस गढूळ झाल्यासारखा दिसतो. काम करावंसं वाटत नाहीं. घरांत बसवत नाहीं अन् बाहेरहि पडावंसं वाटत नाहीं !

अशा वातावरणांत कसं वाटत असल हें नामा बोन्हाळयाला विचारावं !

पी. डब्ल्यू. खात्याच्या नर्सरींत नामा नौकर आहे. नवीन रोपटीं लावा यचीं न् लागलेल्यांची मशागत करायची हें त्याचं काम ! पावसाळ्याच्या सुरवातीलाच नर्सरींतलीं कित्येक रोपं पक्क्या सडकेच्या बाजूला गेलीं. राहि-लेल्यांपैकीं किती जळणार होती न् किती तगणार होतीं कोण जाणे ! देख-रेख करणारा ओव्हरसियर मधूनमधून येत होता न् झाडं मरूं देऊं नकोस म्हणून गुरकावून सांगत होता. हवा तरी अशी पडत होती कीं काम करा-यला उल्हास वाटत नव्हता !

आज सकाळपासून आभाळ निशारून आलं होतं. बुरबुर आली होती न् हवा गार करून थांबली होती. आभाळ उघडतहि नव्हतं न् दिवस माव-ळतहि नव्हता. समोरच्या कचेरीच्या इमारतीवरील लाल मळकट मंगलोरी कौलं कांहीशां ओलसर ओंगळ दिसत होतीं. उघड्यांत एका रोलरचं धड गच्च उभं होतं. सुटीमुळं न् अशा उदास वातावरणामुळं कुणी माणूस फिरकतांना दिसत नव्हतं. जणूं सारी सजीव सृष्टि उल्हासासाठीं कुठं तरी एकान्तांत तप करीत बसली असावीं ! नामा बोन्हाळे—पी. डब्ल्यू. खात्यांत-ल्या नर्सरींतला माळी मात्र भिजट मंगलोरी कौलं आणि रोलरचं अचल धूड पहात वेळ घालवीत होता !

वेळ घालवायचा नाहीं तर आणखी काय करायचं ? घरीं जाऊन दीड-वितीच्या बायकोला चहा कर म्हणायचं ! तें कोकरूं असं कीं 'नवरा' म्हणजे कोण व कसा प्राणी असतो याची जाणीव नाहीं ! कांहीं समजत नाहीं. रंग असेल पण अंग नाहीं ! हातापायाच्या चमत्कारिक काड्या न् 'बचकानी' बांधा ! अन् ती म्हणे नामाची बायको ! सहावारीं फरकूट

नेसणारी न् पायजिब्यांचा खुळखुळ कर्णकटु आवाज करीत इकडं तिकडं वेडसर आवेशात मिरविणारी पोरगी नामानं बायको म्हणून कडेवर घ्यावी कीं खांद्यावर घेऊन बाजारांत मिरवावी? घरीं जाऊन बसावं तर म्हातारीच्या-चा खोकला ! माणसांना पाहून त्याचा दमा वाढत होता कीं काय ? अनेक खाणाखुणा केल्यावर बयेनं कसा बसा चहा केला तो तरी चांगला झाला होता का ? हें असं नामानं किती दिवस पाहायला पाहिजे होतं ? बयेच्या अंगाला वाढ येणार होती तरी केव्हां !

ओव्हरसियर यावयाची वेळ टळून गेल्यावर नामा नर्सरीतून उठतो. चिखलानं भरलेले हातपाय धुवून कॉलरचं कुडतं चढवितो न् आपल्या ठराविक हॉटेलांत जाऊन पुढ्यांतला सिंगल पीत समोरच्या चित्राकडं पहात बसतो !

चित्रांतली आकृति विलासिनीची आहे. दुमडलेल्या मांड्यांचा बाक अन् इतर अवयवांचा रेखीव ठसठशीतपणा अतिशय भडक होता. कित्येक दिवसांपासून नाना हें चित्र पहात आला होता. तें कोणत्या प्रान्तातलं न कुठल्या मानवी सृष्टींतलं असेल तें असो! विलास आणि लोभसपणा हेंच त्या सृष्टीतलं वास्तव असावं. नजरेची धार कितीहि तीव्र केली तरी नामाला त्या सृष्टीत प्रवेश करतां येत नाहीं! ती विलासिनी कधी काळी महावारी फरकुट नेसून हातापायाच्या काड्यांत रुप्याचे दागिने खुळखुळवीतच लहानाची मोटी झाली असेल ही कल्पना खोटी! जगांतल्या सगळ्याच सौंदर्यवती पूर्णता आणि पक्वता अंगोपांगावर मिरवीतच अवतरल्या असल्या पाहिजे! बयेच्या अंगाला अशी वक्रता, अशा रेषा, असा भरीवपणा कधीच लाभणार नाहीं, अशी त्रस्त जाणिव होतांच नामा तेथून उठतो. बाहेर पडल्यावर दंतवैद्याच्या दुकानाकडं त्याची हटकून नजर जाते. दांताची कवळी एका गालफडांतून बाहेर आलेली दाखविणारं एका स्त्रीचं चित्र दुकानापुढं आहे. तें चित्र त्याला पहावत नाही. दुकानांत रोज एकादा तरी दांतरोगी असतो. दांत उपटलं जाणाराचं तोंड उजेडासाठीं नेहमीं रस्त्याकडं वळतं न् नामाला तें दिसतं. स्वतःचे दांत हालूं लागल्याचा त्याला संशय येतो. खिळखिळ्या झालेल्या दांताच्या कवळ्याच क्षणभर

त्याला दिसूं लागतात न् मग तो सिनेमाकडं वळतो. सिनेमाहून परतल्यानंतर नायिकेबद्दल सर्वांत अधिक विचार करणारा फक्त नामा असतो. घरच्या दाराला कडी नसल्यामुळें आंतून त्याला एक दगड लावलेला असतो. कुणी उठूं नये न् आंत तर प्रवेश मिळावा या धडपडींत कुणीतरी उठतं न् दार उघडलं जातं. दार उघडणारी पारू असते. जेवायचं झाकून ठेवलेलं असतं. अन्न पोटात गेल्यावर नामाच्या विचारांना आणखी वेग येतो. सहामात म्हणाचं घर! त्यांत कांहीं उतरंडी न् चुली! पलीकडं पांढऱ्या पासोडीतून लिंबाजीचा दमा उचल घेऊं लागतो. या बाजूला सोनाजी न् पलीकडं त्याची बायको! चुलीकडं पारू न् बया! एखादी बाहुली निजवावी तशी बया अस्ताव्यस्त पडली आहे. हवेंत गारठा आहे न् तो दाराच्या फटींतून आंत येतो आहे. लिंबाजीला डिवचीत आहे. सोनाजीला स्पर्शीत आहे न् नामाला खिजवीत आहे! चिमणीची ज्योत थरकते अन भिंतीच्या सावल्या वरखालीं होताहेत. मदनाची पावलं नामाच्या मनांत उमटलेलीं आहेत. पण भिंतीवरच्या छायांखेरीज कांहींच दिसत नाहीं. मग नामाच त्या सावल्यांत मिसळून हॉटेलांतल्या विलासिनीच्या चित्रांतल्या प्रांतांत प्रवेश करतो. मग त्याला दातांच्या कवळ्या दिसूं लागतात. मग त्याची हाडं खिळखिळीं झाल्याचा त्याला भास होतो. छे! रुप्याचे दागिने घातलेल्या टिचभर उंचीच्या बयेची ती हालचाल असावी! सहा वार फरकुट गुंडाळणारी ती किडकी आकृती उचलून फेकून देण्यासाठीं नामा सरसावून जातो तोंच कुणाची तरी हांक त्याच्या कानावर पडते. कोण बोलावतंय त्याला? हॉटेलांतल्या चित्रांतली ती विलासिनी कीं चित्रपटांतली नायिका?

सगळी माणसं जागीं झालेलीं असतात. एका कोपऱ्यांत पासोडीचा पडदा लावलला दिसतो. पडद्या पलीकडं कण्हणं ऐकूं येतं न् जरा वेळानं एका नव्याच जिवाचा रुदनस्वर कानीं येतो!

लिंबाजीनं आपला दमा मुद्दाम रोखून ठेवलेला आहे. माणसांची हालचाल अधिकच जवळून होत असल्याचं कळत असल्यामुळें आपण जिवंत आहोत याची त्या क्षणाला त्याला जाणीव होते! नवरा म्हणणाऱ्या एका तीस वर्षांच्या माणसानं आपल्या अंगावर बशी भिरकावली आहे हीं

कल्पना त्यावेळीं वया विसंगत. 'वैनीला बाळ झालं' हेच तिच्या मनांत खिळत पारूला आपल्या व्यथांची मुळींच जाणीव उरलेली नसते. आजवरचा जन्म तिनं कष्टांत काढला. कुणाला माहित, हा नवा जवि तिच्या कष्टांची परतफेड करील ! सोनाजीच्या चेहऱ्यावरला अपराधी भाव मावळला आहे. नव्या जिवाच्या आगमनानं नामाच्या मनांत उद्यां कदाचित् आणखी नव्या अपेक्षा निर्माण होतील. त्याला आणखी निराश व्हावं लागेल. पण या क्षणापुरता तरी तो निर्विकार, स्तब्ध, तपस्वी ऋषी सारखा शांत आणि संपन्न दिसतो आहे........

---

# हें हाडामासाचं शरीर • •

स्थानिक कंत्राटदारांत 'प्रेमसुखबाबूं'चं नाव मोठं होतं. अन् त्याची तशी लक्षणंहि बाधणाऱ्यांच्या सुपरिचित होती. स्थानिक कचेरींतल्या सर्वच माणसांची तो मिजास राखीत होता अन् आपली पैशाची कामं चुटकीसरशी काढून घेत होता. त्यांचा मुख्याधिकारी (Engineer) आपल्या खिशांतला आहे असं तो मानीत होता न् इंजिनियर देखील त्याला नेहमी मान देत होता. हे लक्षात घेण्यासारखं होतं!

काळमानानुसार कंत्राटदारांत काही मुसलमान भरती करण्याचे अज्ञात प्रयत्न झाले होते. त्यांना लहान मोठी कामं करायला आरंभहि केला होता. अधिकारी नेहमी मुसलमान असत. त्यामुळं 'जातीला जात ओळखते' असं म्हणायला भरपूर उदाहरणं घडत. पण ते तितकंच. अशा विशिष्ट जातीच्या कंत्राटदारांचा वकूब, कामकऱ्यांवर चालणारी त्यांची दडपशाही, थोडक्या खर्चांत मोठं घबाड मिळविण्याची त्यांची अप्रामाणिक इच्छा अधिकाऱ्यांच्या लक्षांत आल्याशिवाय रहात नसत. इंजिनियर मुसलमान असला तरी एकादं नदीचं न् विहिरीचं काम मुसलमान कंत्राटदार चांगलं न् वेळेवर करतील हें स्वप्नांतहि त्याला खरं वाटणं शक्य नव्हतं. मुजोरी न् मोगलाई अशा वेळी खरच उपयोगी पडत नसत. अशी कामं सुव्यवस्थित करायला एकच माणूस लायक होता—प्रेमसुखबाबू!

त्याच्याजवळ हुकमी कामकरी वर्ग तयार होता. आगाऊ रकमा देऊन नाहीतर रीतसर महिने बांधून तो त्यानं हाताशीं ठेवला होता.

प्रेमसुखबाबूच्या बांधकामाची कीर्ति वाढती ठेवण्याच्या कामी चंचल् नांवाच्या गवंड्याचा फार मोठा भाग होता. जिल्ह्यांतल्या बहुतेक मोठ-मोठ्या सरकारी इमारती अन लहान मोठ्या नद्यांवरील 'पऱ्हुडे' (Sebmersible) पूल अव्यंग आणि टिकाऊ झालें होतें ते चंचल्नं हाताळल्यामुळं. बाबूजी चंचल्ला सोडायला तयार नव्हते न् चंचल्लाहि दुसरीकडची ताबेदारी जमणं शक्य नव्हतं.

एकादं बांधकाम चालू असल तर तेथल्या तीनचार गवंड्यात सर्वांपेक्षा अधिक तडफेनं, चतुराईनं, त्वेनं थरावर थर चढवीत नेत असलेला गवंडी तो चंचल्च! कॉलेजांतून बाहेर पडलेल्या सुटाबुटांतील 'साब' लोकांना निळया कागदावरील पांढऱ्या रेघोट्यांतल्या कांहीं किचकट भानगडी समजतां समजत नसत. एकाद्या इमारतीची आंखणी देतांना तर ते घामाघुम आणि बेजार होऊन जात. शंभर फुटांच्या अमक्या बांधकामाला किती मसाला लागतो हें काढण्यासाठीं अर्धा तास त्यांची आकडेमोड चाले. नाहीतर छापील बुकाकडं धांव घ्यावी लागे. हें सारें टोकताळ चंचल्ला पाठ होतें. Flemish Bond, English Bond हे शब्द तो शिकला नव्हता, पण बांधणी पहावी तर त्या नियमाला धरून! ओव्हरसीयरनं तोंडी सूचना देऊन घरीं झोप घेत पडावं, कामांत 'मिष्टिक' म्हणून व्हायची नाहीं. त्यांत लुबाडणी किंवा चोरीछपी आढळायची नाहीं. काम एकदां तयार झालं की झालं. पडझड न् पुन्हां बांधणी असें प्रकार व्हायचें नाहींत. चांगला मसाला, सुरेख बांधणी आणि सुडौल घाट पाहून तज्ञानं खुष व्हावं न बाबूच्या मागण्या (Claims) कांहीं पुरवून टाकाव्या. चंचल्च्या निपुणतेमुळें हें शक्य होत होतं!

सुटी झालीं कीं खटावच्या पांढऱ्या तलम मातवारी धोतराचा नेसा सोडलेला, मलमलचं बुवट शर्ट घातलेला न् काश्मिरी कापडासारखी घडीची टोपी डोक्यावर थोडीशी तिरकी ठेवलेला, 'रोपन महिन्यां'च्या रोखानं मजेंत निघालेला न् रंगेल दिसणारा माणूस 'चंचल्' ह्याच नांवानं ओळखला जात होता!

'रोपन महिला' गांवापासून वेगळा होता. अन् तेथलं सारंच निराळं होतं. मोहल्यांत सरकारी दिवे लागत नव्हते. अंधार 'रोपन' या नांवाचा पूर्ण सूड घेत होता. पानमस्तांचं आक्रंदन आणि कामकृत्याचा भागडधिंगडा या मोहल्याच्या परंपरेंतल्या ठळक गोष्टी होत्या! चंचल्ला संसार नव्हता. पण त्याच्या वयाच्या संसारकरूला हि असणार नाही एवढी आगावत त्याच्या ठिकाणीं प्रगट होऊं लागली होती!

बाबूच्या कामाला हव्या तेवढ्या मजुरणी रोपन महिल्यांतून मिळत त्या चंचलूमुळं. त्याचं तिथं नेहमीं जाणं येणं होतं. तेथल्या मजुरणींशीं त्याची चांगली जान पछान होती. बाबूला कामाची 'ऑर्डर' मिळाली कीं आदल्या रात्रीं गुणीकडून घरोघर संदेश पोंचला जाई, "उद्यां काम सुरूं आहे! चंचलनं कामावर यायला सांगितलंय्!" बाबूकडून पैसे वेळेवर मिळत न् मजुरीबद्दल एकादीची कांहीं कुरकुर अथवा तक्रार असली तर चंचल् ती चटकन मनासारखी मिटवून टाकी. वेळीं अवेळीं चंचल् त्यांना शक्य तेवढी मदतहि करीत असे. गुणी ही चंचलूची सर्व मजुरणींत लाडकी अन् आवडती. चंचलूचा मुक्काम रात्रीं तिच्याच घरीं असे. ती कामावर असल्याखेरीज त्याचे हात वळत नसत. ती तशीं असली कीं चंचलूच्या हाताला बेफाम उरक येई. दुसरे रोजदार पहिल्याच थराच्या जुळवाजुळवींत रहात. तोंवर चंचलूचा एकादा थर अर्ध्यावर निघून जाई. आपली परिचयाची साथ असली म्हणजे गवयाला हुरूप येऊन बैठक रंगविण्याची खात्री वाटते तसं त्याचं होत असे. गुणीलाहि दुसऱ्या गवंड्यांकडं चुन्याचीं टोपलीं वाहतांना अथवा तत्सम इतर वस्तू पुरवतांना चुकल्याचुकल्यासारखं वाटे. लोकप्रवादानं तिच्या न् त्याच्या संबंधाबद्दल कधीं चांगले उद्गार काढल्याचं ऐकिवांत नव्हतं.

गुणी संसारकरू होती. तिचं न् तिच्या नवऱ्याचं सूत जुळावं म्हणून चंचलूची नेहमीं खटपट असे. पण दोघंहि अर्वाच्य भानगडी करीत अन् परस्परांवर तुटून पडत. गुणीनं अठवड्याचे पैसे घरीं आणले कीं तिच्या नवऱ्यानं ते हिसकावून घ्यावे अन गुत्त्यावर धांव घ्यावी. निशेचा कळस झाला कीं गुणीची धडगत नसे. एकदां तिला तिच्या नवऱ्यानं निशा करून

गाठल. "चंचलूला रात्रभर घरांत ठेऊन घेतेस न् मला दाराबाहेर टाकतेस असा आरोप करून झोडपायला आरंभ केला. तितक्यांत चंचलू आला न् "ए रानवट्या!" असं म्हणून आपल्या हातांतली हातोडी त्यानं उगारली. चंचलूला पहातांच तो नरमला न् निघून गेला. चंचलूचा धाकच असा होता कीं त्याच्या समोर कांहीं अनर्गळ भाषा वापरायची अथवा प्रकार करायची तिची अथवा त्याची छाती होत नव्हती. त्या रात्रीं आपलं हुस-हुसणारं अंग गुणीनं चंचलूच्या उबाऱ्यांत निरावलं. एखाद्या अजाण घास्तावलेल्या मुलाला कुरवाळावं तसं त्यानं तिला कुरवाळलं. त्याच्या स्पर्शाची कित्येक दिवसांपासून तिच्या मनांत सुप्त इच्छा होती तीं त्या वेळीं अनावर होऊन तिच्या श्वसनांतून धडकूं लागली.

"गुणे, काय होतंय तुला !" असं त्यानं निर्विकारपणानं विचारलं न् तिला तिच्या मर्जीप्रमाणं झोपूं दिलं.

मग गुणीला प्यायचा नाद लागला. ती मनसोक्त पिऊन आली न् अंगणांतल्या खाटेवर झोपलेल्या चंचलूला मिठ्या मारून गौरूं लागली, "माझ्या संसारानं वाटोळं केलंस अन् आतां मला जवळ करायला तूं तयार नाहींस !"

चंचलूनं तिच्या मुस्कटात भडकावल्या न् मग पश्चात्तापानं रात्रभर तो नुसता जळत राहिला. सकाळ झाल्यावर ती चंचलूला तोंड दाखवायला तयार होईना पुन्हा पिणार नाहीं अशी तिनं शपथ घेतली. त्या शपथेला कांहीं अर्थ नव्हता. चंचलू तिच्या घरीं येऊन झोपला कीं तो निद्रामग्न आहे असं पाहून लपवून ठेवलला लोटका ती घट घट पीत असें. एखाद्या तहानलेल्या म्हशीच्या पाणी पितांना होणाऱ्या आवाजा सारखा तो आवाज असें.

नव काम नव्हतं. गुणीला दिवसभर गुंतवून ठेवणारा निश्चित व्यवसाय नव्हता. संध्याकाळ झालीं कीं गुत्त्यांतल्या बुदल्यांतला सुगंध (?) तिच्या घ्राणेंद्रियाला डिंवचून बेचैन करीत होता. अंगाला आळोखे पिळोखे येत होते. हातापायांचं अवसानच नाहींसं झालं होतं. अंग दुखत असल्या-

सारखं रात्रभर जांभया देत ती तळमळत पडत होती. चंचल्ला पैसे मागायची कांहीं सोय नव्हती. कारण तो प्यायला पैसे देईल हें शक्यच नव्हतं. संधि पाहून चंचल्च्या खिशांतले पैसे तिनं उडविले. ती यशस्वी झाली. चंचल्ला दिसूं नये असं बुद्धीत असतां तिनं ठरविलं होतं. पण निशा चढल्यावर मात्र नकळत ती घराकडे वळली. तिचा दादला कुठं परगांवी गेला होता, तोहि परत त्याच दिवशीं गांवी आला होता. गुणीचा न् गुणीच्या घराचा त्यानं केलेला त्याग गांवी आल्यावर टिकणं शक्य नव्हतं. बरं, गृहस्थ प्रवेश करायचा तो काय निष्पान अवस्थेत ? त्याच्या खिशांत होते तेवढे पैसे कलालानं आपल्या जुन्या पडून राहिलेल्या उधारींत जमा केले. तो क्षणभर निराश झाला. पण लगेच ! 'पिणाराला कुणीतरी पाजणारा भेटतोच' या वाक्यातल्या अभिप्रायाचा साक्षात्कार त्याला अनुभवतां आला. भरपूर नसलं तरी थोडंबहुत प्यायला मिळालं. मेंदू थोडासा गिरक्या घेऊं लागतांच त्यानं कलालाला शिव्या दिल्या. नग सबंध जगाचा उद्धार करीत स्वारी घराकडे परतली. अन् ऐन दारात त्याला गुणी दिसली. तिनं चांगली निशा केली होती. स्वतःला मनसोक्त प्यायला मिळावं म्हणूनच ना तिनं त्याचा त्याग केला होता ? शिव्यांचा प्रवाह अपुरा ठरल्यावर निशेच्या मस्तीतल्या खऱ्याखुऱ्या कार्याला आरंभ झाला. तो दुःशासनाचं कार्य करूं लागला. आधीच गलित झालेलं तिचं वस्त्र त्यानं जोरानं उकललं न् छपरावर भिरकावलं. एकाद्या राक्षसासारखा तो हंसला. ती घरांत पळाली. तोहि तिच्या पाठोपाठ गेला. सरपणांतलं एक काटुक ओढून त्यानं तिच्या उघड्या पाठीवर प्रहार करायला आरंभ केला. ही आरडाओरड ऐकून कुणी सोडवायला येईल हें शक्य नव्हतं. कारण तेवढा सावधानपणा रोपन मद्दिन्यांतल्या एकाहि घरांत नव्हता. बाबूच्या बंगल्यावरून उशीरा परत आलेल्या चंचल्ला हा प्रकार दिसताच त्याच्या रागाला मर्यादा राहिल्या नाहींत. या माणसाचा प्राण घ्यावा असं त्याला वाटलं. गुणी गर्भवती होती. त्या पशूला तिच्या अवस्थेची कांहीं कल्पना नव्हती. चंचल्ला पहातांच तो सटपटला. त्यानं दार जवळ केलं. पण दारांतून सरबत्ती केली. "माझ्या गैर हजेरीत गुणीला तूं भ्रष्ट केलंस ! उद्यां पंचांसमोर या कृत्याचा जाब तुला द्यावा लागेल !"

"गुणी रवेली आहे माझी ! काय करायचं कर तुला ! चल निघ इथून !"

मग गुणीला त्यानं अंथरुणावर नेऊन निजवलं. तिच्याहि तोंडाला असह्य दर्प येत होता. ती पूर्ण बेशुद्ध होती. पाटीवर एक दोन चांगले वळ उठले होते. गुणी धडधाकट अन् स्त्रीस्वभावाला न शोभणाऱ्या दंग्या धोंक्याच्या भानगडी करणारी होती. तिच्यांत कांहीं करण्याची धमक होती तशी सोमण्याचीहि ! ती शुद्धींत असती तर नवऱ्याला तिनं चांगलं खुद-ळून काढलं असतं हें नक्की. तिच्या पानमत्त अवस्थेची त्याला किळस आल्याशिवाय राहिली नाहीं. पण ती गर्भवती होती न् तिला मार खावा लागला होता म्हणून दयेनं चंचलूचं अन्तःकरण ओथबून निघालं.

त्यानं तिच्या अंगावरून मायेचा हात फिरवायला आरंभ केला. शरी-राच्या कणाकणांतून निसर्गानं अपूर्व बदल केल्याच्या खुणा कळून येत होत्या. अवयव पुष्ट होतेच पण पूर्णतेच्या स्पर्शानं भरून टणक, फुगीर आणि निबर झाले होते.

पूर्णता ही भोगेच्छेच्या पलीकडची दशा ! त्या अवस्थेला कसली तहान भूक नसते. ती दशाच स्वयंपूर्ण आणि कमालीची अनासक्त अस-ल्यामुळं विषयेच्छांनीं ती आकर्षिली जात नाहीं तशी आकर्षणाला कारणहि ठरत नाहीं.

स्त्रीदेहाच्या त्या किमयेनं चंचलू क्षणभर मंत्रमुग्ध झाला. घाण माती, बेडौल दगड, वाकडी तिकडी भुई, या सर्वांना सुव्यवस्थित आणि रचनाक्षम करणारी घडण, चाळण, आणि जोडणी इत्यादि क्रियांनीं एक चांगली वस्तू तयार करणारी ती कला. ती असुंदरांतून सौंदर्य निर्माण करतें. ओबड धोबड आकाराला सुरेखा देते. मातींतलं नेमकं मोहन तेवढं निवडतें ! गुणीच्या संबधी, तिचे वामाचार हें क्षुद्र ! जीवनसंभवाला अवकाश देणारी आणि पोषक ठरणारी तिच्या देहाचीं क्रिया हीच पवित्र अमर आणि लोभस गोष्ट आहे असं त्याला वाटलं. त्याच्या अंतःशक्तीचा सर्व प्रकाश त्या खंडित, मलीन देहावर पडून एकाद्या कांचमण्यांची निष्क-लंकता आणि रंगदारी त्याला दिसली कीं काय कोण जाणे ! आपली दृष्ट

लागेल या कल्पनेनं जवळचा एक धुडका त्यानं ओढला, तिच्या अंगावर घातला अन् तो तिची शुश्रूषा करीत जागत बसला !

दुसऱ्या दिवशीं अनीतिमान माणसांना शासन करण्यासाठीं रापन मंडिल्यांतल्या कांहीं पट्टीच्या पिणाऱ्या माणसांचं पंच एकत्र आलं. गुणीच्या नवऱ्यानं तक्रार गुदरली. 'गुणी कामगामी झाली, न् चंचलनं तिचं शील मळविलं !' कांहीं शेजाऱ्यांनी साक्षी दिल्या. गुणी प्रथम कबूल होईना. नवऱ्याला ती टाकून बोलूं लागली. बंदुकीनं फुंकून टाकण्याची नवऱ्यानं धमकी दिल्यावर मात्र पंचांच्या मनासारख्या चंचलनं कबूलीजबाब दिला. झालं ! अनैतिकांना शिक्षा व्हायलाच हवी होती ! पंचानं दया-शील होऊन पंचवीस रुपये गुणीला न् पंचवीस रुपये चंचलला दंड ठोकला. दंड भरायची तयारी नसली तर बहिष्कृत व्हावं लागणार होतं ! दंडांचे एकूण पन्नास रुपये जमले ! पंचांनी न् गुणीच्या नवऱ्यानं बेसुमार खाल्लं अन् मग पिण्याची चढाओढ लागली. मध्यरात्रींच्या काळजाचा भेद करीत त्यांचं ओरडणं चालूं होतं. त्यावेळीं गुणी चंचलच्या मांडीवर डोकं ठेऊन म्हणाली होती,

' पंचासमोर खोटं सांगून मला लाजवायला लावलंस का ? '

' तुझं न् तुझ्या पोटांतल्या जिवाचं कायमचं रक्षण व्हावं म्हणून ! '

' खरंच मी आवडते तुला ? '

' कां नाहीं ! '

शाब्दिक सत्याबद्दल ती साशंक असावी. नजरेनंच तिनं त्याच्या अंतःकरणाचा ठाव घेतला. न् त्याचा हात आपल्या हृदयावर टेऊन तिनं डोळे मिटून घेतले. पोटांतला जीव शरीरसंबंध घडला नसला तरी हुबेहूब चंचलसारखाच, निदान चंचलला सदैव प्रियतम होईल असाच व्हावा असं तिला वाटलं !

चंचलच्या सहवासाचं सुख गुणीला उपभोगतां आलं नाहीं. ती बाळंत झाली न् आटोपली. चंचलच्या दुःखाला सीमा नव्हती ! जणूं त्याची

लग्नाची बायको किंवा शरीरसंबंधानं प्रियकर झालेली रक्षा कायमची सोडून गेली होती !

प्रेमसुखबाबूंच्या एका धार्मिक वृत्तीच्या मित्रानं लक्ष्मीनारायणाचं मंदिर बांधायचं ठरविलं. कधीं आला नव्हता एवढा हुरुप तें काम करीत असतांना चंचलला आला. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति सुबक आणि सुरेख दिसतील अशाच आणल्या होत्या. चंचलहि आपली कला प्रगट करण्याच्या हव्यासानं नटून फुलून गेला होता. तो भिंतींत देवतांच्या ज्या मूर्ति कोरत आणि भरीत होता त्या चंदीच्या – गुणीच्या मुलीच्या – रेखाच ठरतील अशा घडायचा प्रयत्न करीत होता. चंदी काय पण भरून वाढली होती! कामावर असतांना चंदीच्या उरावरला पदर क्षणभरहि टरत नव्हता. यौवनाचं अनावर वारं तिच्या गात्रागात्रांतून भरून राहिल्यामुळं बोलण्यांत, चालण्यांत, वागण्यांत अवखळपणा खळखळून येत होता. ती अगदीं हुबेहूब गुणीसारखीं दिसत होती ! ' खरंच मी आवडते तुला ? ' असं कुणीतरी आर्जवून म्हणत असल्याचा भास होतांच चंचलनं उचललेली हातांतली वीट तशींच रहात होती. सामान्य स्त्रीला न उचलणारं ओझं घेऊन हंसत डौलानं जात येत असलेली, चालतांना उरोज आणि उघड्या पोटावरचं निऱ्यांचं कमळ दोलायमान झाल्यामुळं अधिकच आकर्षक वाटत असलेली चंदी कोणती अन् गुणी कोणती हें चंचलच्या मूढ होत चाललेल्या नजरेस लवकर ठरवितां येत नव्हतं. मूर्ति कोरतांना असंच होऊं लागलं. मूर्ति बांकदार, सुहास्यवदना आणि प्रफुल्ल अवयवाच्या होऊं लागल्या. त्या केवळ चंदीच्या रुपाच्या कल्पना उचलल्या म्हणून. किंवा चंचलनं मूर्तीच्या ठिकाणी त्या मुरविल्या म्हणून ! उरोजाचीं वर्तुलं किंवा मेखलेनं, वस्त्राच्या कमलानं मंडित झालेला नाभीजवळचा घाट घडविण्याची वेळ येतांच चंचलच्या डोळयापुढं अंधारी येऊं लागली. मग शिकवून तयार केलेल्या हाताखालच्या साळक्या नावाच्या गवंड्याला तो हांक मारूं लागला न् स्वतःला न जमणारे भाग त्याच्या हातानं घडवून घेऊं लागला. तें काम साळक्यानं झटपट करावं यांत नवल नव्हतं ! तो आकार, त्या रेषा, त्याच्या प्रेयसीच्या-चंदीच्या होत्या. त्यांतल्या खुबीच्या बारकाया, वक्रता, त्यानं डोळ्यांनीं टिपून घेतल्या होत्या.

चंदी साळक्याकडं पाहून फिदफिदा हसत होती. त्याच्या जवळ जवळ करीत होती ! त्याचें इशारे तिला पाठ झाले होते. तिच्या नाचऱ्या डोळयांचे संकेत त्याला परिचयाचें झालें होते. रात्रीं अपरात्रीं ते कुठं तरी एकांतांत भेटत असलेच पाहिजेत ! या कल्पनेनं तर चंचलूच्या अंगाचा नुसता दाह होत होता ! अरे साळक्या !...मनोमन येणारे असें विचार शब्दमय होणार असं वाटतांच चंचलू कामावरून परतूं लागे.

चंदी त्याच्या डोळयांत सलूं लागली, रुतूं लागली. हें सगळं गुणीचं छद्म होतं, चंचलुच्या शारीरिक सहवासाच्या इच्छा गुणीनं पूर्वी त्याच्या जवळ बोलून दाखविल्या होत्या, त्या त्यावेळीं त्याला पुरवितां आल्या नव्हत्या. आपली वासना चंचलूकडून पुरवून घ्यावयाला ती आतां आली होती ! त्याच्या जवळपास फिरकत होती. लाडानं गिरक्या घेत होती. नाहीतर एकाद्या मुलीनं बापाच्या अंगाभोंवती झटे घ्यावें तसें घेत होती ! अशा संबंधांत स्पर्शाचे संकेत कुठले ? वस्त्राची तत्परता कशाला ? सगळा निलाजरा, खोडकर आणि पोरसवदा कारभार ! काय तें हसणं ! काय तें आपलेपणानं त्याला खेटून बसणं ! मनाला धडधडवून टाकणारा मध्यरात्रीचा एवढा गहन एकांत ! पण ती धिटुकली चंदी निधास्तपणानं झोपलेली ! जणूं अस्ताव्यस्त झालेल्या वसनांतून दिसणारीं शरीरसंपत्ति कुणी लुटणार नाहीं, याचा एवढा विश्वास तिच्या ठिकाणीं कसा ?

साध्या पावसानंहि भरून दुथडी वाहूं लागलेल्या गावांतल्या नाल्याप्रमाणं विचारांचे पूर चंचलूला झेपेनासे झालें तेव्हां त्यानं साळक्याचं न चंदीचं लगीन लाऊन दिलं. साळक्याचा चेहरा आनंदानं तर नुसता फुलून गेल्यासारखा दिसला. कां दिसणार नाहीं ? चंदीच्या ज्वानीचा भर आतां त्याच्या पूर्ण मालकीचा झाला होता. तिचं नवथर शरीर त्याला जवळून पहातां येत होतं. नाभीजवळच्या वसनाच्या कमळांच्या हालचाली त्याला आतां बिनधोक डोळयांनीं टिपतां येणार होत्या. नवराबायकोनीं आशीर्वादासाठीं चंचलूपुढं मस्तकं वाकविलीं. जन्मोजन्म नष्टचर्यानं ते हैराण होऊन जातील अशीं शापवाणी उच्चारावीं असं त्याच्या मनांत आलं मग तो कांहीं तरी पुटपुटला. नजरेपुढून दूर व्हा असं त्यांना सांगावसं

वाटलं. मग तोच स्वतः तोंड वळवून कुठं तरी पहात बसला. न् मग दिव-सेंदिवस चंचलच्या मनांतली आग सारखी भडकूं लागली!

फलशोभनाच्या दिवशीं तर पुरानं दुथडी भरून वाहणाऱ्या एकाद्या ओढ्यासारखा चंदीचा थाट होता. दुसऱ्या दिवशीं सकाळीं साळक्याच्या शय्येवरून उठून आलेल्या चंदीचा चेहरा त्याला दिसला. कुठला अमंगल हात तिच्या शरीरावरून फिरला होता? त्यानं घडविलेल्या मूर्तीवर कुणी थुंकलं होतं कीं कुठला एकादा खपरा काढून ती संबंध घडण असुंदर करण्याचा कुणीं प्रयत्न केला होता? छे. तसा कांहीं प्रकार नव्हता. अन् तसा कांहीं प्रकार झाला असला तरी चंदी विद्रुप, विमनस्क दिसण्याऐवजीं कमालीची सुंदर आणि समाधानानं शांत सोज्वल दिसत होती! अगदी तशी—पंचांनी निकाल सुनावल्यावर चंचलनं स्वीकार केल्याच्या खुर्पीत कांहींशी ग्लानीं आल्यासारख्या दिसलेल्या गुणीसारखी! दोन मुस्कटांत भडकवून चंदीचं समाधान नाहींसं करावं असं त्याला वाटलं. गुणीच्या नखऱ्यावर हातोडा उगारला तसा याच्यावर उगारावा, नव्हे प्रहार करावा अन् आपल्या दग्ध मनाचं सांत्वन करून घ्यावं असाहि विचार त्याच्या मनांत आला. त्यांच्या जवळ रहायचं त्याला जमेना. प्रेमसुखबाबूला एक नवं काम मिळालं न् चंचलची सुटका झाली!

× × × × ×

'आमना' नदीवर सोळा कमानींचा पूल बांधायचा होता. अडीच-तीन लाखाचं काम होतं. नदीच्या इकडं न् तिकडं चार चार मैल वसती नव्हती. रानांत कॅम्प्स् तयार केले होते. कामाऱ्यांचा भला मोठा मेळा नदीच्या कांठावर वस्तीला आला होता. आखणी झाली न् कामाला सुरवात झाली साळक्या न् चंदी तिकडं दूर गांवांत होते. बाबूची दुसरीं लहान सहान कामं गांवांत पूर्ण व्हायचीं राहिलीं होतीं म्हणून ती जोडी मागेंच राहिली होती. चंचल कामांत पूर्ण गढून गेला होता. पायाच्या खडकाला सुरुंग लागत होते. पात्रांतलं पाणी एंजिनच्या सहाय्यानं निराळं केलं जात होतं. दुर्बिणी, मोजणी, पहाणी, खोदणं, खोदलेलं भरून काढणं अशा विविध कामांत गुंतलेल्या माणसांचा प्रचंड गोंगाट होत होता. चंचलला स्वतःचा आवाज ऐकूं येणार नाही इतका

त्या आवाजानं, तेथल्या कामानं त्याला व्यापून टाकलं होतं! उन्मत्त चंदीचं उन्मादी हास्य ऐकूं येत नव्हतं ! शरीर- संपत्तीचं ओझं घेऊन धप्‌धप् चालणाऱ्या पावलांचा आवाज कानीं पडत नव्हता! साडीची सळसळ ऐकूं येत नव्हती किंवा अंगाची चुळबुळ होत असल्याचंहि दिसत नव्हतं ! हिवाळ्याचा शेवटचा महिना अशा रीतीनं संपून गेला होता !

कमानीचे खांब वर चढूं लागले न् मग चंचलूच्या मनाचा गोंधळ उडायला सुरवात झाली. साळक्या न् चंदी पुलाच्या कामावर आलीं होतीं. चंचलूच्या ताटव्याच्या झोपडींत त्यांनीं संसार मांडला होता. दुपारची सुटी झाली. साळक्या न् चंदी थोडंसं दूर एकांत पाहून स्नानाला गेलीं. चंचलूला कसं राहवणार ? तोहि लपत छपत त्यांच्या मागं चालूं लागला न् दरडीवरल्या एका झुडपाआड दडला. नितळ पाण्यांत चंदीचं शरीर रुपेरी माशाच्या हालचालीसारखं तळपत होतं. साळक्याच्या स्पर्शानं न् चुंबनानं तिच्या एकेका अवयवांत माज आणून सोडला होता. अनुकूल ऋतुमानाच्या आगमनानं धरतीच्या सृजनशीलतेला फोफाव यावा तसा ! चंचलूच्या अपरोक्ष हा बदल झाला होता ! चंचलूची त्यांनीं दखलहि घेतलीं नव्हती ! गुणींचे तरी असेंच रंग ढंग चालत नव्हते काय ? तें फुगीर, पक्व शरीर गुणींचं कीं चंदीचं ? चंचलूनं डोक्याची शक्ति एकवटली. मग चंदी कांठावर आली. न् ओलं वस्त्र बदलूं लागली. डौलदार घाट आलेल्या कमरेवर तिनं गांठ मारली. निऱ्यांचं कमळ गुंफलं. कांचोळी घातली न् पूर्णतेच्या छटांचा शिडकाव करावा तसा पदर लपेटून घेतला. साडीचा रंग काळा होता. किनार लाल भडक रंगाची होती. त्या किनारीनं पाय लपेटून टाकले. ती कमरेवरून वर सरकून अखेर दुसऱ्या स्कंधावरून पुन्हां खालीं उतरली ! डोळ्यांना भुलवून टाकणारी चंदीजवळ काय ही विलक्षण साधनं होतीं ! तिनं गांठ मारली होती न् कमळ गुंफलं होतं ! कांचोळी घातली होती न् पदर लपेटून घेतला होता ! मौल्यवान रत्नांच्या भांडाराचे दरवाजे ग्रंथींचे अडसर घालून बंद करून टाकले होते !

चंचलूच्या दृष्टीला जणुं बंदी करून टाकली होती ! त्या घाटदार कमरेच्या गांठीवरून, त्या सैल कमळावरून साळक्या घसरून पडला,

आदळला, दाराशीं धडका घेतां घेतां त्याचं टाळकं फुटलं असं चंचल्लूला क्षणभर वाटलं. तो भास होता. कारण तोहि कांठावर येऊन तिच्याकडं पहात होता न् म्हणत होता,

" अग चल कीं लवकर ! "

एखाद्या पाळीव कुत्र्यासारखी चंदी अंग मोडं करीत त्याच्या जोडीनं चालूं लागली होती !

ते दूर गेले. मग चंचल्लू उठला न् ज्या जागेत चंदीनं डुबक्या मारल्या होत्या नेमक्या त्याच ठिकाणीं त्यानं पाण्यांत अंग टाकलं. त्यानं आता-पर्यंत पाहिलेल्या हालचालींची एखादी चमक, झळक तिथं गवसते कीं काय हें त्यानं पाहिलं. चिखलाशिवाय न् शेवाळलेल्या दगडाशिवाय तिथं कांहीच नव्हतं ! फसवणूक झाली म्हणून तो आत्यंतिक विव्हळ झाला !

त्याला काम सुधरेना. घडीव दगडाची जोड धड जमेना. ओलसर चुन्यात कोण बसवितांना न् ठीकठाक करतांना ती गांठ दिसूं लागली. तें कमळ दिसूं लागलं. अन् अशा रीतीनं तो सावधानता गमावून बसला. पहाणी करायला आलेला अधिकारी कमानीजवळ उभा आहे याचं त्याला भानहि नव्हतं. अधिकाऱ्यानं त्याचं तें थत्तर बित्तर काम झालेलं पाहिलं. तो संतापला. न् ' गंवडी की न्हावी ? ' असे अपशब्द बोलला. दीड दोन फुटाचं काम उखळायला लावलं. प्रेमसुखबाबू आले. 'तूं शुध्दींत नाहींस' ते रागानं म्हणाले. तो वेडा झाला अशा कल्पनेनं इतर कामकरी त्याच्याकडं पाहूं लागले. दोन्ही हातांत डोकं धरुन कुणाला कांहींच न बोलतां तो झोपडी कडे परतला. नदीचा चढ चढून चंदी येत असलेली दिसली. कशाला ? इतके दिवस चंचल्लूची फसवणूक करून वर पुन्हां आपलेपणानं चौकशी करायला ? काय पण घाईनं न् अंग हिसळीत ती येत होती ! चंचल्लूला तिनं वेडं करून टाकलं होतं ! त्याची अपकीर्ति झाली होती ! अजूनहि त्या मायाविनीची सूडाची भूक शमली नव्हती ? तेंच काळं झिळझिळ झुळझुळ करणारं वसन तिच्या अंगावर होतं. त्याचीं किनारहि तशींच होतीं ! त्यांत कांहीं बदल होणार नव्हता ? तिनं चंचल्लूला मोह घातला होता. आणखी

कित्येक पिढ्यांना मोहून वेडं करण्याचं कार्य ती करणार होती ! हें हाडा-मासाचं शरीर काय एकेक घातकी खेळ करीत होतं ?

अपमानानं अर्धांच वेडा झालेला चंचल बेफाम संतापला न् चंदीजवळ आली कीं तिचा कपाळमोक्ष करायच्या तयारीनं हातोडी सांवरून बसला !

त्यानं जें शरीर हातांनी स्पर्शून पाहिलं होतं, अंगाभोंवतीं लपेटून घेतलं होतं तें बिघडून तो कायमचं नाहीसं करून टाकणार होता ! त्या शरीराची परंपरा नष्ट करून टाकणार होता ! ती क्रिया घडायला आतां फारसा अवधि नव्हता. चंदी मरणार होती. न् चंचलला तरी जिवंतपणाच्या कोणत्या वेदना मग बेजार करणार होत्या ?

# १९४८ ● ●

उष्णता शोषली जात होती की, वायुतत्त्वाला वंधिरता आणण्याचे अचाट अद्भुत प्रयोग यशस्वी होऊं लागले होते? बिनपावसाचे उदास रोगट ढग तासन्तास आकाशाला घेरून बसण्याचं कारण सांपडत नव्हतं. प्रकाश क्षीण वाटत होता. हवा कुंद झाली होती. घड उकडत नव्हतं. अंग शहारून टाकील, अशी हुडहुडीहि भरत नव्हती! एखाद्या असाध्य रोगांत हेमंत जणु जर्जर क्षीणबल झाला होता!

हे गाढ, उदास आणि निराश जड वातावरण 'हरताळा' संस्थानच्या राजधानीवर, विशेषतः राजमहालांत, आत्यंतिक तीव्रतेनं जाणवत होतं!

हरताळयाचे हिज हायनेस पाठीमागं हात जोडून इकडं तिकडं फिरतात. बागेंत जातात. दिवाणखान्यांत परत येतात. दिवाणखान्यांतल्या बहुतेक वस्तु न्याहाळून पहातात. उच्चासनावर थोडंसं टेकतात. सुवर्णाचा स्टँड असलेल्या समोरच्या कॅलेंडरकडं पहातात. थोडंसं बेचैन होऊन उठतात. 'बे' पद्धतीच्या खिडकीतून दूरवर दृष्टि न्यावयाचा प्रयत्न करतात, अन् पुन्हां हिंडूं लागतात.

संध्याकाळीं न चुकतां प्रार्थनामंदिरांत जावयाचा 'हिज हायनेस' चा नियम होता. प्रार्थनेनंतर शाही मुकबऱ्यांच्या आवारांत ते प्रवेशत. आजोबाच्या आणि पिताश्रीच्या समाधीला फुलं वाहून लीनमस्तक होऊन मनोमन

आशीर्वाद मागत. पांच सहा दिवसांपासून हा क्रम बंद आहे. हे कदाचित संस्थानांत अशांतता वाढते आहे म्हणून असेल. 'तब्यत' ठीक नसल्याच्या विविध प्रकारच्या विविध-मुखी वार्ताहि आहेत. पूर्वजांच्या समाधिपुढं ध्यानस्थ होताना त्यांना हुंदका आला होता, असंहि तेथल्या धर्मगुरुंच्या निदर्शनांस आल्याचं म्हटलं जातं.

काय असेल ते असो! राजोद्यान आणि राजमहाल एवढ्याच क्षेत्रांत ते आतांशा आढळतात. प्रत्येक वस्तुकडं पाहतांना त्यांची दृष्टी ममत्वाची; पहारेकऱ्याची कीं, परस्थाची असते, हें नक्की सांगतां येत नाहीं. त्या त्या वस्तुबद्दल त्यांच्या मनांत गाढ भयकारी शंका निर्माण झाल्या असल्या पाहिजेत! ते रम्यतर राजोद्यान, हा प्रेक्षणीय राजवाडा, राजवैभवाची स्मारकं म्हणून भावी काळांत जतन केली जातील किंवा नाहींत, अशीहि व्यथा त्यांना ग्रासीत असावी!

'हिज हायनेस' नी युरोपचा प्रवास केला होता. एका फार मोठ्या देशांत राजवंशावर झालेले अत्याचार पाहून तेथल्या मानवसमूहाचा त्यांना संताप आला होता, तशी कींवहि करावाशी वाटली होती! शाही मिरवणुकी, दरबारी वैभव-या गोष्टीं त्या पाश्चिमात्य वातावरणानं धुळीला मिळविल्या होत्या! राजवंशाचा दिमाख तिथं मुळींच आढळत नव्हता. कुठल्या एका प्रेक्षणीय राजवाड्यांत तर नाना कर्म-कटकटींचं अभद्र कार्यालय आढळलं होतं. पश्चिमेंतली ती प्रगति कीं, परागति?

पुरातन रम्य पूर्व देशांतली ह्या अशा विचारांनी नासली नाहीं, याचा त्यावेळीं त्यांना संतोष वाटला होता. पण आतां आपल्या निवासस्थानाबद्दल नेमके त्या प्रवासांतलेच विचार त्यांना सतावीत आणि अस्थिर करीत होते!

तें हिज हायनेसचं उच्चासन!

भारी कापडानं मढविलेलं, कमालीचं नरम आणि दोलनाची व्यवस्था असलेलें तें आधुनिक पद्धतीचं आसन उंची आणि उच्च का म्हणावं समजत नव्हतं. अलीकडं तें आसन एखाद्या कपटी मारेकऱ्यासारखं वाटत होतं. तेंच नव्हे, तर इतर सर्वच उच्चासनं त्यांना अशीच वाटूं लागलीं होतीं. त्यावर बसावेंच जमिनीचा आधार सुटून आपण खोल रसातळाला

जाऊं लागलों आहों की काय, अशी शंका येऊन ते सकंप होत आणि खुर्चीचे दोन्ही हात घट्ट धरीत.

आता देखील त्यावर बसतांना जमिनीला पाय टेकले आणि कोपरांना आधार लाभला, तेव्हा त्यांना थोडंसं बरं वाटलं. आपली उडालेली तिरपिट आणि फजिती पाहायला जवळपास कोणी नाहीं ना, हें अजमावण्यासाठीं त्यांनी इकडं तिकडं पाहिलं हे ! कुणी नव्हतं ! पलिकडं वाऱ्याच्या लहरी-मुळं थोडीशी सळसळ मात्र झाली होत ! भारी कपड्याचा अभ्रा असलेल्या तिपाईवर वर्तमान पत्रांतली ताज्या बातम्यांचीं कात्रणं होतीं तीं ! संस्थाना-च्या कानाकोपऱ्यांत धुमसत असलेला लोकक्षोभ त्या कात्रणांतूनहि प्रगट होत होता की काय, नकळे !

रोजचीं ताज्या बातम्यांचीं कात्रणं 'हिज हायनेस' नी अलीकडं पाहाणं सोडून दिलं होतं. इंग्रज होते तोंवर लिहिण्याला-छापण्याला वाटेल त्या उपायांनी धरबंध घालतां येत होता. पदव्यांचीं भारुडं सोडून 'हिज हायनेस'चा एकेरी उल्लेख करायला हीं वर्तमानपत्रं आतां मुळींच कचरत नव्हतीं. नागव्यांच्या हातांत जालीमं विषं आणि दाहक साधनं सनदशीर रीतीनं दिल्यासारखीं झालीं होतीं. हरताळा संस्थानांतली अर्धीअधिक अशांत-ता या वर्तमानपत्रवाल्यांनी भडकविली होती. आंतला भडका बाहेर चाल-विला होता ! बाहेरचा भडका आंत रिचविला होता ! योजावयाचे तेवढे कडक उपाय योजूनहि अखेर काय झालं होतं ? अंधारांत कोंडलं, तरी 'इच्छितांचा उदय सुचविणारा हा अंधार आहे' असं लोकनेते घोषवीत होते. सरकारी जुलमाचीं आणि दडपणाचीं सारीं शस्त्रं आणि साधनं बोथट होत चाललीं होतीं... तो पलंकीडचा 'हिज हायनेस'चा दरबारी पोशाख !

पंधरा ऑगस्टच्या सुमारास हरताळ्याचा शेवटचा रेसिडेन्ट 'हॉर्डिंज्' ह्याला 'खाना नजराणा' करतांनाच कायतो हिज हायनेसनी तो पोशाख चढविला होता. महायात्रेला निघालेल्या माणसाविषयीं परमादराचीं भावना व्यक्त करावी, तशी हॉर्डिंज् बद्दल 'हिज हायनेस'नी व्यक्त केली होती. त्या समारंभाहून परतल्यावर 'हिज हायनेस'नी दिवाणखान्यांतल्या दर्पणांत एक वेळ डोकावून पाहिलं होतं, संबंध समारंभांत गळ्याजवळचीं बटनं

दाटत होतीं. मनिला हासके हिसके देऊनहि तंग पोषाखाचा जाच टाळतां आला नव्हता. तेव्हांपासून तीं दरबारी वस्त्रं त्यांनीं चढवलीं नव्हतीं !...

सोन्याचा स्टॅन्ड असलेलं कॅलेंडर !

त्या स्टॅन्डला इतिहास होता. फार मोठ्या घराण्याच्या मोबदल्यांत थोरल्या 'हिज हायनेस' मरहूमाना एका व्हॉइसरॉयनं तो नजर केला होता.

इंग्रजी कृपेची ही फार मोलाची खूण म्हणून वागविण्यांत येत होती. 'इंग्रजी शतक जोंवर या स्टॅन्डवर राहील, तोंवर 'हरताळा' संस्थानाला कसलाच धोका नाहीं असं व्हाइसरॉयानं बोलून दाखविलं होतं.एकोणिसाव्या शतकाचा शेवट करणारी दसकडी आणि विसाव्या शतकांतली सत्तेचाळीस वर्षं त्या कॅलेंडरावरुन सरकलीं होतीं, आतां त्यावर स्पष्ट आंकडे दिसत होते, १९४८ (1948)

त्या इंग्रजी लिपीच्या अंकसमूहांतून त्यांच्या आकारावरुन हरताळ्याच्या राजघराण्याचा-सत्तेचा-उत्कर्ष आणि उतरण दिसून येत होती, राज्यस्थितीचा आणि आजच्या अगतिकतेचा बोध होत होता,

दोनशे वर्षांपूर्वी हरताळ्याची सत्ता एकाच्या आकड्यासारखी एकतंत्री स्तंभवत् ताठ होती. कंपनी सरकार बलिष्ठ झालं, आणि संस्थानिकांना त्यापुढं नवाच्या आकड्यासारखं नम्र मस्तक व्हावं लागलं. डलहौसी न वेल्स्लीच्या कारकिर्दीत तर संस्थानी सत्तेचं कंबरडं मोडून स्तंभाची भूमिका इंग्रजांकडे आली.संस्थानांचं आस्तित्व वेगळे दिसले,तरी इंग्रजी सत्तेच्या राजदंडाशी ते चाराच्या प्रथमार्धासारखं निगडित होतं आणि नव्या संवत्सराचं रूप घेऊन थांबलेला आठाचाआकडा आजची गुंतागुंतीची परिस्थिती दाखवीत होता. त्या आठाल्या वेटोळयाचं प्रथम सूत्र कुठं सुरु झालं होतं न कुठं संपलं होतं, किंवा ती उकल सोडविण्यासाठीं त्यांतलं एकादं टोंक कुठून काढावं न् कुठं नेऊन सोडावं अथवा जोडावं, कांहीं कळत नव्हतं ! इंग्रज होते तोंवर संस्थानिकांना आपले मुगुट सावरतां येत होते. इंग्रज गेले आणि जातांना त्यानीं संस्थानिकांवर झटकलेली लाथ मात्र सिंहासनाला हादरुन

टाकणारी ठरली ! आणि आतां ‘लोकांना जबाबदार असलेलं सरकार हवं’ अशा मागणीनं न् चळवळीनं तर आणखी हिंसके वसू लागले, या पुढें राजवंशाचं काय ?......

असे विचार मनांत आल्यावर ‘हिज हायनेस’ ‘बे’ पद्धतीच्या खिडकींतून बाहेर नजर टाकतात, वृक्षांच्या दुहेरी गुंफणीतून गेलेला सरळ, काळा भोर, निर्जन रस्ता दूरवर वक्र आणि अदृश्य होतो, रस्त्याची रेषा दृष्टींतून दडवून ठेणारी त्या काटाची वृक्षराजी दाट आणि निश्चल दिसते. आजचे झळाळणारे सर्वच दृश्यविषय काळ असेच गडप करून टाकील कीं काय, कळत नाहीं !

‘हिज हायनेस’ वडिलांच्या पुतळयावर डोकं टेकतात. हताशा आणि अश्रु-पात झाकण्याचा दुसरा कमलाच राजमार्ग त्यांना उरत नसावा ?...

## आगामी प्रकाशनें

साद (कथा संग्रह) ... ... बी. चौधरी

छोटे संवाद ... ... ... वि. भा. पाठक

नीलम (लहान मुलांसाठी)... वसंत सरदेशपांडे

मराठवाड्यांतील पांच प्रमुख कवींचे

कविता संग्रह इत्यादि